शनिवार । २३ जुलै १९७७
७५ पैसे

# माणूस

विरोधकांचे कागदी रावण उभे करायचे
आणि जाळायचे;
स्वतः जिंकल्याचा
पांचजन्य वाजवायचा;
या आत्मवंचनेच्या
खेळात सुधारक अजून
किती काळ रमणार आहेत ?

खरा
यक्षप्रश्न आहे....

चक्रमचक्री

पृष्ठ ५, ६, ७.

## साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे–अंक आठवा

२३ जुलै १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे



संपादक

श्री. ग. माजगावकर

साक्षाध्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी : ४३४५९


# केंद्र आणि महाराष्ट्रशासन

माहितगार

सहकार कायद्यात बदल करण्याचा सरकारचा विचार आहे असे अधिकृतपणे वा अनधिकृतपणे जाहीर करण्यात आलेले नाही. असे असताना विधिमंडळ कॉंग्रेसपक्षाच्या बैठकीत सहकारी सस्थाच्या पदाधिकाऱ्यांच्या मुदतीबाबत बरीच जोरदार चर्चा झाली. कायद्यात फेरबदल करण्याचा विचार जाहीर झालेला नसताना ही चर्चा झाल्यामुळे सरकारचा कायद्यात बदल करण्याचा प्रयत्न होता, असे अनुमान काढल्यास ते चुकीचे ठरणार नाही. सध्याच्या कायद्यानुसार सहकारी संस्थेचे पद एका व्यक्तीकडे पाच वर्षे ठेवता येते ही तरतूद करण्यात आली त्याच वेळी वसंतरावदादाचा याला विरोध होता. यशवंतराव मोहिते यांनी १९६८ च्या सुमारास सहकारावरील श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली आणि पदाधिकारीपद दोन टर्मपेक्षा अधिक काळ ठेवले जाऊ नये असे प्रतिपादन केले होते. एक टर्म तीन वर्षांची म्हणजे सहा वर्षे एकाचं व्यक्तीला पदावर ठेवता आले असते. या घटनेच्या वेळी वसंतरावदादा प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. जेव्हा श्वेतपत्रिकेवर आधारलेले विधेयक मांडण्याचा प्रयत्न झाला तेव्हा दादांनी त्याविरुद्ध बराच गवगवा केला होता. अध्यक्षपद सोडण्याची भाषा त्यांनी केली व ते सांगलीलाही निघून गेले होते. यशवंतराव चव्हाण यांनी वसंतरावदादाची समजूत घातली, विधेयकात फेरफार केला व एक टर्म ५ वर्षांची केली. त्यामुळे दादाचा रुसवा त्या वेळी गेला होता. सहकार संस्थाच्या पदाबाबत दादा किती आग्रही तसेच आक्रमक होऊ शकतात हे दाखविण्यासाठीच ही पार्श्वभूमी नमूद केली आहे. सहकार संस्था सत्तेचे व सत्तेच्या राजकारणाचे अड्डे झाले आहेत. त्यामुळे त्या आपल्या हातात जास्तीत जास्त काळ ठेवण्याचा खटाटोप केला जातो. त्याच्या जोरावर राजकारण खेळता येते. म्हणून दादा सहकार कायद्याविषयी आग्रही राहिले आहेत. यशवंतराव चव्हाण याच्या हातात सहकारी चळवळ नाही. सहकारी चळवळ परिवर्तनाचे एक साधन म्हणून त्यांनी तिच्याकडे पाहिले व ही चळवळ वाढीस लावण्याची अनुकूलता यशवंतरावांनी आपल्या कारकीर्दीत निर्माण केली. ज्या काळांत सहकार चळवळ फोफावली नव्हती त्या काळात यशवंतरावानी आपली माणसे सहकारी संस्थात बसविली; परंतु चळवळ वाढू लागली तेव्हा चळवळीतील माणसे समर्थ बनली. यशवंतरावांना आव्हान ठरेल एवढी ताकद या चळवळीच्या मोक्याच्या स्थानावर असलेल्या माणसाकडे आता आली आहे.

आपल्याला आव्हान ठरणाऱ्या या चळवळीतील माणसाना आवर घालावयाचा असेल तर त्यामध्ये काही बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे. हा बदल करावयाचा झाला तर पद किती वर्षे एकाच माणसाकडे ठेवायचे याच्यावर बंधन घालण्याचा विचार सुरू झाला. विधिमंडळ कॉंग्रेसपक्षाच्या बैठकीत परवा चर्चा झाली त्यामागे हाच हेतू होता असे सांगण्यात येते. म्हणूनच कायद्यात बदल करण्याचा सरकारचा मनोदय जाहीर झालेला नसला तरी बदलावर खल झाला आणि एका बाजूला वसंतरावदादा याच्या बाजूने उभे राहिलेले सहकारमंत्री शिवाजीराव पाटील ( धुळे ) व यशवंतराव चव्हाण याचे मानसपुत्र मानलेले गृहमंत्री शरद पवार याच्यामध्ये जोराची खडाजंगी झाली.

**पाच वर्षांच्या काळाकरिता सहकारी संस्थांचे पद एकाच व्यक्तीकडे ठेवावे. सहकारी संस्था काही माणसांची मिरासदारी झाली आहे. मिरासदारी-**

**मुळे सहकारी चळवळीत भ्रष्टाचार बोकाळू लागला आहे व ही पदे कॉंग्रेसजनांकडे असल्यामुळे कॉंग्रेसची प्रतिमा बिघडू लागली आहे पक्षाविरुद्ध वातावरण निर्माण होत आहे. ते टाळण्यासाठी सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची मुदत पाच वर्षांकरिता असावी असे शरद पवार यांनी विधिमंडळ कॉंग्रेसपक्षाच्या बैठकीत सांगितले**

शरद पवार यांच्या या भूमिकेमागची प्रेरणा यशवंतराव चव्हाणच आहेत असे दादा–गटाचे आमदार सांगतात. दादांच्या जवळ गेलेले त्याचप्रमाणे सहकारी क्षेत्रात ज्यांचे संबंध निर्माण झाले आहेत असे सहकारमंत्री शिवाजीराव पाटील यांनी शरद पवार यांच्या विरोधी भूमिका मांडली. यशवंतरावांनी शरद पवार यांच्यामार्फत शरसंधान केले असल्यामुळे दादांनी शिवाजीराव पाटलांना त्याविरुद्ध उभे केले आहे.

**सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची मुदत कमी करण्याची आवश्यकता नाही. त्यांची मुदत १० वर्षांची असावी यावर श्री. शिवाजीराव पाटील यांनी भर दिलाच, पण जर सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांवर मुदतीचे बंधन घालावयाचे असेल तर तसेच बंधन आमदार – खासदार – मंत्री व मुख्य मंत्री यांच्या बाबतीतही घालावे, अशी मागणी शिवाजीरावांनी केली.**

सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांवर सुंकात आणण्याचा प्रयत्न आहे तो उलटविण्यासाठी शिवाजीरावांनी हा युक्तिवाद केला आणि या विषयाला वेगळे वळण लागण्याच्या आधीच मुख्य मंत्री म्हणून वसंतरावदादा पाटील यांनी हा प्रश्न आगामी निवडणुकीनंतर येणाऱ्या नव्या सरकारवर सोपवू या, असे सांगून प्रतिडाव रचला.

विधिमंडळ कॉंग्रेसपक्षाच्या बैठकीत सहकारासंबंधी झालेल्या चर्चेमागे यशवंतराव – दादा असे राजकारण असल्याचे अनेक कॉंग्रेस आमदार उघडपणे बोलत आहेत.

शरद पवार यांनी सहकार चळवळीच्या निमित्ताने मोर्चा बांधला तर मुंबईचे आमदार वि. क. टेंबे यांनी मंत्रिमंडळाच्या आकारावर टीका केली. भ्रष्टाचाराचे बॅंक बे प्रकरण उकरून काढले चाळीस जणांचे मंत्रिमंडळ करण्यात आपली चूक झाली. ३० जणांचे मंत्रिमंडळ करावे असा माझा विचार होता, पण परिस्थितीमुळे मला एवढे मोठे मंत्रिमंडळ करावे लागले आहे. आता ते बदलता येणार नाही असे दादांनी बैठकीत सांगितले. भ्रष्टाचाराची चर्चा झाली तिचा रोख ह. गो. वर्तक यांच्याविरुद्ध होता टेंबे यांच्या टीकेने ह. गो. वर्तक आपल्या स्वभावानुसार चवताळलेच! टेंबे यांना त्यांनी पक्षाबाहेर पडावे अशी दमदाटीही केलीच, पण ती करताना मी टीकेचे प्रहार आतापर्यंत सहन केले. मी मूग गिळून गप्प बसलो, पण आता माझ्या सहनशक्तीच्या पलीकडे गेले आहे. बॅंक बे चे प्लॉट विकण्यात माझा एकटयाचाच संबंध नाही. इतरांचाही त्याच्याशी संबंध आहे असे वर्तक म्हणाले.

कॉंग्रेसपक्षात असंतोष वाढत असून त्याची कारणे भिन्न भिन्न आहेत. पक्षातच जिजरगट स्थापन करण्यात यशवंतराव मोहिते यांनी पुढाकार घेतला आहे. विधानसभा व विधानसभेबाहेर हा गट पक्षात राहून काम करणार आहे. मंत्रिमंडळाचा आकार कमी करावा अशी मागणी या गटाने मुख्य मंत्री पाटील यांची भेट घेऊन केली आहे. मोहिते मंत्रिपदावर राहून मंत्रिमंडळ लहान करावे असे म्हणू लागले तर त्याला काय अर्थ राहील? मोहिते यांच्या विरोधी असलेले, त्यामुळे प्रथम मोहिते यांनी राजीनामा द्यावा व मंत्रिमंडळ लहान करण्यास हातभार लावावा असे म्हणू लागतील. तेव्हा मोहिते काय उत्तर देतील?

### यशवंतरावांनी केलेला 'सौदा'

दादांच्या मंत्रिमंडळाविरुद्ध आवाज उठविला जाऊ लागला असतानाच काही जण यशवंतराव चव्हाण राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसंबंधी जी भूमिका घेत आहेत त्याविरुद्ध बोलू लागले आहेत. आपल्याविरुद्ध सुरू झालेले वारे दुसऱ्या दिशेला वळविण्यासाठी हे पिल्लू सोडले आहे असेही काही जण म्हणतात. असे म्हणणारे यशवंतराव चव्हाण यांना अनन्यसाधारण निष्ठा वाहणारे आहेत. कॉंग्रेसची चार लाखावर मते असताना यशवंतराव जनतापक्षाशी तडजोड का करीत आहेत? दर वेळी यशवंतराव म्हणतील ते आपण मानावयाचे हा प्रकार किती काळ चालणार? जर यशवंतराव आपल्या राजकारणासाठी जनतापक्षाशी वरती जमवून घेणार असतील तर राज्याच्या व त्याही खालच्या पातळीवर आपण जनतापक्षाशी विरोधात उभे राहण्यात काय अर्थ आहे? असे प्रश्न आमदार विचारतात. हे आमदार जिजरगटाचे आहेत. जनतापक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा देऊन यशवंतरावांनी ज्या राज्यात कॉंग्रेस सरकारे आहेत ती सरकारे मार्चपर्यंत तशीच ठेवावी असा सौदा केला आहे! हे या जिजरगटातील लोकांना समजत नाही असे यशवंतरावांना मानणारे म्हणतात.

### केंद्राशी सलोख्याचे संबंध का आहेत?

ही चर्चा सुरू असतानाच दादा जनतापक्षात जाण्याची शक्यता आहे अशी कुजबूजही कॉंग्रेस आमदार करीत आहेत. मुख्य मंत्री श्री वसंतराव पाटील जनतापक्षात जाणार असल्याचा बोलबाला आहे असे 'ऑन लुकर' या साप्ताहिकाने अलीकडेच म्हटले आहे या प्रकारची कुजबूज गेल्या काही दिवसांपासून ऐकावयास मिळते. माणूसने या प्रकरणी उल्लेख केला होता त्याला ऑन लुकरने आता साथ दिली आहे. किंबहुना माणूसमधील लेखातील उल्लेखापेक्षा अधिक स्पष्टपणे ऑन लुकरने लिहिले आहे. मुख्य मंत्री पाटील यांच्याकडून ऑन लुकरच्या उल्लेखाचा इन्कार केलेला नाही. मध्यंतरी बडखोर कॉंग्रेसजनांच्या पक्षत्यागाची चर्चा चालू होती तेव्हा बडखोरांनाही असेच वाटत होते की, आपण पक्ष सोडण्यापूर्वी वसंतराव पाटील जनतापक्षात जातील व आपल्या 'बंडा'ची हवा काढून घेतील. बडखोर ही शंका बोलून दाखवीत होते अर्थात अशा गोष्टींना पुरावा असत नाही केंद्रीय मंत्री एच. एन. बहुगुणा यांचा वसंतराव पाटील यांच्याशी संबंध आहे. 'दादा अनेक वर्षे मुख्य मंत्री राहावेत' असे बहुगुणा यांनी उद्गार काढले होते. 'दादा विधायक प्रवृत्तीचे व कर्तृत्ववान नेते आहेत' असे महाराष्ट्र जनतापक्षाचे अध्यक्ष एस. एम. जोशी यांनी सांगलीतील भाषणात सांगितले

होते लोकसभा निवडणुकीपूर्वी लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्याबरोबर दादाचा वाढता संपर्क होता, चंद्रशेखर-मोहन धारिया यांच्याबरोबर त्यांची बोलणी झाली. 'महाराष्ट्रात काँग्रेसला आता पहिल्यासारखे अनुकूल वातावरण राहिलेले नाही' असे जगजीवनराम म्हणू लागले आहेत ते आमच्याच आश्वासनामुळे म्हणत आहेत' असे अभिमानाने दादांच्या घरातून सांगितले जात होते या साऱ्या घटना दादाविषयी संशय व्यक्त करू लागल्या व त्यांची चर्चा होऊ लागली. ही चर्चा होत होती तेव्हाच मुख्य मंत्री पाटील व राज्यपाल सादिक अली यांच्यात खल होऊ लागला. उत्तर भारतातील विधानसभा-निवडणुकीचे निकाल लागत असतानाच केंद्रीय गृहमंत्री चरणसिंग अचानक जयप्रकाश नारायण यांना भेटायला मुंबईत आले. जयप्रकाश-चरणसिंग चर्चेच्या वेळी मुख्य मंत्री पाटील हेही हजर होते. त्यामुळे तर्क करण्यास आणखी जागा राहिली! अशक्य वाटणाऱ्या अनेक शक्यतांची राजकीय वर्तुळात चर्चा चालू आहे. त्याचा इन्कार करणे योग्य ठरले असते; पण या चर्चेवर आधारित असा मजकूर प्रसिद्ध होतो तेव्हा मुख्य मंत्री वसंतराव पाटील यांच्याकडून इन्कार होत नाही ही गोष्टही विशेष महत्त्वाची ठरते! एखाद्या व्यक्तीबाबत संशयाने काही गोष्टी गृहीत धरणे हे त्या व्यक्तीवर अन्याय करणारे आहे; परंतु संशयाचे वातावरण निर्माण होईल असे एखाद्याने सतत वागावे का हाही प्रश्न निर्माण होतो.

पंतप्रधान मोरारजी देसाई यानाही मुख्य मंत्री वसंतराव पाटील वारंवार भेटत आहेत. मुख्य मंत्री या नावाने त्यांनी पंतप्रधानांची भेट घेतली तर त्यातून राजकीय अर्थ काढणे योग्य नाही असा युक्तिवाद पुढे केला जाण्याची शक्यता आहे. मात्र पंतप्रधान व मुख्य मंत्री यांच्या भेटी सरकारी पातळीवरील कामकाजाबाबतच झाल्या असे मानावयास मी तयार नाही. 'तुम्ही म्हणत असाल तर विधानसभा बरखास्त करण्याचा सल्ला मी राज्यपालांना देतो, मात्र निवडणूक होईपर्यंत काळजीवाहू सरकार म्हणून आम्हाला राहू द्यावे,' असे मुख्य मंत्री श्री. वसंतराव पाटील यानी पंतप्रधान श्री. देसाई याना सांगितले अशी माहिती मिळते. निवडणुका घेताना त्या राज्यात काँग्रेसची सरकारे ठेवायची नाहीत अशी भूमिका पंतप्रधानाची आहे त्यामुळे दादांच्या प्रयत्नाला यश आले नाही, असे जनतापक्षाचे नेते म्हणतात. मुख्य मंत्री श्री. पाटीलच यावर अधिक प्रकाश टाकू शकतील; परंतु केंद्राबरोबर महाराष्ट्र सरकारचे संबंध कसे आहेत याविषयी दादाच्याच एका सहकाऱ्याने सूतोवाच केले आहे सेंट जॉर्जेस इस्पितळाच्या परिसरातील मोकळी जागा पोस्ट व टेलिफोनला देण्याच्या निर्णयामुळे काही प्रश्न निर्माण झाले होते या जागेची पाहणी करण्यासाठी तेव्हा दळणवळणमंत्री असलेले जॉर्ज फर्नांडिस दादाच्या समवेत आले त्यापूर्वी मुख्य मंत्र्याच्या निवासस्थानी फर्नांडिस-पाटील यांच्यात चर्चा झाली. आम्ही काही पत्रकार त्या वेळी 'वर्षा'वर गेलो होतो दादा व फर्नांडिस जागेची पाहणी करणार असल्याचे समजताच आम्हीही तिकडे जाण्याचे ठरविले. आम्ही पत्रकार व दोन मंत्री एकाच गाडीतून सेंट जॉर्जेस इस्पितळाकडे निघालो. 'सध्याच्या (सेंट जॉर्जेसच्या मोकळ्या जागेच्या) प्रश्नातून मार्ग निघण्यास अडचण येणार नाही' असे एक मंत्री म्हणाला. अडचण न येण्याचे कारण काय असे आम्ही विचारले तेव्हा ते म्हणाले, 'आमच्या सरकारने केंद्राबरोबर ज्या पद्धतीने वागायचे ठरविले आहे, ती पद्धत पाहता केंद्र व राज्य सरकार यांच्यात अडचण येणार नाही केंद्राशी सलोख्याचे धोरण मुख्य मंत्र्यानी ठेवले आहे. मग अडचणी कशाला येतील?' -दादाचे काही सहकारी केंद्र-राज्य संबंधाविषयी बोलताना 'दोन्ही ठिकाणी वेगळ्या पक्षाची सरकारे आहेत असे आम्ही मानीत नाही असेही काही वेळा बोलतात! त्यात विनोदाचा भाग किती व तत्त्वाचा भाग किती हे शोधणे म्हणजे दुधातील दूध व पाणी वेगवेगळे करण्याच्या प्रकारासारखे आहे!

जनतापक्षात भालोद व जनसंघ याचा वरचष्मा आहे पूर्वीच्या संघटनाकाँग्रेसला त्यात फारसे स्थान मिळालेले नाही अशी भावना संघटनाकाँग्रेसच्या नेत्याची झाली आहे चरणसिंग पंतप्रधान होण्यासाठी खटपट करीत आहेत अशा वेळी आपल्याला मानतील अशी काँग्रेससरकारे दक्षिणेकडे राहिली तर मोरारजीना हवी आहेत. म्हणजे मग जनतापक्षातील संघटनाकाँग्रेस व काँग्रेसमधील माणसे एक होतील आणि आपले स्वप्न पूर्ण होणार नाही हा दबाव भालोद व जनसंघ याच्यावर कायमचा ठेवावा यासाठी मोरारजीनी दादाना विधानसभा बरखास्त करण्याचा सल्ला राज्यपालाना देऊ नका असे सांगितले अशी दुसरी बाजूही पंतप्रधान-मुख्य मंत्री याच्या भेटीसंबंधी मला सांगण्यात आली. महाराष्ट्र सरकार व विशेषत मुख्य मंत्री श्री. वसंतराव पाटील याचे केंद्राशी-त्यातल्यात्यात जनतापक्षातील मूळच्या काँग्रेसजनांशी-सलोख्याचे संबंध असून त्यांच्या एकमेकांशी नेहमी गाठीभेटी होत आहेत हा त्यातील निष्कर्ष आहे

☐


# पॅपिलॉन
पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

राजहंस प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : पंचवीस रुपये

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## प्रांतोप्रांतीचे नवीन सुभेदार

राज्याच्या विधानसभा-निवडणुकांनंतर प्रांतोप्रांती नवीन मुख्य मंत्री निवडण्यासाठी एकच धावपळ झाली जनतापक्ष बहुतेक ठिकाणी बहुमतामध्ये असला तरी पक्षनेत्याची निवड ही तारेवरची कसरत होती. वर्तमानपत्रवाले किंवा जनतापक्षाला बहुमताने निवडून पाठविणारी जनता याना पक्षाच्या नेतेपदी आलेली व्यक्ती जनतापक्षाची आहे एवढयाने समाधान वाटत नव्हते. म्हणून वरचा जनतापक्षाचा शेंदूर खरवडून काढून आतला असली रग कोणता आहे हे पाहण्याची दाडगी उत्सुकता अनेकाना होती आणि पक्षनेत्याच्या मूळ रगाचे स्वरूप उजेडात आल्यावर भालोद आणि जनसघ यानी जनतापक्षांतर्गत हातमिळवणी केली आणि इतरावर कुरघोडी केली अशी जोरदार आवई उठली. त्यामुळे प्रांतोप्रांतीचे हे नवीन सुभेदार पुन्हा एकदा प्रकाशझोतामध्ये न्हाऊन निघाले.

जनतापक्षाखेरीज जी मडळी सत्तास्थानी आली त्यापैकी ज्योती बसू याची दखल गेल्याच अकामध्ये विस्ताराने घेतली आहे फिल्मी सितारा एम्. जी. आर. भरपूर प्रसिद्धी चौफेर वसूल करतोच आहे. काश्मीरमधील आपले वैशिष्टयपूर्ण स्थान सभाळून असलेले शेखसाहेब लहानमोठया वार्तांतून दररोज भेटतच आहेत; पण आज आपल्याला भेटायचे आहे ते जनतापक्षाच्या काही मुख्य मत्र्याना. सुरुवात बिहारच्या कर्पूरी ठाकूर याच्यापासून करू या.

### कर्पूरी ठाकूर : सच्चा समाजवादी

कर्पूरी ठाकूर याच्याबद्दल काहीही मते असली तरी कर्पूरी ठाकूर हे सच्चे समाजवादी आहेत आणि त्याचे हात आश्चर्य वाटावे इतके स्वच्छ आहेत- विशेषत. बिहारमधील राजकारण खेळूनही ते अगदीच कोरडे राहिले आहेत, याबाबत त्याच्या विरोधकाचेही एकमत आहे. साधेपणा, गरिबाबद्दलची आत्यतिक कणव, कोणताही त्याग करण्याची तयारी अशा अनेक गुणामुळे ते चागले लोकप्रिय आहेत. जयप्रकाशजीचा या पातळीवर विचार करण्याचे कारण नाही. इतरापैकी एक बाबू जगजीवनराम आणि कें. एल्. एन्. मिश्रा हे दोन नेते सोडले तर अलीकडच्या काळामध्ये बिहारबाहेर ज्याचे नाव पोचले आहे. असा नेता म्हणजे कर्पूरी ठाकूर. अर्थात कर्पूरी ठाकूर याची प्रसिद्धी आणि कें. एल्. एन्. मिश्रा याची ख्याती यामध्ये जमीनअस्मानाचा फरक आहे कर्पूरीजी हे न्हावी काम करून शेती करणाऱ्या एका सामान्य माणसाचे चिरजीव. कर्पूरीजीच्या वाटयाला यापूर्वीही बिहारचे मुख्य मंत्रिपद आले होते; पण म्हणून त्यांच्या कुटुबाच्या राहणीमध्ये काहीही फरक पडला नाही. त्याचे वडील गोकुळ ठाकूर आजही अडीच बिघ्याची वाडवडलार्जित जमीन कसतात केवळ चौथ्या यत्तेपर्यंत शिक्षण घेतलेला त्याचा धाकटा भाऊ आजही नागरणीसाठी शेतात जातो शेती करून जो अवांतर वेळ मिळतो- त्या वेळात हे दोघेही न्हावीकाम करून शेतीउत्पन्नाला जोड देतात आणि कुटुबामधील मोठा मुलगा कर्पूरी हा राज्याचा मुख्य मत्री म्हणून मिरवत असतानाही वडील आणि भाऊ आपल्याजागी आपापल्या योग्यतेची कामे करीत होते हे विशेष मानावे लागेल. १९६७-६८ साली बिहारमध्ये जे सयुक्त विधायक दलाचे मत्रिमडळ सत्तेवर आले त्यामध्ये कर्पूरीजी उपमुख्य मत्री होते. पुढे डिसेंबर १९७० पासून जून ७१ पर्यंत त्यानी राज्याचे मुख्य मत्रिपद भूषविले राज्याच्या राजकारणामध्ये त्यानी फार पूर्वीपासून रस घेतला असून १९५२ पासून बिहार राज्य विधानसभेचे ते सदस्य आहेत जयप्रकाशजीच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन त्यानी १९७४ साली आमदारकीचा राजिनामा दिला.

कर्पूरीजीचा जन्म १९२१ सालचा. समस्तिपूर जिल्ह्यामधील पिलोजिसा हे त्याचे जन्मगाव. दरिद्री कुटुबामधील विविध प्रश्नाना तोंड देत वाटचाल करणारे कर्पूरी ठाकूर आज राज्याचे मुख्य मत्रिपद भूषवीत आहेत दारिद्र्याची चव दीर्घकाळ चाखल्यामुळे- गरिबीबाबतचे त्याचे विचार हे केवळ 'ॲकॅडमिक' स्वरूपाचे नाहीत. गरिबी भेडसावीत असूनही त्यांनी आपले शिक्षण अट्टाहासाने पूर्ण केले. ते पूर्ण व्हावे म्हणून अनत अडचणीवर मात केली. समस्तिपूर येथूनच मॅट्रिक पास झाल्यावर दरभगा येथे महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते जाऊ लागले. वर 'अनत अडचणी' असा शब्दप्रयोग केला आहे तो आपला उगाच सत्तेवर आलेल्या माणसावर स्तुतिसुमने उधळावीत यासाठी केलेला नाही तर खरोखरच जिवाच्या आकांताने त्याना आपले शिक्षण पूर्ण करावे लागले हे स्पष्ट व्हावे म्हणून केला आहे. शालेय शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्याना रोज आठ मैल चालावे लागत होते रोज जेवण मिळत असेच असे नाही पाण्यावर दिवस काढून त्यानी काही वेळा शाळा केली. पुढे शाळा पूर्ण झाल्यावर दरभगा येथे महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी त्याना चालत जावे लागत असे. हे अतर केवळ २० मैलाचे होते आणि आठवडयातून अशी एक फेरी तरी होत असे. शिक्षणाचा खर्च भागावा म्हणून शिकवण्या करण्याची जबाबदारी त्यानी उचलली. बी ए.च्या अखेरच्या वर्षामध्ये असतानाच ते राष्ट्रीय चळवळीमध्ये ओढले गेले. तो १९४२ चा काळ होता आणि त्याच्यासारखा सवेदनाक्षम तरुण घरामध्ये बसणे शक्यच नव्हते. राष्ट्रीय चळवळीचे काम तर करता यावे; परंतु शासनाच्या ते लक्षात तर येऊ नये म्हणून मग त्यानी एका शाळेमध्ये नोकरी पत्करली आणि या फदफितुरीमुळे त्याना एका रात्री अटक करण्यात आली. काही काळानतर त्याची तुरुगातून

सुटका झाली, पण या चळवळ्या मनुष्याला दीर्घकाळ बाहेर ठेवणे ब्रिटिश सरकारलाही परवडण्यासारखे नव्हते. सच्चा समाजवादी म्हणून नाव मिळविलेल्या कर्पूरीजींची लवकरच पुन्हा तुरुगामध्ये रवानगी झाली आणि देश स्वतत्र झाल्यावरच त्याची मुक्तता झाली.

सत्तेचाळीस साली स्वातत्र्य मिळाल्यावर राजकारणाचे स्वरूप बदलले कर्पूरी ठाकूर बाहेर जनहिताच्या चळवळी चालवीत होते आणि विधानसभेमध्ये एक जबाबदार आमदार म्हणून काम करीत होते. १९४८ साली त्यानी बिहारमध्ये शेतकरी चळवळ उभी केली आणि शेतकऱ्याच्या प्रश्नाचे आदोलन नेटाने चालविले सयुक्त विधायक दलामध्ये मंत्री म्हणून काम करीत असताना त्याचा फारसा प्रभाव पडू शकला नाही. विविध पक्षाच्या परस्पर विरोधी धोरणामुळे सरकार चालविणे जास्त अवघड होऊन बसले अशी कबुली त्यानी पुढे या सदर्भामध्ये बोलताना दिली. खेरीज केद्रस्थानी कॉंग्रेसचे सरकार होते आणि सयुक्त विधायक दलाच्या मत्रिमडळाला त्यानी जास्तीत जास्त त्रास देण्याचा प्रयत्न केला. कर्पूरीजी म्हणतात की मी मुख्य मत्री झाल्यावरही राज्याच्या प्रश्नामध्ये डोके घालण्यास मला फारसा अवधी मिळाला नाही दिल्लीबरोबरील प्रश्नाचा निकाल लावण्यातच माझा वेळ खर्ची जात असे. मुख्य मत्री असताना त्यानी दलिताच्या उद्धारासाठी विशेष प्रयत्न केले.

आणीबाणीच्या कालखडामध्ये कर्पूरी बाहेर राहणे शक्यच नव्हते, परतु आणीबाणी ज्या वेळी घोषित झाली त्या वेळी कर्पूरीजी नेपाळमध्ये होते. एका नातेवाइकाच्या विवाहासाठी ते तिकडे गेले होते. जयप्रकाशजींच्या आदोलनाचा त्यानी जोरदार पाठपुरावा केला होता म्हणून ते देशात येताच त्याना अटक करण्यात यावी असे फर्मान सुटले. नेपाळसरकारने त्याना बोलावून घेतले व कोणतीही राजकीय चळवळ करणार नाही असे लिहून दिल्यासच नेपाळमध्ये राजकीय आश्रय मिळेल असे सागितले. हे असले काही लिहून देण्यापेक्षा नेपाळ सोडून भारतामध्ये परतणे मी पसत करीन असे त्यानी नेपाळसरकारला सागितले. त्यानतरही बरीच बोलणी झाली; परतु नेपाळसरकारचा दृष्टिकोन त्रासदायक आहे हे त्याच्या लक्षात आले. अखेरीस–सरकारला कळविल्याशिवाय मी नेपाळ सोडणार नाही असे त्यांनी लिहून दिले एक जामीनही दिला आणि एवढे करूनही सरकारला न कळविता नेपाळ सोडून जाण्यात त्यानी यश मिळविले. नेपाळी पेहराव करून त्यानी नेपाळबाहेर पडण्यात यश मिळविले. कॉंग्रेसच्या दोन कार्यकर्त्यांनी त्याना ते कलकत्त्यामध्ये उतरताच ओळखले; परंतु त्याच्याकडून काही हालचाल होण्यापूर्वीच ते बगलोरला रवाना झाले. ३० जानेवारीला पाटण्याच्या गाधीमैदानावर त्यानी नाट्यपूर्णरीत्या प्रवेश केला व तेथेच त्याना अटकही झाली.

आणीबाणीच्या काळामध्ये वेषातर करून भूमिगत म्हणून वावरत असताना त्यांना जे विविध अनुभव आले त्यावरून केवळ सर्वसाधारण जनताच नव्हे तर कॉंग्रेसचे कार्यकर्तेही आणीबाणीला कंटाळले आहेत हे त्यांना समजून चुकले. भूमिगत कार्य करीत असताना त्यांनी देशभर संचार केला आणि भूमिगत चळवळीशी सतत संपर्क ठेवला. मुंबईमध्ये त्याचा मुक्काम सध्याच्या पंतप्रधानांच्या चिरंजिवाचे समुद्रकिनारी जे निवासस्थान आहे तेथे असे. पोलिसाची नजर चुकवून प्रवास करणे त्रासाचे जात असे. काही वेळेला पोलिसांना त्याच्या हालचालीची खबर कोणाकडून तरी मिळत असे आणि मग त्याना पकडण्यासाठी जाळे टाकले जाई एकदा बडोद्याहून मुंबईला निघालेली एक गाडी अचानकपणे मध्यरात्री थाबविण्यात आली आणि अनेक पोलिसअधिकारी प्रथम वर्गाच्या विशिष्ट डब्याकडे धावले. त्यानी डब्यामध्ये शातपणे झोपलेल्या प्रवाशाला उठविले आणि अगदी विश्वासाने ठणकावले, 'कर्पूरी ठाकूर, आम्ही तुम्हाला ओळखले असून आपणास अटक करीत आहोत!' त्या इसमाला रेल्वेस्टेशनवर आणण्यात आले आणि पोलिसानी त्याची बरीच छेडछाड केली. अखेरीस आपण पकडलेला इसम म्हणजे कर्पूरी ठाकूर नाही अशी खात्री झाल्यावर त्याला सोडून देण्यात आले आणि ज्याला सोडले तो गृहस्थ होता, रवींद्र वर्मा!! आजच्या केद्रीय मत्रिमडळामध्ये मजूर मत्रिपद भूषविणारा आणि त्या वेळी पोलिसाना हवा असणारा एक भूमिगत नेता! वास्तविक पोलिसाना मिळालेली खबर अतिशय अचूक होती. कर्पूरी ठाकूर याचे त्याच गाडीचे तिकिट काढण्यात आले होते; परतु अगदी आयत्या वेळी त्यानी प्रवास करण्याचा विचार रद्द केला आणि एकटे रवींद्र वर्मा पुढे निघाले. पोलिसानी आपण पकडलेला इसम म्हणजे कर्पूरी ठाकूर नाही एवढीच फक्त खात्री करून घेतली. त्यानी जर तो कोण आहे याचा शोध घेतला असता तर ज्याला अटक करण्यासाठी देशव्यापी जाळे पसरण्यात आले होते असे रवींद्र वर्मा पोलिसाच्या ताब्यात गेले असते आणि गाडी थाबविण्याचा व्याप अगदीच फुकट गेला नसता. अर्थात मग पोलिसाचा हा अस्सल खाकी किस्सा कसा सागता आला असता?

## चिरजिवांचा विरोध

आपल्या वडिलानी आता प्राताच्या राजकारणाबाहेर पडून दिल्लीचे राजकारण करावे असे ठाकुराच्या चिरजिवाना वाटते. खासदारकीचा राजिनामा देऊन पुन्हा बिहारच्या डबक्यात उतरण्यात आपल्या वडिलानी चूकच केली असा त्याचा ग्रह आहे. अर्थात ठाकूर स्वत ही म्हणतातच की, बिहारच्या मुख्य मंत्रिपदामध्ये मला इतका रस नव्हता, परतु नाइलाज म्हणून ही जबाबदारी मी स्वीकारली आहे बिहारमधील शासन चालविणे मुळीच सोपे नाही याची त्याना जाणीव आहे. जनता केवळ आश्वासनावर फार काळ थाबणार नाही ही गोष्ट पण ते पूर्णपणे ओळखून आहेत आणि तरीही आपण योग्य दिशेने काही तरी करू शकू असा त्याना विश्वास आहे. तो आता किती सार्थकी लागतो ते पाहायचे. □

## □ उत्तरप्रदेश पक्षांतर्गत साठमारी!

नेतानिवडीच्या संदर्भामध्ये जेथे प्रचंड वादळ उठले असे राज्य म्हणजे उत्तरप्रदेश. मधू लिमये, नानाजी देशमुख, राजनारायण यासारखी मंडळी उत्तरप्रदेशामध्ये जातीने लक्ष घालीत होती. उत्तरप्रदेशावर पुन्हा एकदा वर्चस्व प्रस्थापित करता आले तर पहावे म्हणून सी. बी. गुप्ता प्रयत्नशील होते; पण उत्तरप्रदेशामधील खरी शक्ती म्हणजे चौधरी चरणसिंग. त्याचाच मनुष्य सत्तेवर येणार हे

पृष्ठ ३१ वर

## चक्रम्चक्री ( २० )

दीर्घस्मृति विश्वनाथ

# बाबांची मळमळ

हल्ली ‘ केसरी ’ला बाबा आढाव, स. का. पाटील अशा मंडळीचे भलतेच प्रेम आलेले दिसतेय.

कॉंग्रेसचा पराभव झाल्यापासून केसरीचे ( अखंड ) सौभाग्य नाहीसे झाले. त्यामुळे जनतापक्षाचा नादता ससार केसरीला बघवेनासा झाला त्या नांदत्या घरातली खरी-खोटी छिद्रे सागणाऱ्याचे आगतस्वागत केसरीने करावे हे साहजिकच आहे.

पण बाबा आढावाचे पूर्वी कधी केसरीला अगत्य असल्याचे आठवत नाही. मागे ‘ वेदपाठी ब्राह्मणाचा सरकारने सत्कार करू नये ’ अशा अर्थाचा ठराव आढावानी कॉर्पोरेशनमध्ये माडला होता. तेव्हा बाबासारख्याकडून वेद वदविण्यासाठी ज्ञानेश्वरानी अवतार घ्यावा, असा उपहास केसरीने केला होता; इतकेच नव्हे तर आयुर्वेदाचे डॉक्टर असलेल्या आढावानी वेदाना शिव्या द्याव्यात ही कृतघ्नता आहे असा फुसका कोटिक्रम करणारी पत्रेही केसरीने त्या वेळी छापली होती.

‘ केसरी ’ची गोष्टच सोडा हो ! गेल्या दोन वर्षांतली केसरीची कामगिरी म्हणजे मराठी वृत्तपत्राच्या इतिहासातले एक डाबराने रगविलेले पान आहे बाईची कृपादृष्टी आपल्याकडे वळावी आणि दोनचार कमिट्याच्या सभासदत्वाचे चतकोर पुढ्यात पडावे यासाठी वीतवीत जीभ बाहेर काढून लाळा गाळणारे आणि नाना चार दाखविणारे पत्र ते ! त्याच्या चेष्टाचा विचारसुद्धा अगाची लाही करतो.

अगदी बरोबर बोललात ! बाईंनी निवडणुका जाहीर केल्यावर पहिला अग्रलेख केसरीने लिहिला तो विरोधी पक्षाना ‘ आता पळ काढू नका ’ असा उपदेश करणारा. पुढे कॉंग्रेसलाच पळता भुई थोडी झाली आणि कॉंग्रेसचे रथीमहारथी हात जोडून क्षमायाचना करू लागले, तरी केसरीची गुर्मी उतरली नाही ‘ कॉंग्रेसवाल्यानी जनतेची मनमोकळी माफी मागावी ’ असे शहाजोगपणे सुचविणारा ‘ केसरी ’ स्वतः मात्र आपल्या चुकाची कबुली देऊन जनतेची माफी मागत नाही ! आहे की नाही गमत !

जाऊ द्या हो. केसरीची आठवण झाली की, कोणाही सच्चा महाराष्ट्रीयाला सताप आल्याखेरीज रहाणार नाही; पण सध्या हे बाबा आढावाचे काय काढलेत ?

### बाबांची तिरकी चाल

बाबा आढावाचा केसरीला एवढा पुळका यायच कारण असे की, अलीकडे डॉक्टरानी एक नवाच विचार माडायला सुरुवात केली आहे

तो कोणता ?

तो असा की, कॉंग्रेसला हरविण्यासाठी समाजवादी पक्षासारखा पुरोगामी, विज्ञाननिष्ठ आणि समताकांक्षी पक्ष आणि जनसघासारखा प्रतिगामी, धर्मश्रद्धा मानणारा आणि पूर्वगौरवी किंवा इतिहासलक्षी असा पक्ष हे एकत्र आले, हे चागले झाले नाही. त्यामुळे देशाचे समाजकारण पुढे जाणार नाही.

म्हणजे इंदिराबाईंची हुकुमशाही तशीच चालू द्यायला हवी होती !

तसे काही आढाव म्हणत नाहीत. कॉंग्रेसच्या राजकारणामुळे विरोधी पक्ष एकत्र येणे अपरिहार्य झाले हे त्याना मान्य आहे, पण त्याचे म्हणणे असे की, हा तात्पुरता विचार झाला आता कॉंग्रेसचा पराभव झाल्यानतर पुढचे राजकारण दलित, शोषित आणि सपत्तीला वचित अशा जाती–जमातीच्या उन्नतीच्या अनुषगाने झाले पाहिजे जनसघासारख्या प्रतिगामी पक्षाचे लोढणे गळ्यात बाळगून जनतापक्ष हे राजकारण चालवू शकणार नाही.

पण हे म्हणणे बाबाच्या समाजवादी माहेराला मान्य दिसत नाही. ते तर म्हणत असतात की, सघ आता बदलत चाललाय्.

सगळेच समाजवादी असे म्हणत नाहीत अलीकडे महाराष्ट्रातील समाजवाद्याचा आदिमठ जे ‘ साधना ’ कार्यालय तिथेही संघविरोधी वारे वाहताना दिसतात.

बरं; पण या मडळीचा सघाविरुद्ध चार्ज काय आहे ?

चार्ज नेहमीचाच आहे, पण माडला आहे मोठा खुलवून ! वाचताना वाटते की, हे बाबानी लिहिलेले नसून अनास्वामी अवचटानीच लिहिले असावे. बाबानी आपले यरवड्याच्या तुरुगातले सघासबधीचे अनुभव लिहिले आहेत पहिले म्हणजे सघजनावर हिंदू व्रतवैकल्ये, विशेषत. ब्राह्मणी कर्मकाडाचा पगडा आहे. संकष्टया, एकादश्या, सत्यनारायण, जपजाप्य, सूर्यनमस्कार, श्रावणी, सोवळेओवळे इत्यादी गोष्टी ही मडळी पाळतात. अशा कर्मठ वातावरणात बंदिस्त असलेली माणसे आधुनिक विचाराला कशी सामोरी जाणार ? त्याची चुटकेवजा चुरचुरीत उदाहरणे अनास्वामीच्या पद्धतीने दिली आहेत.

पण नाही तरी सघस्वयसेवक आपल्या ढापण लावलेल्या वागण्याने आणि विचाराच्या व ते माडण्याच्या छापील पद्धतीने स्वत:ला अनेकदा हास्यास्पद करून ठेवतात यात शका नाही. सघकार्यकर्ते सख्येने खूप असले तरी त्यानी आपले एक कडवे कोडाळे केले आहे आणि त्या कोडाळ्याबाहेर ते गेले की उपहासाचा विषय झाल्याखेरीज रहात नाहीत.

सघवाले हास्यास्पद ठरू द्यात हो, पण त्यामुळे बाबाचा मुद्दा कसा सिद्ध होणार ? बाबाचा मुद्दा असा की, त्याना अभिप्रेत असणाऱ्या सुधारणाना सघाचा विरोध आहे आणि तो विरोध सघवाले जनतापक्षात आल्याने प्रतिष्ठा पावेल.

संघवाले कर्मठ आहेत हे दाखवून हा मुद्दा सिद्ध होतो, असे बाबा म्हणतील.

हा अगदीच भोगळ विचार झाला. पहिली गोष्ट अशी की, संघाने काही हे कर्मकाड स्वयसेवकावर लादलेले नाही. त्या सघटनेचे स्वत चे कर्मकाड निराळेच आहे आणि कितपत कर्मकाड कोणत्याही सघटनेला आवश्यकच आहे. अहो, रोटरीक्लबाचे देखील कर्मकाड असतेच. तेव्हा फार तर असे म्हणता येईल की, ब्राह्मणी कर्मठपणाचा प्रभाव असणारी मंडळी संघात मोठ्या प्रमाणावर आहेत. दुसरे असे की, सघाने बाबाच्या सत्यशोधकी सुधारणेला कधी विरोध केल्याचाही अनुभव नाही. बाबाच्या ‘ एक गाव एक पाणवठा ’ या पुस्तकातही विरोधक संघवाले होते असे

म्हटल्याचे आठवत नाही. तेव्हा संघ जनता-पक्षात आल्याने बाबाच्या समाजसुधारणेला ग्रहण लागेल किंवा एकूण जे कोणी पुरोगामी लोक आहेत त्यांना काही पायबंद बसेल असे वाटत नाही.

असे जर आहे तर पाणचक्क्यांना राक्षस समजून त्यांच्यावर तुटून पडणाऱ्या डॉन क्विक्झोटप्रमाणे भिषग्वर्य बाबाजीराव आढाव संघावर का चाल करून जात आहेत?

## सुधारकांपुढील यक्षप्रश्न

खरी गोष्ट अशी आहे की, आपल्यापुढे कोणत्याही सुधारणेला किंवा पुरोगामी विचारांना कडवा, संघटित आणि काही श्रद्धा घट्ट रुजल्या आहेत म्हणून जन्मलेला असा विरोध झालाच नाही. इंग्रजी राज्य आल्यापासून समाजात बदल घडवून आणावा या हेतूने अनेक विचारवंतांनी अगदी टोकाचे बंडखोर विचार मांडले एवढेच काय पण कृतीदेखील केली, पण त्यामुळे त्यांची नोकरी जाऊन वृत्तिछेद झालाय्, खुनी हल्ले झालेत, जिवंत जाळून टाकलेय् असे कधी झाल्याचे ऐकलेय का?

मग तुमचे म्हणणे काय, असे व्हायला हवे होते?

मी असे म्हणत नाही की, कर्त्या सुधारकांना किंवा विचारी वा वावदूक सुधारकांना असा त्रास व्हायला हवा होता, परंतु मला इतकेच म्हणायचेय् की, सुधारकांना विरोध झाल्याची जी परदेशी किंवा आपल्याकडची जुनी उदाहरणे आहेत, त्यापुढे आधुनिक सुधारकांना सोसावा लागलेला विरोध अगदीच किरकोळ आहे.

असे कसे म्हणता? महर्षी कर्वे, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर किंवा कर्मवीर शिंदे यांना काय विरोध झाला नाही, त्रास आणि छळ सोसावा लागला नाही?

तुम्ही म्हणता त्या सुधारणावाद्यांनी हाल सोसले हे खरे; पण त्यांना सोसावा लागलेला छळ अशा कोटीचा नव्हता की त्यांची निष्ठा कसोटीला लागावी. महर्षी कर्व्यांनी पुनर्विवाह केला; पण म्हणून त्यांची नोकरी गेलीय्, त्यांच्या मुलांची लग्ने झाली नाहीत; त्यांना वाण्याकडून सामानसुमान मिळाले नाही असे काही झालेय्? काही नाही. थोडा अपमान आणि अवहेलना झाली, नाही असे नाही, पण कर्वे, आंबेडकर, शिंदे या सगळ्यांना अनुयायी मिळाले, त्यांच्या मोठ्या संस्था उभ्या राहिल्या. त्यांना जगणे अशक्य झाले, तुरुंगात जावे लागले, असे काही झाले नाही. मी असे मुळीच म्हणत नाही की, हे थोर लोक तीव्रतम कसोटीला उतरले नसते. वस्तुस्थिती अशी आहे की, तशी कसोटी कधी घेतलीच गेली नाही. याउलट राजकीय स्वातंत्र्य मागणाऱ्या टिळकासारख्या सनदशीर चळवळ करणाऱ्यांच्या किंवा सावरकरांसारख्या बेसनदशीर क्रांतिकारी पुढाऱ्यांच्या हकीकती पहा त्यांच्या आयुष्यात असे निकराचे प्रसंग आले की, जेव्हा कराल विरोधाच्या खडकावर घासून त्यांच्या निष्ठा चकचकीत करून घेतल्या गेल्या आपल्या चळवळीची दिशा कोणती, आपली आजवरची वाटचाल कुठवर आली याचा हुडसूनखडसून आढावा त्यांना स्वतःशीच घ्यावा लागला

मग तुम्हाला म्हणायचेय् तरी काय?

ही झाली पाऊणशे वर्षांपूर्वीच्या सुधारणावादी चळवळीची हकीकत. गेल्या तीस-चाळीस वर्षांत स्थिती तर अशी आहे की, कोणत्याही सुधारणेला कडवा विरोध होणे दूरच राहो, पण निदान सुशिक्षित आणि बोलघेवड्या समाजाकडून सुधारणेचे स्वागतच झाले आहे. अहो, चरक-पथ-होकायंत्र खपविण्यासाठी काढलेल्या मासिकांनी आपला प्रसार व्हावा म्हणून सुधारणेची तळी सतत उचलून धरली आहे, यावरून सुधारणेची बाजू किती लोकप्रिय आहे ते पहा. खुद्द बाबा आढावांचा 'एक पाणवठा' तर सरकारने स्वतःची चळवळ म्हणून अंगिकारला आहे. तेव्हा किरकोळ अपवाद वगळता कोणत्याही सुधारणेला जाहीर, संघटित आणि कडवा विरोध झाल्याचे उदाहरण नाही.

हे सगळे ठीक आहे आपल्याकडील सुधारणांचा बहुतेक प्रवास अल्पविरोधी झाला हे मान्य केले पाहिजे. युरोपातील प्रबोधनयुगात जसे जिवंत जाळणे, हातपाय तोडणे, वर्षानुवर्षे तुरुंगात खितपत पडणे, देशोधडीला लागणे असे छळ नवविचार-प्रवर्तकांना सोसावे लागले तसे आपल्याकडे काही झाले नाही. कारण, राजसत्तेचा सुधारणेला विरोध नव्हता; पण त्यामुळे आपली सुधारणा बिनकसाची, हीणमिश्रित किंवा कमी दर्जाची ठरते, असे तर नाही?

छे, छे, तसं अजीबात नाही. प्रश्न असा आहे की, सुधारणेचा वारू असा चहू दिशांनी चौखूर उधळत असताना आणि बुद्धिवादी विचाराचे एकनिष्ठ शिलेदार बाबाराव आढाव, तरुणाईचे तारणहार 'साधना'कार लोखंडी सामानाची जाहिरात करणाऱ्या मासिकाचे परदेश-विद्या-विभूषित संपादक अशी खंदी मंडळी त्या अश्वाचे रक्षण करीत असताना प्रत्यक्षात फारशी सुधारणा दिसत नाही असे ना. ग गोरे, ग. बा. सरदार इत्यादी सुधारणाप्रेमी पोक्त मंडळी का म्हणत असतात? विरोध नसूनही सुधारणा मात्र जिथल्या तिथेच राहिलेली दिसते ती का?

## आत्मवंचना

मग या यक्षप्रश्नाचे उत्तर काय?

या प्रश्नाचे उत्तर तिहेरी आहे पहिले असे मानावे की, पुरेशी सुधारणा झाली आहे आणि आता आपण अशा अवस्थेला पोचलो आहोत की यापुढे आपली सुधारणा होत जाईल. सुधारणावादी असे बिरुद लावून मुद्दाम समाजात काही बदल घडवून आणावेत अशी जरूर आता उरलेली नाही थोडक्यात म्हणजे सुधारणेचे दुकान बंद करावे हे उत्तर काही कुणाला पटेल असे वाटत नाही. दुसरे उत्तर असे की, समाजसुधारणेला विरोध आहे, तीव्र, कठोर आणि निकराचा विरोध आहे. फक्त तो छुपा आहे हे उत्तर बाबा आढावांना मान्य होणारे आहे. त्यासाठी तर ते नवे नवे सुधारणा-विरोधक शोधून काढीत असतात. त्यातला नुकता लाभलेला शोध संघवाल्यांचा! आपल्या इंदिराबाईंचे असेच होते.

ते कसे काय?

त्याचे असे झाले की, बाईंनी उघडली दारिद्र्याविरुद्ध मोहीम. पहिल्यांदा म्हणाल्या, 'हे मोरारजी-निजलिंगप्पा-स. का. पाटील मला बँकांचे राष्ट्रीयीकरण करू देत नाहीत. यांना हाकला!' हाकलले; पण दारिद्र्य हटले नाही. नंतर म्हणाल्या, 'संस्थानिकांचे तनखे बंद केले पाहिजेत. त्यासाठी लोकसभेत मला प्रचंड बहुमत हवे.' बहुमत मिळाले. दारिद्र्य हटले नाही. मग म्हणाल्या, 'हे सुप्रीम कोर्ट म्हणजे घोड आहे तिथले न्यायाधीश बदला.' बदलले. दारिद्र्य हटले

नाही म्हणाल्या, 'घटनेत दुरुस्ती करा.' केली दारिद्र्य हटले नाही म्हणाल्या, 'वर्तमानपत्राची मुस्कटदाबी करा. विरोधी पक्षाना तुरुगात टाका.' टाकले. दारिद्र्य हटले नाही. कळून फक्त इतकेच चुकले की, बाई स्वत ला आणि इतराना फसवीत होत्या. बाबाचेही तसेच होणार. विरोधकांचे कागदी रावण उभे करायचे आणि जाळायचे; स्वत: जिंकल्याचा पाचजन्य वाजवायचा, या आत्मवचनेच्या खेळात रमण्यापलीकडे बाबाच्या लेखात तथ्य नाही.

उत्तराचा तिसरा पदर कोणता ?

मला वाटते की, हे तिसरे उत्तर खरे आहे. समाजसुधारणेला विरोध नसतानाही सुधारणा होत नाही याचे कारण उदासीनता हे आहे. विरोधाला तुम्ही उत्तर देऊ शकता; पण उदासीनतेवर औषध नाही. समाज हा विस्कळित, विखुरलेला आणि खिळखिळा झालेला असल्याने, त्याचे सघटन नष्टप्राय झाल्याने, कुठलीही सुधारणा कृतिसपन्न होत नाही. त्याचप्रमाणे विरोधाखाली दडपलीही जात नाही.

जरा उदाहरणानी बोला.

असे पहा, अस्पृश्यतेला तुमचा विरोध आहे की नाही ?

आहे.

तथाकथित अस्पृश्याबरोबर जेवणे, त्याच्याबरोबर राहणे असे करायला तुम्हाला संकोच वाटणार नाही ना ?

मुळीच नाही.

पण या गोष्टी जाणूनबुजून करण्याची वेळ तुमच्यावर कधी येते का ? तुमच्या घनिष्ठ मैत्रीत हरिजन येत नाहीत, तुमच्या शेजारी–पाजारी हरिजन राहात नाहीत. शाळेत तुमच्या वर्गात बहुधा हरिजन नसतीलच कॉलेजात असले तरी त्याच्याशी सबध येण्याचं कारण नसणार मग अशा स्थितीत तुमचा अस्पृश्यताविरोध केवळ शाब्दिक राहणार. यापलीकडे तो जायला हवा असेल तर तुम्ही स्वतःहून हरिजनांत मिसळले पाहिजे जे सहजी होत नाही ते चाकोरी सोडून मुद्दाम केले पाहिजे.

पण असे करण्याइतकी सवड आणि उत्साह काही माझ्यात नाही

## प्रतिभाशाली नेतृत्व

आपल्या स्वराज्याच्या चळवळीची अशीच स्थिती होती. स्वराज्य कोणाला नको होते ? पण त्यासाठी परिणामकारक कृती आपल्यासारख्या सामान्याकडून होईल असे कुणाला वाटत नव्हते. तथापि त्या चळवळीला टिळक–गाधीचे प्रतिभाशाली नेतृत्व लाभले. त्यानी स्वराज्य प्रत्येकापर्यंत पोचविले. सामान्यातल्या सामान्य माणसाला आपण स्वराज्यासाठी काही केले पाहिजे असे वाटण्याइतकी प्रेरणा दिली. खादी, स्वदेशी, असहकार, सत्याग्रह यासारखे कोणालाही अवलंबिता येतील असे कार्यक्रम दिले. दुर्दैवाने सुधारणावादी चळवळीला असे सर्वस्पर्शी स्वरूप कधी आलेच नाही. महात्मा फुल्याचा जुना अपवाद सोडला तर त्या चळवळीला प्रतिभाशाली नेतृत्वही लाभले नाही. आज अशी स्थिती आहे की, आदिवासी–अस्पृश्यता–स्त्रीस्वातत्र्य इत्यादी बाबतीतील सुधारणाना सघटित, उघड आणि कडवा विरोध कोणाचाही नाही; पण त्या सुधारणा उत्साहाने प्रत्यक्षात कोणी आणीत नाही परिस्थितीच्या रेट्याखाली जे होईल ते होईल.

मग तुमचे म्हणणे काय की, सुधारणावाद्यानी अशा अलौकिक नेतृत्वाची वाट पाहात स्वस्त बसावे ?

मुळीच नाही; पण आपण कोणी तरी प्रेषित आहो, झपाटलेले आहोत असा आव आणून, त्या झपाटलेपणाच्या प्रमाणात प्रत्यक्षात काम होत नाही असे दिसल्यावर, कोणी तरी शत्रू उभे करून त्याच्यावर वार करण्याचे नाटक तरी करू नये आपापल्या वकुबाप्रमाणे काम करीत राहावे. सुधारणेला विरोध करणाऱ्याना समाजाची सहानुभूती लाभेल अशी स्थिती आज नाही. हेही थोडे नव्हे.

□

---

**पुढील अंकी** नगरजिल्ह्याचे खास वार्तापत्र

# धरणाचे पाणी पेटले आहे

चंद्रकांत दीक्षित

---

# काश्मीर

## अब्दुल्लांचा प्रभाव कायम

वा. दा. रानडे

काश्मीरच्या विधानसभा निवडणुकानी सध्याच्या निवडणुकातील शेवटचा टप्पा संपला. निवडणुकाना सुरुवात गोव्यापासून झाली व शेवट काश्मीरने झाला. गोव्यात महाराष्ट्रवादी गोमंतक या प्रादेशिक पक्षाचा विजय झाला आणि काश्मीरमध्येही नॅशनल कॉन्फरन्स या प्रादेशिक पक्षाच्याच हाती सत्ता गेली. दक्षिणेकडे तामिळनाडूत अण्णा द्र. मु. क. पक्षाचे सरकार आले तर उत्तरेत पंजाबात अकालीना निर्णायक बहुमत मिळाले नाही, तरी सत्तेत प्रमुख भागीदारी मिळाली. सात राज्यात जनतापक्षाने मोठा विजय मिळविला खरा; पण प्रादेशिक पक्षापुढे त्याला हार खावी लागली. या राज्यांमधील पराभवाचे जनतापक्षाने प्रामाणिक आत्मनिरीक्षण करून आपल्या चुका सुधारल्या पाहिजेत.

गोवा, तामिळनाडू, पश्चिम बंगालप्रमाणेच काश्मीरमध्येही जनतापक्षाचे अंदाज चुकले. विधानसभेच्या ७६ जागापैकी ७५ जागाचे निकाल जाहीर झाले. त्यात नॅशनल कॉन्फरन्स ४७, जनता १३, कॉंग्रेस ११ व अपक्ष ४ अशी जागाची विभागणी आहे. मतदानाचे आकडे अजून उपलब्ध नाहीत. त्यावरून नॅशनल कॉन्फरन्सला मिळालेल्या पाठिंब्याची अधिक स्पष्ट कल्पना येईल. जनता आणि कॉंग्रेस यांची मते विभागली गेल्याचा फायदा नॅशनल कॉन्फरन्सला किती मिळाला हेही कळून येईल.

शेख अब्दुल्लाच्या नॅशनल कॉन्फरन्सला निर्णायक बहुमत मिळाले असले तरी १९५७ व १९६२ च्या विजयाची पातळी गाठता आलेली नाही. एकूण ७५ जागापैकी या पक्षाला १९५७ मध्ये ६९ व १९६२ मध्ये ७० जागा मिळाल्या होत्या. १९६२ च्या ७० जागापैकी ३१ जागा तर बिनविरोध जिंकलेल्या होत्या. शेख अब्दुल्लांना १९५३ मध्ये पदच्युत करण्यात आले. त्यानंतरही १९६२ च्या निवडणुकीपर्यंत नॅशनल कॉन्फरन्स हाच जवळजवळ एकमेव पक्ष काश्मीरमध्ये होता इतर पक्ष नाममात्र होते. पुढे कॉंग्रेसने काश्मीरमध्ये आपली शाखा काढण्याचे ठरविले आणि नॅशनल कॉन्फरन्स कॉंग्रेसमध्येच विसर्जित झाली. बक्षीची कॉंग्रेसमधून हकालपट्टी झाल्यानंतर त्यांनी नॅशनल कॉन्फरन्स पुन्हा स्थापन केली. १९६७ च्या निवडणुकाही या पक्षाने मिळविल्या; पण बक्षी त्याला पूर्वीचे स्थान मिळवून देऊ शकले नाहीत. १९६७ च्या निवडणुकीत त्यास फक्त ८ जागा व २१·६५ टक्के मते मिळाली शेख अब्दुल्लानी पुनरुज्जीवित केलेल्या नॅशनल कॉन्फरन्सने मात्र या वेळी ४७ जागा जिंकून काश्मीरमध्ये सत्तारूढ पक्षाचे स्थान मिळविले आहे.

नॅशनल कॉन्फरन्सचा प्रभाव काश्मीर-खोरे आणि जम्मू प्रातातील दोन मुस्लीम वस्तीच्या जिल्ह्यातच आहे. काश्मीर खोऱ्यातील ४२ पैकी ४० जागा शेख अब्दुल्लाच्या पक्षाने जिंकल्या व बाकी फक्त २ जागा जनतापक्षास मिळाल्या. जम्मू प्रातातील ३२ जागापैकी नॅशनल कॉन्फरन्सला फक्त ७ मिळाल्या. जम्मू प्रातातील हिंदूंचा पाठिंबा मिळविण्यात अब्दुल्लाना यश आलेले नाही. तसेच मुस्लिमांचा मोठ्या प्रमाणावर पाठिंबा कॉंग्रेस व जनतापक्ष मिळवू शकलेले नाहीत.

काश्मीर-निवडणुकात १९६७ व १९७२ मध्ये चागला विजय मिळविणाऱ्या कॉंग्रेसला या वेळी फक्त ११ जागा मिळाल्या. कॉंग्रेसला १९६७ मध्ये ६० व १९७२ मध्ये ५७ जागा मिळाल्या होत्या. हे यश चागले असले तरी पूर्वीच्या नॅशनल कॉन्फरन्सच्या तुलनेने कमी होते. नॅशनल कॉन्फरन्सने १९५७ मध्ये ६९ व १९७२ मध्ये ७० जागा जिंकल्या होत्या. १९६७ व १९७२ च्या निवडणुकाचा विचार करताना लक्षात घ्यावयाची आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेख अब्दुल्ला त्या काळात स्थानबद्ध होते. त्यांनी स्थापन केलेल्या सार्वमत आघाडीने निवडणुकावर बहिष्कार टाकला होता. अब्दुल्ला मोकळे असते आणि त्याच्या पक्षाने निवडणुकात भाग घेतला असता तर कॉंग्रेसला एवढे यश मिळाले असते की नाही याची शंका आहे. कॉंग्रेसचा तो विजय शेख अब्दुल्लांच्या गैरहजेरीतला होता हे विसरून चालणार नाही. कॉंग्रेसचा शेख अब्दुल्लांशी उघड सामना या वेळच्या निवडणुकीत प्रथमच झाला आणि या सामन्यात अब्दुल्लानी निर्णायक सरशी मिळविली. काश्मिरी जनता माझ्यामागे आहे असा दावा अब्दुल्ला करीत असत. आणीबाणीतच स्थानिक निवडणुका घेऊन आणि त्या स्वतःच्या बळावर लढवून हा दावा सिद्ध करण्याचा त्यांचा विचार होता; पण इंदिरा गांधींनी दडपण आणून त्याना निवडणुका पुढे ढकलायला लावल्या. १९७७ च्या लोकसभा-निवडणुकात या दोन पक्षाचा समझोताच होता. त्यामुळे अब्दुल्लाच्या पक्षाचे बळ स्वतंत्रपणे अजमावले गेले नाही. लोकसभा-निवडणुकीतील पराभवानतर कॉंग्रेसने अब्दुल्लाशी समझोता मोडला. विधानसभेत आपले बहुमत असल्याने केवळ कॉंग्रेसचे सरकार काश्मीरमध्ये बनविता येईल असा कॉंग्रेसनेत्याचा मनसुबा होता, पण शेख अब्दुल्लानी विधानसभा विसर्जित करून नव्या निवडणुका घेण्याचा सल्ला दिला व राज्यपालानी तो मान्य केला. निवडणुकीत मतदारानी त्याच्या पक्षाच्या बाजूने कौल दिला.

जनतापक्ष नवा. त्याला काश्मीरमध्ये पाया नाही; पण जनतालाट काश्मीरमध्येही असल्याच्या कल्पना करून घेऊन त्याने मोठ्या प्रमाणावर जागा लढविल्या. कॉंग्रेसमधून फुटलेले लोक आणि पूर्वीचा जनसघ मिळून जनतापक्ष बनला शेख मीरवैज फरुक यांच्या अवामी अॅक्शन कमिटीने त्यास पाठिंबा दिला; पण देशाच्या इतर भागांत जनतालाट असली तरी काश्मीरमध्ये अजून अब्दुल्लालाटच प्रभावी आहे हे निकालांनी दाखवून दिले

काश्मीरला खास दर्जा देणारे ३७० कलम रद्द करण्याचा जनतापक्षाच्या नेत्याचा विचार आहे हे कलम रद्द करणे म्हणजे काश्मीरच्या स्वायत्ततेवरच घाव घालणे होय, असा प्रचार शेख अब्दुल्लानी केला. हे कलम रद्द होणार असेल तर भारतातून फुटून निघण्याचीही धमकी त्यानी दिली. हे कलम रद्द करण्याचा आमचा विचार नाही असा खुलासा जनतापक्षाच्या नेत्यानी केला तरी मतदारावर त्याचा प्रभाव पडला नाही. अब्दुल्लाचे प्रादेशिक आवाहनच अधिक प्रभावी ठरले.

निवडणुकाचा कौल मान्य करून शेख अब्दुल्लाच्या सरकारला सहकार्याचे आश्वासन पंतप्रधान मोरारजी देसाई व चरणसिंगांनी दिले असून शेख अब्दुल्लानीही सहकार्याचा प्रतिसाद दिला आहे हे लक्षात घेता केंद्र व काश्मीरचे संबंध संघर्षाचे होतील असे वाटत नाही. काश्मीर भारताचा अविभाज्य भाग असल्याचे शेख अब्दुल्लानी मान्य केलेले आहेच. काश्मीरच्या विकासाला अधिक मदत करून काश्मिरी जनतेशी अधिक जवळीक साधण्याचे प्रयत्न केंद्राने आता करायला हवेत. ❑

आर्थिक टिपणे :

# □ हिऱ्यांचा व्यापार □ गोडे तेल □ प्रदूषण

नारायण वैद्य
सभासद, पुणे म. न पा.

## गरीब भारत–हिऱ्यांचा व्यापारी !

हिरे सापडतात कोळशाच्या खाणीत ! परंतु अमतनगर नावाच्या कोण्या एका गावी एका शेतकऱ्याला शेत नागरताना हिरा सापडला असे वृत्तपत्रात वाचले. त्या गावी म्हणे असे हिरे अनेकदा सापडले आहेत !

उत्तम दर्जाचे हिरे भारत, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका या देशात कोळशाच्या खाणीत सापडतात. हिरा म्हणजे शुद्ध कोळसा–कार्बन. ३५७० अंश सेंटिग्रेडपर्यंत तापविल्यास तो वितळतो ढेकणाच्या रक्ताने हिरा दुभगतो ही झाली दतकथा ! परतु हिऱ्याइतकी कठीण वस्तू जगात दुसरी नाही. प्रकाशमान हिरे अलकार म्हणून वापरतात; परंतु दुय्यम दर्जाचे हिरे काच कापण्यासाठी आणि खडक फोडण्याच्या यत्रात वापरतात. मॉईसन नावाच्या शास्त्रज्ञाने १८९३ मध्ये प्रथमच कृत्रिम हिरा तयार करण्यात यश मिळविले. जगातले उत्कृष्ट हिरे म्हणजे कोहिनूर (१८६ कॅरट), पिट् (१३६·५ कॅरट) आणि होप (४४ ५ कॅरट).

आज गरिबीने ग्रासलेला भारतदेश फार पूर्वीपासून हिऱ्याचा व्यापार करीत आहे यावर कोणाचा विश्वास बसेल काय ? १९७६–७७ मध्ये हिरे, इतर मौल्यवान खडे (नील, पाचू, माणिक इ.) आणि ज्युवेलरी याची भारतातून २६४ २१ कोटी रुपयाची निर्यात करण्यात आली त्यापूर्वीच्या वर्षापेक्षा ही १०० टक्क्यानी अधिक आहे. यात मुख्यत्वे पैलू पाडलेले हिरे २३१ कोटी रुपयाचे आहेत. इतर मौल्यवान खडे १३ टक्के आणि ज्युवेलरीचे इतर प्रकार ३ टक्के आहेत. केवळ येथे मिळणारे हिरेच फक्त निर्यात होतात असे नाही. पैलू न पाडलेले हिरे (raw diamonds) आयात करून पैलू पाडून त्यांची निर्यात करणे हाही उद्योग मोठ्या प्रमाणावर चालतो.

जेम अँन्ड ज्युवेलरी एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिलचे चेअरमन श्री. जवाहर पाक्यान म्हणाले, 'या उद्योगाला सरकारकडून योग्य ते साहाय्य मिळाले तर १९८१–८२ पर्यंत वार्षिक हिऱ्याचा व्यापार १००० कोटीच्या घरात जाईल. इतकेच काय परतु या उद्योगात कारागीर, विक्रेते इ. धरून देशातल्या सुमारे १० लक्ष लोकाना काम मिळेल. सवलती कोणत्या तर काही व्यापाऱ्याचे म्हणणे असे आहे की, 'बँका आम्हाला ११½ टक्के दराने कर्ज देतात, हा दर कमी व्हावा. इस्रायली व्यापारी–ज्याचा या जागतिक व्यापारात मोठा भाग आहे–त्याना ६टक्क्याने कर्ज मिळते. त्याचप्रमाणे इस्रायल आणि बेल्जममध्ये हिऱ्यावर आयातकर नाही; पैलू पाडण्यासाठी हिरे आणि पॉलिश करण्यासाठी मोती (Raw) याची भारतात मोठ्या प्रमाणावर आयात होते. त्यावरचा आयात–कर ५ ते ४५ टक्के आहे, तो कमी व्हावा !'

पैलू पाडलेले हिरे जपान भारतात खरेदी न करता बेल्जमद्वारे खरेदी करतो. गतवर्षी जपानची हिऱ्याची आयात २३० कोटीची आहे, त्यात भारताचा वाटा फक्त ११ कोटी रु आहे. जपानमध्ये शिष्टमडळ पाठवून 'भारतीय हिरे त्यानी येथून खरेदी करावेत' अशी मागणी करावयास पाहिजे. तेल निर्यात करणाऱ्या अरब देशात हिऱ्यांचा खप मोठा आहे आणि त्या अरब देशांशी भारताचा होणारा व्यापार हा नेहमी परकीय चलनाच्या दृष्टीने तोटयात (deficit) चालतो. ही तूट कमी करण्यासाठी हिऱ्याच्या निर्यातीचा उपयोग होईल.

(गेल्या वर्षी इराककडून आपण २०० कोटी रुपयाचे क्रूड तेल आयात केले. शिवाय ५ कोटी रुपयाचा खजूर व ७ कोटी रुपयाचे सल्फर आयात केले. उलट भारताने इराकला निर्यात केलेल्या यंत्रसामुग्री व इतर उत्पादित वस्तू फक्त ५० कोटी रुपयाच्या होत्या म्हणजे इराकशी गेल्या वर्षी १६२ कोटी रुपयानी 'तोटयाचा' व्यापार झाला. या वर्षी ही तूट २४० कोटी रुपयापर्यंत जाईल असा अदाज आहे.)

हिरे, मोती इत्यादीचे दागिने बनविण्यासाठी लागणारे सोने आंतरराष्ट्रीय दराने कारागिराना उपलब्ध झाले तर अधिक बरे. हिऱ्याचा व्यापार भारतात फार प्राचीन काळापासून आहे. कौटिलीय अर्थशास्त्रात 'जवाहिऱ्याचे व्यापारी तत्र' कसे असावे यासबधी सखोल विवेचन आहे. □

## गोडे तेल अजून कडूच !

या कॅलेंडर वर्षाच्या सुरुवातीला खाद्य-तेलाची आयात करण्यासाठी एकूण ५४० कोटी रुपयाचे परवाने देण्यात आले होते. त्यातल्या अनेक परवानाधारकानी परवान्याचा दुरुपयोग केला व देशाबाहेर खरेदी केलेले तेल तेथेच जादा भावाने परस्पर विकून लाखो रु. नफा मिळविला अशी जाहीर चर्चा होऊन गेली. यातील 'गुन्ह्यासंबधीचे सशोधन सी. बी. आय. कडे सोपविले आहे. श्री. मोहन धारिया यानी लोकसभेत सागितले की, 'आयात परवान्याचा दुरुपयोग केल्याची १३ प्रकरणे सी. बी. आय. कडे सोपविली आहेत.' दाषी असणाऱ्याची जी

यादी सरकारने प्रसिद्ध केली आहे तीत ज्याप्रमाणे वायदेबाजार करणारे, आहेत त्याचप्रमाणे वनस्पतिउत्पादकही आहेत. अशाना स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने काही माल (आयात तेल) पुरविला असेल तर हे प्रकरण फारच गंभीर आहे.

गेल्या नोव्हेंबरपासून स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने सरसू, सोयाबिन आणि पाम यांच्या तेलाची सुमार ३ लक्ष ६० हजार टनांची आयात केली आहे. शिवाय ६० हजार टनांची मागणी नोंदविली आहे. येत्या सप्टेंबरअखेर एकूण आयात ५ लक्ष टनांची होईल असा अंदाज आहे खाजगी उद्योगांनी ८० हजार टन खाद्य तेल आयात केले आहे. सप्टेंबरपर्यंत १ लक्ष २० हजार टन तेल याशिवाय येईल. एकूण सर्व आयात ७ लक्ष टनापर्यंत जाईल, म्हणजे एका वर्षात जी तूट पडणार असे वाटते तेवढे खाद्यतेल देशात आयात होईल. देशात पिकणाऱ्या खाद्यतेलबियांचा पुरवठा कमी पडल्यामुळे प्रचंड भाववाढ ज्या काळात झाली त्या मार्च ७७ नंतरच्या काळातच (वरीलप्रमाणे) बरेचसे खाद्यतेल आयात झाले आहे तरी सुद्धा तेलाचे भाव चढत राहिले याचे कारण काय ?

वनस्पतीचे उत्पादन मात्र वाढत आहे आणि जानेवारी ७७ ते डिसेंबर ७७ या काळात ते एकूण ६ लक्ष टनापर्यंत जाईल. गेल्या वर्षापेक्षा हे १० टक्क्याने अधिक आहे आणि त्यामागील वर्षापेक्षा ५० टक्के अधिक आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किंमती एप्रिल-मेमध्ये खूपच वर होत्या, त्या आता २० ते ३० टक्क्यांनी खाली आल्या आहेत. वनस्पतिउत्पादनही वाढत आहे तरी भाव खाली का येत नाहीत ? सरसू, सोयाबिन किंवा पाम यांची तेले भुईमुगाच्या बदली खाद्यतेल म्हणून वापरता येत नाहीत यंदाचे भुईमुगाचे वार्षिक उत्पादन ४ लक्ष टनांनी कमी होईल असा अंदाज आहे. तेव्हा वनस्पतिसाठी भुईमुगाच्या ऐवजी इतर तेलेच वापरली तर प्रत्यक्ष शेंगदाणा तेल खाण्यासाठी जनतेला उपलब्ध होईल.

म्हणून वनस्पती तयार करणाऱ्या कारखान्यांनी काही वर्षे शेंगदाणा-तेल वनस्पतिसाठी न वापरता इतर तेले वापरण्याचे ठरविणे आवश्यक आहे. तशी सक्ती वेळप्रसंगी सरकारने केली पाहिजे म्हणजे रोजच्या स्वयंपाकात गोडे तेल स्वस्ताईने वापरता येईल गोडे तेल महाग होण्याचे कारण या तेलाचा तुटवडा ! हा तुटवडा पडण्याचे कारण वनस्पतिकारखानदार या तेलाचा वापर मोठ्या प्रमाणावर करतात !

दुसरा उपाय असा की, भुईमुगाचे पीक वाढविण्याच्या मागे लागले पाहिजे. केरळ, महाराष्ट्र इ. राज्यांनी यासंबंधीच्या पायलट योजना सुरू केल्या आहेत गुजराथसारख्या राज्यांनी यात अधिक लक्ष घातले पाहिजे

तिसरा उपाय म्हणजे ग्रामोद्योगात तेलघाण्यांना प्राधान्य दिले पाहिजे. तेलघाणा म्हटला म्हणजे बैलाने फिरविण्याचा घाणा डोळ्यासमोर येतो. यांत्रिक पद्धतीने थोड्या भांडवलावर चालू करता येतील अशी यंत्रे खेड्यातून वापरण्याला प्रोत्साहन देणे फायद्याचे होईल. वाहतुकीमुळे तेलाची वाढणारी किंमत कमी होईल. पेंडीसारखे उपयुक्त खत हाताशी राहील देशातल्या प्रत्येक घरी गोडे तेल वापरतात तेवढे वनस्पती तूप सर्वत्र वापरले जात नाही. गरीब लोक तर मुळीच वापरीत नाहीत. ते स्वस्त करण्याचे 'आयाती' व्यतिरिक्त इतर 'देशी' उपाय शोधणे महत्त्वाचे !

□

## धूर आणि दूषित हवा

१९६८ मध्ये 'अपोलो १०' हे यान चंद्रपर्यटन करून पृथ्वीवर, परत आले त्यातील प्रवाशांनी दूर अंतरावरून पृथ्वीचे अनेकवार जे निरीक्षण केले त्यातील एक गमतीदार भाग असा : अंतरिक्षात शेकडो मैल दूर अंतरावरून लॉस एंजल्स शहर त्यांना सहज ओळखता आले. कारण दक्षिण कॅलिफोर्नियातील या विस्तीर्ण शहरावर 'धुराचा' एक जाड पडदा तयार झाला होता.

काही वर्षांपूर्वी फेब्रुवारी महिन्यात टाटा इलेक्ट्रिक कंपनीचे धारावी येथील पॉवर रिसीव्हिंग केंद्र एकाएकी बंद पडले. १०० किलोवॅट स्विचयार्डवर काजळी आणि धूळ यांचा इतका दाट थर जमला होता की, इन्शुलेटर्स खराब होऊन जळले. दिल्लीमध्ये कॅनॉट प्लेसजवळील इन्द्रप्रस्थ विद्युतकेंद्र प्रतिदिनी ६० टन सल्फर डायऑक्साइड व २० टन काजळी बाहेर टाकते.

डेहराडूनच्या इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पेट्रोलियमने असे एक द्रव्य शोधून काढले आहे की, वाहनात वापरल्या जाणाऱ्या पेट्रोलमध्ये ते वापरल्यास धूर आणि इतर अपायकारक वायू मोटारइंजिनात अगदी कमी प्रमाणात तयार होतात व मोटारीच्या इंजिनातून जो धूर एकसारखा बाहेर पडत असतो तो खूपच कमी होतो

औद्योगिक कारखाने, औद्योगिक विद्युतकेंद्रे, रासायनिक द्रव्यांचे, औषधांचे कारखाने, खतांचे कारखाने, धातुशुद्धीकरणाचे कारखाने, यामधून दररोज लक्षावधी घनमीटर धूर आणि विषारी वायू बाहेर पडत असतात. त्यामुळे विशेषत कारखान्यांच्या परिसरातील हवा मोठ्या प्रमाणावर दूषित होत असते. शरीराला शुद्ध हवेचा पुरवठा होऊ शकत नाही त्यामुळे शरीरे कमकुवत व खुरटी होतात. फुप्फुसाचे रोग, हृदयविकार इत्यादी उद्‌भवतात. औद्योगीकरणाच्या अनेक फायद्याबरोबर हा तोटाही माणसाला सहन करावा लागतो. अशा प्रकारे हवेचे होणारे प्रदूषण कसे टाळावयाचे हा औद्योगिक देशातला एक गहन प्रश्न बनला आहे.

मॉस्को शहरातील हवेचे प्रदूषण टाळण्यासाठी तेथील रस्त्यावर दररोज धावणाऱ्या सुमारे ३५००० ट्रकना पेट्रोलऐवजी द्रवरूप वायू वापरण्याची सक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे हवेचे प्रदूषण खूपच कमी झाले आहे असे म्हणतात !

□

पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# फीवाढ : आंदोलन आणि भूमिका

जयंत म्हाळगी

**१९७६–७७** या आर्थिक वर्षात पुणे विद्यापीठाला४९·३३लाख रु. तोटा आल्याने विद्यापीठाच्या ताळेबंदात एकूण ९८·३४ लाख रुपयाचा तोटा दिसू लागला. हा तोटा कसा दूर करता येईल यांवर विचार करण्याकरिता जोगसमिती नेमली गेली. मार्च १९७६ मध्ये जोगसमितीने विद्यापीठाला आपला अहवाल सादर केला. ट्यूशनफी, परीक्षाफी, प्रवेशफी, गुणपत्रिकासाठी भरण्याची रक्कम, ग्रंथालय व प्रयोगशाळाची फी, लेटफी, वसतिगृहाचे दर यात वाढ करून तोटा कमी करण्याचा मार्ग या अहवालात सुचविला होता. विद्यापीठाने तो तातडीने अमलात आणायचे ठरविले. मार्च १९७७च्या सिनेट–मीटिंगमध्ये जे बजेट मजूर करण्यासाठी ठेवण्यात आले त्यात ही फीवाढ सुचविलेली होती ऐन आणीबाणीत ही वाढ सुचविली गेल्यामुळे विद्यार्थ्यांना याविरुद्ध निषध नोंदविणे शक्यच नव्हते. सिनेटमधील विद्यार्थिनेते गजाआड बंद असल्यामुळे यावर एकत्र येऊन, विचार करून काही पर्याय काढण्यास अवसरच मिळाला नाही. आणीबाणीनतर मार्च७७'च्या सिनेट–मीटिंगमध्ये प्रकाश जावडेकर, रवी सूर्यवंशी, प्रमोद मंगरूळकर, मृणाल देव या विद्यार्थिप्रतिनिधींनी या विधेयकाला जोरदार विरोध केला. कपात किंवा बदल सुचविण्याची मुदत सपली असल्यामुळे विद्यार्थिप्रतिनिधी प्रकाश जावडेकर याने निषेध म्हणून या ठरावावर तहकुबीची सूचना माडली. सर्व प्राध्यापक व इतर सिनेटसदस्यांनी ती बहुमताने उचलून धरल्याने विद्यार्थ्यांनी आणलेली तहकुबी यशस्वी होण्याचा हा पहिलाच प्रसंग. 'फीवाढीचा प्रश्न योग्य रीतीने सोडविला पाहिजे. यासाठी प्राचार्य आणि विद्यार्थी याना पूर्ण विश्वासात घेतले पाहिजे' अशी स्पष्ट सूचना जोग–समितीने आपल्या अहवालात दिली होती; परतु आणीबाणीच्या दडपशाहीचा फायदा घेऊन विद्यार्थ्यांची मते अजमावून घेण्याचे टाळले गेले.

वरील सिनेट–मीटिंगपूर्वी १० मिनिटे अगोदर विद्यार्थिपरिषदेचे शिष्टमडळ कुलगुरूना भेटले. कुलगुरूनी फीवाढ ही कशी समर्थनीय आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केल्यामुळे परिषदेच्या शिष्टमडळाने सिनेट–मीटिंगसमोर निदर्शने केली. फीवाढ–आदोलनाची ही सुरुवात होय.

फीवाढीचा प्रश्न हा अतिशय मोठा आणि सर्वव्यापी असल्यामुळे याविरुद्ध मोठ्या प्रमाणावर आदोलन उभे करण्याकरिता १५ जून रोजी विद्यार्थी-कृतिसमितीची स्थापना करण्यात आली. यात विद्यार्थिपरिषद, पतितपावन, युवजन–सभा आणि लोकतांत्रिक युवामच याचा सहभाग होता. मेडिकल, इंजिनियरिंगच्या जागा वाढविण्याबाबतचे आदोलन ऐन भरात आलेले असतानाच फीवाढविरोधी आंदोलन पेट घेत होते. याचा एक भाग म्हणून मेडिकल, इजिनियरिंगच्या जागा वाढविण्याबाबत राज्यमंत्री श्री. रत्नाप्पा कुभार याना घातलेल्या घेरावप्रकरणात फीवाढ रद्द करण्याची मागणीदेखील प्रकर्षाने होती. दिनाक २४ जून रोजी कृतिसमितीचा मोर्चा कुलगुरूना या प्रश्नाबाबत भेटायला गेला असता कुलगुरूनी या मागण्याचा फेरविचारही करण्यास नकार दिला कुलगुरू हे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालक असल्यामुळे त्यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्या शासनाच्या कानावर घालाव्यात अशी कृतिसमितीची भूमिका होती. कुलगुरूनी त्यालादेखील नकार दिल्यामुळे विद्यार्थ्यांना कुलगुरूपुढे कार्यालयीन वेळात धरणे धरण्याचा कार्यक्रम करावा लागला. दुसऱ्या दिवशी कुलगुरूनी विद्यार्थ्यांच्या मागण्या राज्यपालाच्या कानावर घालण्याचे व त्याच्याशी याबाबत चर्चा करण्याचे मान्य केले. याचा निर्णय कुलगुरू ८ जुलैला देणार होते

मेडिकल–इजिनियरिंगच्या जागा वाढवून मिळाव्यात यासाठी प्रामुख्याने आदोलन उभारलेल्या 'पुणे विद्यापीठ विद्यार्थी सघटने'च्या शिष्टमडळानेदेखील २५ जून रोजी कुलगुरूची भेट घतली. त्यानादेखील सुरुवातीला सद्य परिस्थितीत फीवाढ कशी योग्यच आहे हेच ऐकावे लागले.

कुलगुरूच्या हातात ही फीवाढ रद्द करणे नाही, तसेच याबाबत त्याना फारसे अधिकारही नाहीत हे विद्यार्थि–प्रतिनिधीना माहीत होते; पण हा सर्व प्रश्न शिक्षणक्षेत्राशी पोचत असल्याने शासनापर्यंत जाण्याचा एक दुवा म्हणून विद्यार्थी कुलगुरूच्याकडे येत होते. या सर्व प्रकरणात कुलगुरूना थोडाफार त्रास सहन करावा लागला असला तरी कुलगुरू हे टारगेट म्हणून विद्यार्थ्यांच्या समोर कधीच नव्हते ४ जुलै रोजी विद्यार्थि–कृतिसमितीचे प्रतिनिधी राज्यपाल श्री. सादिक अली याना भेटले. या प्रश्नाच्या निर्णयाबाबत त्यांनी कुलगुरूप्रमाणेच आपली असमर्थता प्रकट केली. फीवाढीचा हा प्रश्न एका मूलभूत मोठ्या शैक्षणिक समस्येचाच भाग असल्यामुळे सर्व घटकांनी एकत्र येऊन त्यावर विचारविनिमय केला पाहिजे असे त्यांनी विद्यार्थ्यांना सागितले. असा एखादा सुदिन केव्हा येईल, अशी चर्चा कोण बोलावील व केव्हा बोलाविली जाईल याचा विचार सोयिस्कररीत्या टाळण्यात आला आणि ऑक्सिजनवर असलेला फीवाढीचा प्रश्न तसाच लोंबकळत राहिला.

### ५ जुलै ते १० जुलै

५ जुलै १९७७ रोजी पुणे विद्यापीठ विद्यार्थीसघटनेने कॉलेज–

बंदचा आदश दिला. मोर्चा आल्यावर अधिकाऱ्यांनी कॉलेज बंद केले. कॉमर्स कॉलेजच्या पाठोपाठ गरवारे, स. प. महाविद्यालय, फर्ग्युसन व मॉडर्न ही कॉलेजे बंद झाली. काही ठिकाणी दुपारचे वर्ग नंतर सुरू झाले तरी या प्रश्नावर कॉलेजे बंद राहू शकतात हे दिसून आले. स. प., फर्ग्युसन व मॉडर्न कॉलेजच्या काही काचा फुटल्यामुळे बरेच प्राचार्य व प्राध्यापक यावर नाराज झाले. नंतर विद्यार्थी मोठ्या संख्येने विद्यापीठात गेले. ही फीवाढ रद्द करण्यासाठी कुलगुरूंनी स्वतः प्रयत्न करावेत व तसे त्यांनी लेखी लिहून द्यावे अशी विद्यार्थिनेत्यांनी मागणी केली. कुलगुरूंनी याला नकार दिल्यामुळे कुलगुरूंना बेमुदत घेराव घालण्याचा निर्णय अंमलात आला. रात्री ९.३० वाजता काही प्राध्यापक, सिनेट व कार्यकारिणीचे सदस्य यांनी विद्यार्थ्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. या वेळी विद्यार्थ्यांच्या मागण्यांचा सहानुभूतिपूर्वक फेरविचार केला जाईल असे कुलगुरूंनी सांगितले. विद्यार्थ्यांची फीवाढ रद्द होण्याची मागणी फेरविचारात मान्य न झाल्यास आता मध्यस्थी करणाऱ्या प्राध्यापकांनी या आंदोलनात सक्रिय भाग घ्यावा असे त्यांना विद्यार्थ्यांनी सुचविले. काही तात्त्विक मतभेद व शब्दच्छल झाल्यामुळे ही शिष्टाईची बोलणी फिसकटली. अखेर कृतिसमितीला ८ जुलैला यावर फेरविचार करून निर्णय देण्याचे कुलगुरूंनी मान्य केले होते. या एका मुद्द्यावर रात्री १२.३० वाजता हा १० तासांचा घेराव संपला. वृत्तपत्रांनी मात्र या घटनेचा चांगलाच समाचार घेतला.

दिनांक ७ जुलै रोजी विद्यार्थिकृतिसमितीने एक शिक्षणपरिषद आयोजित केली होती. या फीवाढीच्या प्रश्नावर प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यापीठ, शासन, सिनेट व कार्यकारिणीचे सदस्य आणि काही शिक्षणतज्ज्ञ यांनी एकत्र येऊन आपापली मते मांडावीत, चर्चा करावी व यातून जे काही समान मुद्दे निघतील त्याच्या अनुषंगाने हे आंदोलन पुढे चालवावे असा या मागील हेतू होता. संघर्षात्मक भूमिकेबरोबरच काही विधायक मार्गांनीही विद्यार्थी प्रश्न सोडवण्यास तयार असतात हे या शिक्षणपरिषदेने सिद्ध केले. शासनाच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती या ठिकाणी प्रामुख्याने खटकली.

आणि याच प्रसंगी कुलगुरू श्री. देवदत्त दाभोळकर यांनी विद्यापीठाची संभाव्य व गतवर्षीची ट्यूशन आणि होस्टेल-फी स्थगित केल्याची घोषणा केली. या प्रश्नाची तपशीलवार मोकळेपणाने चर्चा व्हावी यासाठी अभ्यासावर आधारित अशी विधायक चर्चा घडवून आणण्याचा मनोदय त्यांनी स्पष्ट केला. या १५ ते २० जणांच्या गटात विद्यापीठ, प्राचार्य, प्राध्यापकवर्ग, विद्यार्थिप्रतिनिधी व समाजातल्या काही मान्यवर व्यक्ती असतील; बहुमत व अल्पमत या पद्धतीने या चर्चेचा निर्णय होऊ शकणार नाही; त्यामुळे प्रतिनिधित्वाकडे संख्यात्मक दृष्टिकोनातून पाहण्याचे कारण नाही; जर या समितीने एकमताने असा निर्णय दिला की, या वर्षीची व गेल्या वर्षीची फीवाढ देखील अन्याय्य आहे, तर ती रद्द करण्यात येऊन ते पैसे दुसऱ्या टर्मला जुळवून घेतले जातील असेही त्यांनी खुलासेवार सांगितले.

आंदोलनाचा एक टप्पा जरी थोडासा यशस्वी झाला असला तरी कॉलेजमधील फीवाढीचा प्रश्न अजून भेडसावतच होता. शासनाच्या चकीच्या अनुदानसूत्रपद्धतीमुळे निर्माण झालेला हा प्रश्न पूर्णपणे राज्यशासनाशी संबंधित आहे. याच सुमारास महाराष्ट्राचे मुख्य मंत्री मा. वसंतरावदादा पाटील हे पुण्यात आले होते. त्यांच्या समोर १० जुलै रोजी विद्यार्थी कृतिसमितीतर्फे निदर्शने आयोजित केली गेली. मा. मुख्य मंत्र्यांना घेराव घालण्याचा, धरणे धरण्याचा किंवा गाडी अडविण्याचा निदर्शकांचा विचार नाही हे आदल्या दिवशीच असिस्टंट पोलिसकमिशनराची भेट घेऊन सांगण्यात आले होते. मा. मुख्य मंत्री उद्घाटनाच्या कार्यक्रमापूर्वी तुमचे निवेदन स्वीकारतील व तुम्हाला चर्चेकरिता वेळ देतील असे पोलिसप्रमुखांनी अभिवचन दिले होते; परंतु मा. मुख्य मंत्री तसेच कार्यक्रमाला निघून गेल्यामुळे निदर्शकांत चलबिचल सुरू झाली. त्यातच पोलिसांनी निदर्शकांना मागे रेटायला सुरुवात केल्यामुळे पोलिस व निदर्शक यांच्यात झोंबाझोंबी झाली. निदर्शक विद्यार्थिनींना काठ्या मारणे, चिखलात लोटून देणे इत्यादी निंद्य प्रकार पुरुष पोलिसांकडून झाल्यामुळे वातावरण तंग बनले. अखेर मा. मुख्य मंत्र्यांनी निवेदन स्वीकारून विद्यार्थिप्रतिनिधींना दुपारी चर्चेकरिता बोलावले. दुपारी झालेल्या चर्चेत १९५६ सालापासून चालत आलेली आर्थिक मागास सवलत(E B C.) रु. १२०० पेक्षा नक्कीच वाढायला हवी असे मा. मुख्य मंत्र्यांनी मान्य केले. अनुदानाच्या सवलतीचा पुनर्विचार होईल व अनुदानाअभावी कोणतेही कॉलेज बंद पडू दिले जाणार नाही असे आश्वासन त्यांनी दिले. मुख्य मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात प्राध्यापकांच्या मागण्यांना कृतिसमितीचा संपूर्ण पाठिंबा असून त्या मागण्या त्वरित मान्य व्हाव्यात असेही नमूद केलेले होते.

याच वेळी पुणे विद्यापीठ विद्यार्थी संघटनेचे शिष्टमंडळदेखील मा. मुख्य मंत्र्यांना भेटले. मेडिकल व इंजिनियरिंगच्या जागा वाढवण्याच्या प्रश्नाबाबत आणि विद्यापीठातील येणारा तोटा भरून देऊन पदव्युत्तर परीक्षांची फीवाढ संपूर्णतः रद्द करावी अशी त्यांनी मागणी केली.

असे हे एक आंदोलनपर्व. यापुढेही ते चालू राहील. ज्या वेळी अशा समस्या निर्माण होतील त्या वेळी विद्यार्थ्यांना संघर्षमय लढ्याशिवाय पर्यायच रहात नाही; पण खरोखरच नुसत्या आंदोलनाने हा प्रश्न सुटेल का? आंदोलन ही नुसती वरवरची मलमपट्टी झाली. या वर्षी फीवाढ स्थगित झाली तरी पुढच्या वर्षी ही जखम पुन्हा चिघळेल. असे किती दिवस चालणार? प्रश्नाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न यापुढे तरी होईल का?

## महाविद्यालयांची दयनीय स्थिती

नुकतेच काही प्रसिद्ध महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी व पाच शिक्षणसंस्थांच्या चिटणिसांनी एक संयुक्त पत्रक काढले आहे. त्यात त्यांनी कॉलेजेस चालू ठेवण्याच्या दृष्टीने आलेल्या अडचणी मांडल्या आहेत. पुन्हा एकदा शेवटचा प्रयत्न करून पाहावा म्हणून हे पत्रक शासनाकडे रवाना झाले आहे. एका प्राचार्यांनी तर आम्हाला स्पष्ट शब्दांत सांगितले, की १९७० पासून आजपर्यंत अक्षरशः किडुकमिडुक विकून संसार चालवावा तशी कॉलेजेस चालविली. सध्या मुलांची फी जमा होत असल्यामुळे काही दिवस अडचण येणार नाही, पण अजून ३ ते ४ महिन्यांनी आम्ही हात वर करणार आणि शासनाला कॉलेजेस ताब्यात घेण्याची विनंती करणार!

एके काळी खाऊनपिऊन सुखी असणाऱ्या कॉलेजाची अशी दु:स्थिती होण्याचे किस्से मोठे मजेदार आहेत. १९६९ साली कॉलेजच्या एकूण उत्पन्नापैकी ६०% उत्पन्न प्राध्यापकाचा पगार देण्यात खर्च होत होते व ४०% दैनंदिन खर्चाकरिता शिल्लक राहात असे. १९७५–७६ ला हेच प्रमाण अनुक्रमे ८३% व १७% असे झाले. त्यामुळे वरखर्चाला शिल्लक राहणारी रक्कम कमी झाली. मात्र आवश्यक वस्तूच्या किमती भरमसाठ वाढल्या. लायब्ररीची पुस्तके यात ५०%, फर्निचरमध्ये ६०%, कार्बन पेपर्स, कागदी पाकिटे, पोस्टेज, डिंक, फाइल्स, स्टेन्सिल इत्यादी स्टेशनरीत सरासरी ५०% पर्यंत वाढ झाली. शास्त्रशाखेच्या प्रयोगशाळेतील साहित्यात ६०% ते ७०% वाढ झाली. रसायनाच्या किमती अतोनात वाढल्या. उदा.– १९७० साली पेट्रोलच्या एका कॅनची किंमत ९४ रु. ५६ पै. होती, त्याच कॅनला आज ७०० रुपये द्यावे लागतात. त्यामुळे कॉलेजाना दैनंदिन खर्चाची तोडमिळवणी करणे अशक्य झाले. त्यातच १९७५–७६ मध्ये प्राध्यापकाना जादा महागाईभत्ता व शिक्षकेतर कर्मचाऱ्याना अतिरिक्तभत्ता शासनाने मंजूर केला. या कायद्याची अंमलबजावणी १ जानेवारी १९७३ पासून करायची होती. त्यामुळे कॉलेजाना प्राध्यापक व इतर कर्मचारी याना जादा वेतन द्यावे लागले.

जून १९७६ पासून शिक्षणाचा नवा आकृतिबंध सुरू झाला. त्यामुळे पदवीपूर्ववर्ग एकदम कमी झाले. आर्टस् आणि कॉमर्सच्या दृष्टीने हे वर्ग मोठे असून फीच्या उत्पन्नाबाबत पुरेसे पोषक होते ते बंद झाल्यामुळे अर्थातच उत्पन्नात घट झाली. त्याऐवजी ११ वी व १२ वीची जबाबदारी या वर्षापासून कॉलेजकडे आली. शासनाने या वर्गांचा हिशेब कॉलेजच्या जमाखर्चात न धरता वेगळा मांडायला सांगितला; परंतु त्याच्यासाठी लागणाऱ्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पगार व इतर खर्चाची सोय मात्र केली नाही. अनुदानात या खर्चांचा विचार शासनाने केला नसल्याने कॉलेजाना अधिक बोजा सहन करावा लागला.

पुणे विद्यापीठाच्या कक्षेत १९७७ चे अखेर सालिना १० लाखाच्यापेक्षा अधिक पगार असणाऱ्या कॉलेजाना आज सरासरी ५ लक्ष २२ हजार रुपये वर्षाला तोटा येतो. एवढ्या मोठ्या कॉलेजाची ही स्थिती तर लहान कॉलेजाची अवस्था किती दयनीय असेल याची कल्पनाच करवत नाही आणि दुर्दैवाने सध्या त्याचीच संख्या जास्त आहे.

सुरुवातीला अडचणीतून मार्ग काढण्यासाठी कॉलेजानी बँकाकडून कर्जे काढली महागाईभत्त्यात झालेली वाढ व मुलांची संख्या तितकीच असल्याने उत्पन्न स्थिर अशा परिस्थितीत वारंवार कर्जे काढली गेली. खर्चांचे आकडे तिप्पट वाढल्याने बँक ओव्हरड्राफ्टही त्याच प्रमाणात वाढला. याशिवाय व्याजाचे दर ७·५% वरून १८% इतके झाल्याने कॉलेजाना हप्तेच काय पण व्याज देखील भरणे कठीण झाले.

१९७२–७३ पासून एक नवीनच अडचण कॉलेजाना भेडसावू लागली विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आवडीनिवडीत अचानक मोठा बदल झाला. शहरांमध्ये आर्टस्‌ला जाणाऱ्याची संख्या एकदम रोडावली तर कॉमर्सला ५५% ते ६०% ना प्रवेश बंद झाला.' ग्रामीण भागात मात्र कॉमर्सकडे मुले फिरकेनाशी झाली. शास्त्रशाखेकडे जीवशास्त्र व वनस्पतिशास्त्र हे विभाग बंद करण्यापर्यंत मजल आली. आर्टस्‌ला हीच परिस्थिती संस्कृत व तत्त्वज्ञान यांची झाली विद्याशाखा आणि विषय याचा विद्यार्थ्यांच्या संख्येशी असणारा समतोल बिघडला. जुन्या S S. C ला A. T. P T. घेऊन का होईना पास झालेली काही मुले सध्या आर्टस्‌ला आल्याने, कॉलेजाना सध्या तरी आर्टस्‌बाबत जीवदान मिळाले आहे; पण पुढल्या वर्षी अक्षरश कॉलेजच्या कट्ट्यावर उभे राहून '! या! या! येथे प्रेक्षणीय किल्ला आहे.' अशा प्रकाराने मुले गोळा करण्यापर्यंत पाळी येणार आहे.

**सर्व बाजूंनी कॉलेजांची अशी कुत्तरओढ चालू असताना, अगदी दिवाळे काढण्यापर्यंत पाळी येण्याचे प्रमुख कारण म्हणजे राज्यशासनाची अनुदानपद्धती.** कॉलेजला दैनंदिन खर्चाकरिता शासन उचलून कुठलीही रक्कम देत नाही, तर कॉलेजला येणाऱ्या तोटयावर हे अनुदान मिळते. पूर्वी विद्यापीठाला किंवा कॉलेजला जेवढा तोटा येईल तेवढे अनुदान मिळण्याची व्यवस्था होती; परंतु ५ वर्षांपूर्वी कायदा करून हे प्रमाण टक्केवारीत देण्याचे ठरले. १९७४ साली केलेल्या कायद्यानुसार विद्यापीठाच्या अधिकारावर अधिक नियंत्रण आले आणि शासन विद्यापीठामार्फत कॉलेजावर नियंत्रण ठेवू लागले. कॉलेजच्या आर्थिक नाड्या शासनाने आपल्या हातात ठेवल्या. गेल्या ५ वर्षांपासून तोटयावर संपूर्ण अनुदान मिळण्याऐवजी फक्त ३३ ते ५०% एवढेच अनुदान मिळते. मागील वर्षातील खर्चास अनुसरून अनुदान आणि फक्त 'तोटयावर' आधारलेले अनुदान अशी अजब अनुदानपद्धती शासनाने स्वीकारली त्यामुळे एकूण जमेपेक्षा खर्च जास्त केल्याशिवाय तोटा येत नाही व तोटा आल्याशिवाय अनुदान मिळणार नाही अशी विचित्र परिस्थिती कॉलेजची झाली गेल्या वर्षीच्या खर्चाला अनुसरून अनुदान दिल्यामुळे कॉलेजला एक वर्षभर अनुदान मिळेपर्यंत तोटा अंगावर बाळगावा लागतो पुन्हा अनुदान फक्त तोटयाच्या ३३ ते ५०% दिल्यामुळे राहिलेल्या ५० ते ६७% तोटयात कॉलेज दर वर्षी बुडत असते. यातदेखील एक ग्यानबाची मेख आहे. कॉलेजच्या बँकेच्या जमाखात्यात येणारी सर्व रक्कम जमा धरली जाते. मात्र खर्च ठरविताना शासन काही खर्चांना पद्धतशीर कात्री लावते. काही आवश्यक खर्च कॉलेजने केलेले असतात. शासन मात्र त्याना मान्यता देत नाही. एकच उदाहरण द्यायचे झाले तर बँकेच्या ओव्हरड्राफ्टवरील व्याज शासन मान्य खर्चात धरीत नाही. असे कित्येक न टाळता येणारे खर्च कॉलेजला करावे लागतात. त्यामुळे परिस्थिती अशी होते की, एकूण खर्च १५० रुपये. पैकी मान्य खर्च फक्त १०० रु. आणि त्यापैकी अनुदानाच्या रूपाने मिळणार फक्त ३३ ते ५० रु. हातोहात लुबाडण्याचा प्रकार याशिवाय अन्य कुठला असू शकतो? याउलट माध्यमिक शाळाना तोटयाच्या ९७½ टक्के अनुदान मिळते; पण राहिलेला २½ तोटा भरून काढण्यास शाळा नाटकाचे प्रयोग लावणे, मुलाकरवी पावतीपुस्तकाद्वारे देणग्या गोळा करणे असले उद्योग करतात. कॉलेजचा तोटा मात्र वर्षानुवर्षं वाढतच जातो.

दर वर्षी एवढा मोठा तोटा होऊन देखील इतके दिवस ही कॉलेजे चालली तरी कशी हा एक मोठा गहन प्रश्न आहे. दर वर्षी नियमाप्रमाणे प्राध्यापकांच्या पगारातून ८⅓% एवढी रक्कम प्रॉव्हिडंड फंडा-

करिता बाजूला ठेवली जाते व कॉलेजही त्यात दरवर्षी तितकीच भर टाकते. वर्षाअखेरीला हिशेबपुस्तकातूनच त्याची व्यवस्थित नोंद होते. कायद्याप्रमाणे प्राध्यापकाच्या खात्यात ती रक्कम वेळच्या वेळी जमा दाखवितात, पण प्रत्यक्षात मात्र खडखडाट असतो. कारण ही गंगा-जळी खर्चाची तोंडमिळवणी करण्यात खर्ची पडते. कॉलेजलादेखील नाना तऱ्हेच्या युक्त्या शोधून काढाव्या लागतात. प्रयोगाला द्यायचे साहित्य हलक्या प्रतीचे देणे, इमारतीची डागडुजी न करणे, रंग न लावणे, एका टेबलावर एकाऐवजी दोन क्लार्कस् ठेवणे, जिमखाना व गॅदरिंगचे बजेट कमी करणे, लायब्ररीत पुस्तके कमी आणणे, प्राध्यापकाचे पगार ४ महिने, ६ महिने किंवा शक्य असेल तितके दिवस अडवून ठेवणे किंवा पगार मिळाल्याची सही घेऊन ती सर्व रक्कम ठेव म्हणून घेणे, नोकरकपात करणे, टर्मिनल परीक्षा न घेणे यासारखे उपाय कॉलेजला योजावे लागतात.

कॉलेजला आणखी एका मार्गाने म्हणजे केन्द्रसरकारकडून अनुदान मिळते. ( U G. C. ) परंतु हे अनुदान कॉलेजचा दैनंदिन खर्च ( Running Expenses ) चालविण्यास उपयोगी पडत नाही. अगोदरच सुरू झालेल्या कॉलेजला जर स्वतःचा विस्तार करायचा असेल, एखादी इमारत बांधायची असेल, लायब्ररीत पुस्तके घ्यायची असतील किंवा खेळाचे साहित्य खरेदी करणे यासारख्या भांडवली गुंतवणुकीकरिताच हे अनुदान मिळते; पण यात देखील एक अडचण म्हणजे एकूण खर्चाच्या निम्मेच अनुदान मिळते. जर कॉलेजने एक लाख रुपयाचा एक हॉल बांधायचा ठरविला तर पदरचे ५० हजार रु. घालावे लागतात. तोट्यात चालणारे कॉलेज स्वतःच्या खिशाला कसर लावून नवीन भांडवली खर्च करणे शक्यच नसते. इतर राज्यांत U. G. C. चा जितका फायदा कॉलेजना मिळतो तितका महाराष्ट्रातील कॉलेजना मिळत नाही. राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार या राज्यात कॉलेजचा निम्मा खर्च पुन्हा राज्यसरकार उचलते. महाराष्ट्रशासन अशा काही सवलती देऊन कॉलेजना U. G C. चा फायदा घेण्यास प्रोत्साहनच देत नाही

विद्यापीठाला येणारा तोटा विद्यार्थ्यांची फीवाढ करून भरून काढावा असा शेवटचा पर्याय जोगसमितीने सुचविलेला आहे. अर्थात एकूण ९६ लाख तोट्यापैकी फीवाढीतून एकदशांश देखील तोटा भरून निघणार नाही. मात्र त्याची झळ पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या सर्वच्या सर्व १००% विद्यार्थ्यांना सोसावी लागेल याचा विचार कोणी केला नाही. आणीबाणीच्या दडपशाहीत कॉलेजांनी १०० रुपये फी वाढविली. ती देखील प्राध्यापकांचे वाढलेले भत्ते देण्यात खर्च झाली. दलालसमितीच्या अहवालाप्रमाणे सर्व कॉलेजांची फी सारखी झाल्याने त्यात आणखी वाढ होण्याचा संभव आहे. एकाच निर्देशांकात येणाऱ्या सर्व कॉलेजाची फी त्या क्षेत्रात सर्वात कमी फी असणाऱ्या कॉलेजप्रमाणे आकारली जावी अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे. तर ज्या कॉलेजची फी त्या क्षेत्रात सर्वात जास्त आहे, त्याप्रमाणे ती सर्व कॉलेजाना लागू करावी असा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. ज्या मध्यमवर्गीयाच्या घरी कॉलेजात शिक्षण घेणारी दोन मुले आहेत त्यांनी सध्याच्या दिवसांत स्वतःच्या मुलाना कसे शिकवायचे ? या फीवाढीतून श्रीमंतवर्ग सहज सुटून जाईल; पण प्रामुख्याने भरडला जाईल तो मध्यमवर्गीय आणि ग्रामीण भागातील विद्यार्थी कल्याणकारी राज्याच्या कल्पनेत या देशात जन्माला येणारे प्रत्येक मूल आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर उभे राहील इतपत शिक्षण मोफत देण्याची जबाबदारी शासनाची आहे इतकी जरी विद्यार्थ्यांची अपेक्षा नसली तरी या कल्याणकारी राज्याच्या कल्पनेत विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे मष्किल करून टाकणे हे निश्चितच लांछनास्पद आहे उद्या जर एखाद्याने असा प्रश्न विचारला, की जास्त पैसे देऊन घेतलेल्या शिक्षणाच्या दर्जात कोणता फरक पडणार आहे? तर त्या प्रश्नात गैरवाजवी असे काही नाही सध्या असलेल्या डिग्रीची किंमत ही जादा फी देऊन घेतलेल्या डिग्रीपेक्षा काही निराळी असेल असे वाटत नाही. मागे एकदा कुलगुरूंनी विद्यार्थ्यांच्या एका शिष्टमंडळाला असे सांगितले होते की तोटा भरून काढण्याचा विद्यार्थी हा शेवटचा घटक असेल. वास्तविकरीत्या तोटा भरून काढण्याच्या उपायात विद्यार्थ्यांवर फीवाढीचा बोजा टाकणे हेच मुळात असयुक्तिक आहे. विद्यार्थी हा शेवटचा घटक देखील असणार नाही कारण विद्यार्थ्यांवर फीवाढीचा बोजा टाकून हा प्रश्न सुटण्यासारखा नाही. तोटा येण्याची कारणे मूलतःच वेगळी आहेत शरिराच्या आतील भागात झालेल्या रोगाला ज्याप्रमाणे वर कातडीवर औषध लावून उपयोग नाही, त्याचप्रमाणे मूळ प्रश्न सोडविण्याचा फीवाढ हा उपायच असू शकत नाही. संपूर्ण शिक्षणक्षेत्रातली अर्थव्यवस्था ढासळली असताना आभाळाला फीवाढीचे ठिगळ लावण्यात कोणतेच प्रयोजन नाही. गेल्या वर्षी १०० रु फी वाढली. या वर्षीही ती वाढण्याचा संभव आहे. पुढल्या वर्षी देखील हेच होईल. असे किती दिवस चालणार ?

त्यामुळे या शैक्षणिक अर्थव्यवस्थेचा विचार करताना मुळापाशी जाणे आवश्यक आहे; परंतु सध्या येणारे फीवाढीचे संकट टाळण्यासाठी काही तातडीचे उपाय योजणेही आवश्यक आहे.

## तातडीचे काही उपाय

सध्या चालू असणारे अनुदान हे १९५६ सालापासून चालू आहे. १९५६ ते ७६ या वीस वर्षात वस्तूच्या किंमतीत व निर्देशांकात किती तरी बदल झाले आहेत. त्यामुळे प्रामुख्याने अनुदानसंहिता बदलण्यात आली पाहिजे. १९७१ सालापासून सर्व प्राचार्य ही मागणी करीत आहेत कुलगुरु व शासन यांना वारंवार अर्ज, निवेदने व विनंत्या करून झाल्या; परंतु अगदी गळ्याशी आल्याशिवाय आपल्या राज्यशासनाला कधी जागच येत नाही. जितके दिवस रेटता येईल तितके दिवस रेटायचे व अगदी वेळ आल्यावर थोडेफार हातपाय हालवायचे हे पहिल्यापासूनचे त्यांचे धोरण आहे. १२ वीच्या विद्यार्थ्यांच्या इंजिनियरिंग व मेडिकलच्या प्रश्नाबाबतची आपल्या राज्यशासनाची तत्परता, विद्यार्थ्यांविषयीची कळकळ आणि कामकाजाचा अमाप उत्साह व्यक्त झालेलाच आहे. मान्य खर्च वजा मान्य जमा यातून येणारा सर्व तोटा अनुदानाच्या रूपाने भरून द्यावा ही मागणी प्रथमपासून कॉलेजच्या प्राचार्यांनी केली आहे. एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, कुठल्याही प्राचार्यांना विद्यार्थ्यांवरती जादा फीचा बोजा पडावा असे वाटत नाही. त्यांनी नुकत्याच काढलेल्या पत्रकात त्याचा तसा स्पष्ट उल्लेख आहे. कॉलेजांना

येणारा तोटा हा शासनाने संपूर्ण व आगाऊ (In Advance) द्यावा असा गुजराथच्या 'पॉल' कमिटीने अहवाल दिला आहे. एक दिवस असा फतवा निघतो की, १ जानेवारी १९७३ पासून सर्व प्राध्यापक कर्मचाऱ्याचे पगार वाढवून दिलेल्या दराने द्यावेत ते तसे देण्याबद्दल दुमत नाही, पण ते कोठून देणार याचा शासनाने तरी विचार करायला नको का? प्राध्यापकांचा पगार वाढवून देण्यासंबंधी जर शासनाने ठरविले तर ती जबाबदारी शासनाने उचलायला नको का? अगदी जर गणिती भाषेत सांगायचे झाले तर A + B = C + D या समीकरणात जर प्राध्यापकाचा पगार वाढला तर नियमाप्रमाणे शासनाने अनुदानात वाढ केलीच पाहिजे. त्याकरिता १९५६ सालचे अनुदानसूत्र आता नव्या परिस्थितीत बदलले पाहिजे. अनुदान ज्या वर्षीचे त्या वर्षी दिले गेले पाहिजे म्हणजे कॉलेजेसना १ वर्ष कर्ज अंगावर बाळगावे लागणार नाही. तसेच प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या पगारावरील अनुदानाचे प्रमाण ठरविण्यात यावे. यापैकी प्राध्यापकांच्या पगारावर १००% अनुदान मिळावे म्हणजे त्याचे पगार अडवून ठेवण्याचे पातक कॉलेजला करावे लागणार नाही. ११ वी व १२ वी चे वर्ग कॉलेजचेच भाग समजले जाऊन अनुदानाबाबत त्याना कॉलेजचे नियम लावले गेले पाहिजेत. अशा तऱ्हेने त्यांचा इतके दिवस अर्धवट लोंबकळत असलेला प्रश्न राज्यशासनाने त्वरित सोडविला पाहिजे.

नियोजन करताना प्रत्येक ठिकाणी सरासरी माणशी खर्च (Per Capita Income) किती येतो याचा विद्यापीठाने विचार करावा. कित्येकदा काही कॉलेजामध्ये पर्शियन, संस्कृत, जर्मन, तत्त्वज्ञान इत्यादी विषयाकरिता फक्त ५ विद्यार्थ्यांकरिता १ प्राध्यापक, २ रीडर्स व २ लेक्चरर्स ठेवावे लागतात आलेल्या विद्यार्थ्याला तर अमुक एक विषय शिकवणार नाही असे कॉलेजला म्हणून चालत नाही. अशा वेळी त्या विद्यार्थ्यांवर होणारा सरासरी माणशी खर्च हा काही हजाराच्या घरात जातो. त्याकरिता मागे २-३ वर्षापूर्वी अशी सूचना मांडण्यात आली होती की, एका विद्यापीठात त्याच विषयासाठी फक्त एक-दोन ठिकाणीच सोय करण्यात यावी. प्रत्येक कॉलेजमध्ये अशी परवानगी देऊ नये. ज्याना त्या विषयाची प्रामाणिक कळकळ आहे त्यानी त्या ठिकाणी येऊन शिक्षण घ्यावे म्हणजे येणारा प्रत्येकी सरासरी खर्च कमी होईल. यापुढेही जाऊन अशी सूचना करण्यात आली होती की, आज या गरीब देशात ४०% लोकाना एकदाच जेवायला मिळत असताना काहीच लोकाची ही शैक्षणिक चैन का? ज्या विषयाचा राष्ट्राच्या प्रगतीसाठी उपयोग नाही ते अनुत्पादक विषयच बंद करून टाकावेत. बाकी काहीही असो; पण निरनिराळ्या शिक्षणसंस्थांनी तो आपला प्रतिष्ठेचा प्रश्न समजून या विषयांवरील विद्यार्थ्यांच्या एकत्रीकरणाला नकार दिला. सुदैवाने जर असे झाले असते तर तज्ज्ञाच्या मते अनुदानातील २५% रक्कम वाचली असती व तिचा दुसरीकडे चांगल्या तऱ्हेने उपयोग झाला असता. सध्या तरी शासनाकडे पैसा नाही. जादा कर लादून तो मिळविता येणे अशक्य नसले तरी अवघड आहे. अशा वेळी काटेकोर नियोजन हाच मार्ग हाताशी राहतो. अर्थात त्याला ५ ते १० वर्षांचा अवधी लागेल; पण केव्हा तरी सुरुवात केलीच पाहिजे.

सध्या पुणे विद्यापीठात अस्तित्वात असणाऱ्या कॉलेजांपैकी २५% कॉलेजेस स्वातंत्र्यपूर्व काळातील आहेत. म्हणजे ३० वर्षांत ७५% कॉलेजे वाढली. स्वातंत्र्यानंतर शिक्षणक्षेत्रात राजकीय दबाव वाढत गेल्याने प्रत्येक तालुक्याच्या जागी कॉलेजे सुरू झाली. माध्यमिक शाळा असणाऱ्या संस्थानी कॉलेजे सुरू केली. सुरुवातीच्या काळात स्थानिक पुढारी लोकाच्या पाठिंब्यावर ही कॉलेजे सुरू करणे शक्य झाले. कॉलेजची इमारत, ग्रंथालय, प्रयोगशाळा, वसतिगृह यांच्यासाठी सहकारी बँकानी कर्जे पुरविली. यापैकी कित्येक कॉलेजाची सरासरी विद्यार्थिसंख्या २५० पेक्षाही कमी आहे. फीमधील कमी उत्पन्न, अपुरे सरकारी अनुदान अशा अनेक कारणामुळे आज या पैकी ६०% महाविद्यालये स्थापनेसाठी किंवा विस्तारासाठी घेतलेल्या कर्जाचे व्याजही योग्य तऱ्हेने भरू शकत नाहीत. शहरात जर कॉलेजांची आर्थिक कोंडी होते तर ग्रामीण भागात काय होत असेल? आपल्या गावाला कॉलेज निघाले पाहिजे या एकाच राजकीय महत्त्वाकांक्षेपोटी शैक्षणिक दर्जा मात्र खालावला याचा कोणीच विचार केलेला नाही. त्यामुळे सध्या नव्या कॉलेजला परवानगी देणे प्रथमत बंद झाले पाहिजे. ज्यांना तरीही कॉलेज काढून शिक्षणक्षेत्राविषयीची आपली तळमळ व आस्था प्रकट करायची असेल त्यानी खुशाल कॉलेज काढावे. मात्र त्याना शासकीय अनुदान मिळणार नाही. पर्यायानेच स्वतःचा खिसा हलका करून कोणी कॉलेज काढण्याचा आग्रह धरणार नाही.

आतापर्यंत शासनाने शिक्षणक्षेत्राकडे फक्त व्यापारी दृष्टिकोनातून पाहिले. प्राथमिक शिक्षण जरी सक्तीचे केले तरी पुढे त्या मुलाना शिक्षणाबाबत वाऱ्यावर सोडून दिले. महाविद्यालयीन उच्च शिक्षण ही राष्ट्राची भावी गुंतवणूक आहे हे लक्षात न ठेवता फक्त स्वत.च्या फायद्यातोट्याचाच विचार केला गेला. संपूर्ण शिक्षणक्षेत्रावर अवकळा पसरण्याचे हेही एक प्रमुख कारण आहे. यापुढे सरकारने शिक्षणक्षेत्राला मूलभूत किंवा गाभा उद्योगात स्थान दिले पाहिजे. महाविद्यालयीन उच्च शिक्षणामुळे आजचा विद्यार्थी उद्याचा राष्ट्राचा चारित्र्यवान व कर्तृत्ववान नागरिक बनणार आहे. हे आम्ही त्यांना सांगण्याची गरज नाही. कारण ही वाक्ये कित्येकदा त्यांच्याच तोंडून आम्ही ऐकली आहेत.

आज सर्व दोष सरकारवर टाकून प्रश्न सुटणार आहेत अशातला भाग नाही. शिक्षणक्षेत्राचे पुनरुज्जीवन करण्याचा मक्ता फक्त शासनानेच उचललेला नाही. समाजाच्या इतर घटकांनी देखील याला हातभार लावला पाहिजे. बँका आज जेवढ्या दराने एखाद्या धंद्याला कर्ज देतात त्याच दराने कॉलेजाना देतात. काही सामाजिक जबाबदारी ( Social obligation ) म्हणून बँकांनी शिक्षणसंस्थाना अल्प व्याजदरात कर्जे पुरविले पाहिजे.

## उद्योगधंद्यांनी जबाबदारी स्वीकारावी

आज पुण्याभोवती खूप मोठा औद्योगिक परिसर आहे. पुण्याच्या कॉलेजमधून शिकणारे विद्यार्थी या कारखान्यातून किंवा अन्य संस्थांमधून काम करतात. ४ किंवा त्यापेक्षा अधिक वर्षे ज्यांनी शिकवून विद्यार्थ्यांना तयार केले त्याचाच नफा हे उद्योगधंदे मिळवीत असतात. आज कॉमर्स कॉलेजमधून चांगल्या मार्कांनी B. Com. झालेले

विद्यार्थी जर महाराष्ट्र बँकेत काम करीत असतील तर महाराष्ट्र बँक कॉमर्स कॉलिजचे काही देणे लागते. या शिक्षणसंस्थात तयार होणारे सत्त्व (ream) जर या उद्योगसंस्था घेत असतील तर त्यांनी काही ना काही प्रमाणात या शिक्षणसंस्थाची जबाबदारी उचललीच पाहिजे. ग्रामीण भागात काही शाळा किंवा कॉलेजे साखरकारखान्यांनी दत्तक घेतलेली असतात व ते साखरकारखाने त्या संस्थांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत करतात. त्याच धर्तीवर या उद्योगसंस्थांनी कॉलेजे दत्तक घेतली पाहिजेत किंवा काही मर्यादेच्या पुढे होणाऱ्या निव्वळ नफ्यावर शासनाने शिक्षणकर वसूल करून तो कॉलेजांना दिला पाहिजे.

१९५६ सालचे जे अनुदान चालू आहे त्याचप्रमाणे E. B. C. ( Economic Backward Class ) चे निष्कर्ष देखील १९५६ चे जुने आहेत. त्या वेळी फीमाफीची उत्पन्नमर्यादा १२०० रु. सालिना होती. आजदेखील ती तशीच आहे. ज्याचे उत्पन्न महिना १०० रुपये असून ज्याची मुले कॉलेजचे शिक्षण घेतात असे पालक शोधून काढले पाहिजेत. सध्या सरासरी ३०० टक्क्यांनी किंमती वाढल्या आहेत त्यामुळे त्या निर्देशांकाप्रमाणे सध्या ही मर्यादा ६,००० रुपये इतकी करण्यात आली पाहिजे.

मोफत शिक्षण किंवा कर्जाऊ शिक्षण या प्रकारची एक कल्पना बरेच दिवसांपासून मांडली जात आहे. विद्यार्थ्यांच्या पालकावर पाल्याच्या शिक्षणाचा बोजा पडू नये, ते त्यांना शक्य नसल्यास विद्यार्थ्यांचे शिक्षण अडून राहू नये किंवा विद्यार्थ्यांनी स्वत:च स्वत:चे शिक्षण घेतले पाहिजे ही यामागली कल्पना. शिक्षणानंतर विद्यार्थी जेव्हा स्वत: मिळवायला लागेल तेव्हा आलेला खर्च त्याच्याकडून हप्त्याने वसूल करावा अशी ही योजना आहे. सध्या तरी ही सर्व ठिकाणी लागू करणे शासनाला अशक्य आहे; पण त्यापायी ही चांगली कल्पना कुजण्याची शक्यता आहे त्यामुळे या योजनेचा एक प्रयोग म्हणून पदव्युत्तर वर्गांकरिता ही योजना सुरुवातीला राबविली जावी. सध्या विद्यापीठाला असणारा ९६ लाख रु. तोटा विचारात घेता ही योजना बारगळण्याचाच संभव जास्त आहे. आर्थिक टंचाईपायी चांगल्या कल्पनांचा कसा चुथडा होतो त्याचे हे उत्तम उदाहरण होय.

पुण्यातील कॉलेजांच्या ताब्यात बरीच मोठी जमीन आहे. पुणे विद्यापीठाकडे तर हजारो एकर जमीन पडून आहे. आतापर्यंत या जमिनीचा कधी उत्पादनाकरिता उपयोगच केला गेला नाही. विद्यापीठाने जर यात लागवड करण्याचे ठरविले किंवा अन्य पर्यायी उद्योग चालू करण्याचे ठरविले तर काही ना काही प्रमाणात बेकार विद्यार्थ्यांना काम मिळू शकेल. या होणाऱ्या लागवडीतून तोटा कमी होण्यास निश्चितच मदत होईल. जोगकमिटीला असा उपाय सुचला नाही, नेमका फीवाढीचाच कसा सुचला हे आश्चर्य करण्यासारखे आहे. आजची बहुसंख्य कॉलेजे ही फक्त सरकारी अनुदानावरच अवलंबून आहेत. स्वत:चे स्वत: काही उत्पन्न मिळविण्याचा किंवा स्वावलंबी होण्याचा प्रयत्न त्यांनी कधी केलाच नसेल असे म्हणता येणार नाही. पण पूर्णपणे सरकारी अनुदानावर अवलंबून असणाऱ्यांना खाजगी संस्था का म्हणायचे हा प्रश्न पडतो.

## विद्यार्थी – पालक सहभाग

आज शिक्षणक्षेत्रातील सर्व समस्या शेवटी विद्यार्थ्यांपाशीच येऊन थांबतात. कुठलाही निर्णय घ्यायला निराळेच लोक असतात, पण शेवटी तोटा मात्र विद्यार्थ्यांनाच सहन करावा लागतो. विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविणारे शिक्षणतज्ज्ञ, शासन, कॉलेजची मॅनेजमेंट यांच्या बुद्धिमत्तेबाबत वादच नाही; पण विद्यार्थ्यांचा प्रश्न सोडविताना विद्यार्थ्यांचे किंवा त्यांच्या पालकांचे मत कधीच विचारात घेतले जात नाही, ही आपल्या शिक्षणपद्धतीची खरी शोकांतिका आहे. विद्यापीठ कार्यकारणीवर विद्यार्थिप्रतिनिधींना किती अधिकार असतात ? एक तर त्याची मीटिंग संपूर्ण वर्षातून दोनदाच असते व या सभेने केलेला कुठलाही ठराव हा विद्यापीठावर बंधनकारक नसतो. मग प्रश्न पडतो की हा पोरखेळ कशासाठी ? या फीवाढीच्या संदर्भात विद्यार्थिप्रतिनिधींच्या सभेला विश्वासात देखील घेतले नाही, जोगकमिटीचा फीवाढीचा अहवाल सरळ सिनेटमध्ये पास होऊन Executive Committee च्या पुढे पास करण्यास ठेवण्यात आला. विद्यार्थांचे किंवा त्यांच्या पालकाचे मतही न विचारता एखादा निर्णय संपूर्ण विद्यापीठातील विद्यार्थ्यांवर लादायचा हा कुठला न्याय ? आणि म्हणून या विद्यापीठप्रतिनिधिसभेची पुनर्रचना करण्यात आली पाहिजे. निर्णय घेण्याबाबत विद्यार्थ्यांचे मत प्रामुख्याने विचारात घेतले पाहिजे व त्यांनी घेतलेले काही बाबतीतील निर्णय विद्यापीठांवर बंधनकारक असले पाहिजेत. विद्यापीठ हे शासनाचे नाही, कुलगुरूंसाठी नाही, प्राध्यापकांसाठी नाही तर विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आहे याचा विचार झालाच पाहिजे.

तीन महिन्यात याचा काही तरी निर्णय न लागल्यास एक तर कॉलेजेस् बंद करावी लागतील किंवा एक दिवस फीवाढीची नोटिस लावून फी न भरणाऱ्या सेमिस्टरचा फॉर्म अडविला जाण्याची धमकी दिली जाईल. नाइलाजाने विद्यार्थ्यांना वाढीव फी भरावी लागेल. ज्यांना हे शक्य नाही त्यांना इच्छा असूनही शिक्षणापासून वंचित व्हावे लागेल. नुसती फी वाढवूनही शिक्षणक्षेत्रातली सध्याची अस्थिरता दूर होईल असे नाही. प्राध्यापकांचे पगार अडविले जात असल्याने व जादा शिक्षकांचा प्रश्न निर्माण झाल्याने हुषार, कर्तबगार व ध्येयवादी माणसे या क्षेत्राकडे पाठ फिरवितील आणि पर्यायाने भावी पिढीचे आणखी नुकसान होईल. फी वाढून देखील शिक्षणाचा दर्जा खालावेल. म्हणून शेवटी प्रश्न पोहोचतो तो राज्यशासनाशीच. आज शासनाच्या वेळकाढू धोरणामुळे सामान्य माणसाला उच्च शिक्षणापासून दूर लोटले आहे. अजून १० वर्षांनी त्याची जी बेकारांची तैनाती फौज तयार होईल त्याला जबाबदार कोण ? या बेकारीतून निर्माण होतील अनेक समस्यांची दुष्टचक्रे आणि असंख्य अनुत्तरित प्रश्नचिन्हांच्या मालिका !

☐

मुक्काम पुणे

# नोकरीसाठी– अधिक चांगल्या नोकरीसाठी....

प्रत्येक विकसनशील राष्ट्राचे स्वतःचे असे काही खास प्रश्न असतात. ते प्रश्न त्या राष्ट्राच्या सामाजिक परिस्थितीतून निर्माण झालेले असतात किंवा ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक जीवनामधून निर्माण झालेले असतात; पण याव्यतिरिक्त जगातील सर्व विकसनशील राष्ट्राना सामाइकपणे भेडसावणारी जर कोणती समस्या आज असेल तर ती म्हणजे बेकारी! या राष्ट्रामध्ये जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात इच्छुक उमेदवार आणि उपलब्ध संधी यांच्यामध्ये जे एक व्यस्त प्रमाण अतिशय तीव्रतेने अनुभवाला येते त्यातूनच ही समस्या निर्माण होते. या बेकारीच्या मागोमाग, बऱ्याच वेळा तिच्यामुळेच इतरही अनेक समस्या निर्माण होतात. गरिबी ही त्यापैकीच एक आहे. गुन्हेगारीची–विशेषत. सुशिक्षित तरुणाकडून घडणाऱ्या निर्घृण गुन्ह्यांची कारणेही या समंधाप्रमाणे सतत भेडसावीत राहणाऱ्या समस्येतच शोधता येतील. अशा परिस्थितीत ज्याचा स्वतःवरील तोल सुटतो ती मंडळी एक तर गुन्हेगारीकडे तरी वळतात नाही तर आत्महत्येस तरी प्रवृत्त होतात. म्हणूनच कोणत्याही विकसनशील राष्ट्राला प्रगतीमध्ये गति येण्यासाठी या समस्येवर काही तरी तोडगा शोधून काढावाच लागतो. किमान तसा प्रयत्न तरी करावा लागतो.

अर्थात आजपर्यंत कोणीही ही समस्या पूर्णपणे सुटल्याचा दावा करू शकलेले नाही. सुशिक्षित बेकारांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे याची जाणीव समाजातील इतर घटकांप्रमाणे प्रत्यक्ष त्या सुशिक्षित बेकारानाही आहे; पण नुसती जाणीव असून भागत नाही. त्या दृष्टीने काही तरी निश्चित स्वरूपाचे प्रयत्न व्हावे लागतात.

या बेकारीमागील कारणांचा विचार केला तर असेही लक्षात येते की गरिबीबरोबरच प्रचंड लोकसंख्या हीही तिच्या मुळाशी असते. त्यामुळे सुरवातीलाच म्हटल्याप्रमाणे इच्छुक उमेदवार आणि उपलब्ध संधी यांचा मेळ कधी बसूच शकत नाही.

आपल्याकडील शिक्षणपद्धतीही त्या दृष्टीने सदोष आहे. अर्थात आज–काल विद्यार्थ्यांच्या किंवा तरुणाच्या कुठल्याही समस्येचे खापर प्रचलित शिक्षणपद्धतीवर फोडायचे त्यातलाच हा प्रकार नव्हे; पण खरोखरच विचार करायला लागले तर आपल्या असे लक्षात येईल की हे शिक्षण विद्यार्थ्यांचा भविष्यकाल लक्षात घेऊन, त्याची आवड पाहून दिले जात नाही. बऱ्याच ठिकाणी असे पाहायला मिळते की तरुणाने घेतलेले शिक्षण आणि स्वीकारलेला व्यवसाय याचा मेळ कुठेच बसत नाही. या संदर्भातच जाता जाता याही गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे की याचा थोडासा दोष त्या विद्यार्थ्यांकडेही जातो. कारण कित्येकांनी आपल्याला कोणत्या विद्याशाखेचा अभ्यास करावयाचा याचा विचार एस. एस. सी. होईपर्यंत केलेलाच नसतो. त्या दृष्टीने प्रत्येकाने स्वत चा, स्वत.च्या बुद्धिमत्तेचा कल कसा आहे याचा थोडासा अंदाज आधी घेतल्यास, भावी काळाच्या दृष्टीने, निदान स्वतःपुरता तरी नोकरीचा प्रश्न बऱ्याच सुलभतेने सोडविता येईल.

कित्येक तरुणाना नोकऱ्या मिळतात; पण त्या त्यानी केवळ तडजोड म्हणूनच स्वीकारलेल्या असतात हीदेखील एक प्रकारची under employment च आहे. परिणामतः असे तरुण सदैव असमाधानी राहून, केवळ पोटासाठी काही तरी केले पाहिजे या भावनेतूनच अशी 'काही तरी' नोकरी–चाकरी केल्यासारखी करतात. त्यामुळे नोकरीच्या बाबतीत धरसोड वृत्ती वाढीला लागून बेकारीच्या प्रश्नात एका नव्या समस्येची भर पडते.

यावर उपाय म्हणून सरकार–तर्फे काही तरी प्रयत्न सतत होत असतात. 'धंदेशिक्षण' हा त्यापैकीच एक; परतु अजूनही या शिक्षणाचा प्रसार जेव्हढ्या प्रमाणात व्हायला पाहिजे तेव्हढा झालेला नाही. कित्येक तरुणही अशा प्रकारचे शिक्षण हलक्या प्रतीचे मानतात. ही भावना दूर झाली पाहिजे. याचबरोबर 'उद्योग विनिमय केंद्र' (Employment Exchange) हाही एक विभाग सरकारतर्फे चालू आहे; पण त्याच्यावर पडणाऱ्या ओझ्याच्या मानाने त्या विभागाची शक्ती आणि त्यामुळे यशही मर्यादितच आहे. तेव्हा हाच सामाजिक हेतू डोळ्यासमोर ठेवून सुशिक्षित बेकाराना त्याना लायक अशा नोकऱ्याची किमान माहिती पुरवणारी केंद्रे, कोणत्याही प्रकारच्या फायद्याची अपेक्षा न ठेवता खाजगीरीत्या सुरू करता येतील. एव्हढेच नव्हे तर जे सध्या नोकरीत आहेत परंतु त्याबद्दल समाधानी नाहीत, आहे त्याहून मोठ्या पदाच्या, जास्त पगाराच्या नोकरीच्या शोधात आहेत त्यानाही या नोकरीविषयक माहिती केंद्राचा लाभ घेता येईल. अशा तऱ्हेच्या केंद्राच्या आवश्यकतेचे आणखी एक कारण म्हणजे सर्वसामान्य माणूस स्थानिक किंवा फार तर एखाद्या इंग्लिश वृत्तपत्रापलीकडे फारसे काही वाचीत नाही. त्यामुळे नोकरीविषयक ज्या काही जाहिराती त्याच्या पाहण्यात येतात त्याही अत्यंत मर्यादित असतात; परंतु असे एखादे माहिती पुरविणारे केंद्र सुरू झाले तर ते याहून अधिक व्यापक प्रमाणावर जाहिरातीचा परामर्श घेऊ शकेल. थोडक्यात, या माहितीकेंद्राचे स्वरूप वधु–वरसूचक मंडळाप्रमाणे, संपूर्णत. सामाजिक दृष्टिकोन लक्षात ठेवून असावे. ज्याप्रमाणे वधूवर सूचक मंडळात नाव नोंदवल्याने संबंधितांना अनुरूप वर / वधू मिळविण्यास मोठे क्षेत्र उपलब्ध होते त्याप्रमाणे या अशा स्वरूपाच्या केंद्राचे सभासद होणाऱ्याना त्याना योग्य अशा नोकऱ्याची माहिती मिळून नोकरी मिळवण्यातील अडचण कमी करता येईल. म्हणजेच सभोवताली अनेक प्रकारच्या, आपल्याला योग्य अशा नोकऱ्या उपलब्ध असूनही केवळ वेळेवर न कळल्यामुळे संधी हुकली असा प्रसंग येणार नाही.

अशा प्रकारचे एक केंद्र पुण्याच्या अपेक्स बिझिनेस कन्सल्टंटस् प्रा. लि. चे संचालक

श्री. सुशील तांबे यांनी सुरू केलेले आहे. भारतातील सर्व प्रमुख वर्तमानपत्रे आणि जर्नल्स एकत्र करून त्यातील जाहिरातींचे वर्गीकरण करून, उमेदवाराच्या मागणीनुसार त्याला फक्त माहिती पुरविणे असे या कंपनीच्या कामाचे स्वरूप आहे. मग अर्ज करण्यापासून पुढील सर्व सोपस्कार त्या उमेदवाराने स्वतःच करणे अपेक्षित आहे. अशा तऱ्हेची माहितीपत्रे त्या उमेदवाराकडे अत्यंत मामुली, (त्यासाठी लागणाऱ्या खर्चापुरतेच) शुल्क घेऊन आठवड्यातून दोनदा पाठविण्याची व्यवस्था हे केंद्र करणार आहे. अर्थात त्यासाठी केंद्राच्या सभासदत्वाचा अर्ज भरून सभासद होणे आवश्यक आहे.

काही कालानंतर अशा प्रकारच्या केंद्राचा उपयोग जसा बेकार तरुणांना होतो तसाच ज्यांना व्हेकन्सीज् भरायच्या आहेत अशा कंपन्यानाही होऊ शकेल. कारण अशा प्रकारच्या केंद्रामधूनच त्यांना विश्वासार्ह आणि विशिष्ट दर्जा असलेली माणसे मिळू शकतील. म्हणजेच हे केंद्र म्हणजे Employee आणि Employer यातला एक महत्त्वाचा दुवा बनेल.

—प्रतिनिधी

# समाज व डॉक्टर

डॉ. अरुण लिमये

काही वर्षांपूर्वी 'डॉक्टर जगवितात का नागवितात?' या विषयावर डॉक्टर अनिल अवचटांचा खळबळजनक लेख प्रसिद्ध झाला. इंडियन मेडिकल असोसिएशनने त्यांना शो-कॉज नोटिस दिली व पुढे मागेही घेतली. डॉक्टरांची काळी कृत्ये चव्हाट्यावर मांडली, याचा डॉक्टरांना राग आला; पण त्यातील जळजळीत सत्य त्यांना नाकारता आले नाही. इंडियन मेडिकल असोसिएशनने बचावात्मक पवित्रा घेतला.

सुमारे पंधरा दिवसांपूर्वी असोसिएशनच्या हॉलमध्ये 'समाज व डॉक्टर' या विषयावर पुण्याच्या मेडिकल असोसिएशनच्या शाखेने एक परिसंवादच घडवून आणला. जाहीर कार्यक्रमाप्रमाणे भाग घेणारे होते—डॉ. चव्हाण, डॉ. संगमनेरकर, डॉ. आळेकर आणि अनंतराव पाटील व काका वडके. तिघे डॉक्टरांचे प्रतिनिधी, दोघे समाजाचे. एक काँग्रेस प्रतिनिधी, दुसरे जनतेचे.

मोठ्या उत्सुकतेने परिसंवाद ऐकायला गेलो. अपेक्षा होती, की भरपूर गर्दी असेल. विषय डॉक्टरांच्या व प्रेक्षकांच्या—दोघांच्या जिव्हाळ्याचा; पण अपेक्षाभंग झाला. डॉ. भिडे व डॉ. बोधे असे २ वक्ते वाढून एकूण वक्ते ७ व श्रोते ३५ असे गणित बसले.

पुणे शाखेचे अध्यक्ष डॉ. बर्वे, I. M. A चे माजी प्रेसिडेंट डॉ भिडे व महाराष्ट्राचे माजी प्रेसिडेंट डॉ. बोधे व परिसंवादात भाग घेणारे इतर सर्व वक्ते स्टेजवर असल्यामुळे परिसंवादात भाग घेणाऱ्या एकमेव महिला प्रेमलताताई चव्हाण यांना श्रोत्यातच बसविले होते.

डॉ. प्रेमलता चव्हाण यांनी सुरुवात केली. जनरल प्रॅक्टिशनर्सची बाजू प्रामुख्याने त्यांनी मांडली.

विज्ञानाच्या गतिमानतेमुळे सामाजिक मानसात वैचारिक बदल घडला आहे. रुग्णांना झटपट बरे होणे आवडते. त्यातूनच गैरप्रकार घडतात आयुर्वेद व ॲलोपथी या द्वंद्वाचा परिणामही रुग्णावर घडतो.

आजकाल डॉक्टर व रुग्णाचा व्यक्तिगत संबंध दुरावला, पण ट्रीटमेंट घेताना रुग्णाचा विश्वास हवा. कारण रुग्ण म्हणजे केवळ यंत्र नव्हे, परंतु समाजाच्या डॉक्टरवरील या विश्वासाचा त्याने गैरफायदा घेऊ नये. दोघांचे परस्पर सहकार्य आवश्यक आहे. प्रचंड भांडवली व शिक्षणखर्च, अद्ययावत् पॉश दवाखाना ही बाबही लक्षात घेतली पाहिजे सर्वच डॉक्टरांकडे भरपूर काळा पैसा असतो, हे खरे नाही व्यवहारात डॉक्टरांना अग्रक्रम हवा, सवलती हव्यात. डॉक्टरांकडे बघण्याचा दृष्टिकोन सरकारने बदलून त्यांना सहाय्य करावे अशी मागणी त्यांनी केली.

नंतर उठले दै. विशाल सह्याद्रीचे संपादक श्री अनंतराव पाटील. समाजाच्या डॉक्टरांकडून असलेल्या अपेक्षा एक पत्रकार व कार्यकर्ता या नात्याने सांगताना त्यांनी काही मूलभूत मुद्दे उपस्थित केले. डॉक्टर व समाज अद्याप विचार व कृतीने एकत्र आलेला नाही. औषधोपचाराच्या निरनिराळ्या पद्धतींचा घोळ आहेच. मिश्रवैद्यकाचे प्रयोग झाले, मेडिकल प्रवेशाबाबत अडचणी आहेत. त्याचबरोबर ग्रामीण भागात आरोग्यसेवा उपलब्ध नाही, ही वस्तुस्थिती आहे. एका बाजूने डॉक्टर—श्रीमती, बंगला—गाडीच्या अपेक्षा बाळगतात व त्याच वेळी आमचा व्यवसाय नोबल प्रोफेशन आहे असे मानतात—यावर त्यांनी आक्षेप घेतला. फार कमी डॉक्टर्स लेखी बिले देतात स्पेशालिस्टपर्यंत सामान्य आर्थिक स्थितीतील माणूस पोचणेच कठीण. पोचला तरी त्याची फी परवडत नाही. म्युनिसिपालिटी, जिल्हा परिषदा व ससून येथील सार्वजनिक आरोग्यसेवा चांगली नाही म्हणून पेशंटचा नाइलाज होतो.

ग्रामीण भागात आठवड्यातून एकदा तरी नेमाने जाणारे किती डॉक्टर आहेत? दर वर्षी 'सॉलिडॅरिटी डे' पाळता, पण प्रत्यक्ष आचरणाचे काय? ज्या खेडेगावातून डॉक्टर गेला, ती सर्व बागायती. अनावश्यक इंजेक्शने देतात, ॲक्सिडेंट होऊन अत्यवस्थ रोगी आला, तरी आधी पैशाचे हिशेब मांडतात, खोटी सिझेरिन करतात अशा कानपिचक्या त्यांनी द्यायला सुरुवात केली व शेवटी केवळ पैसाच नव्हे तर गरिबाचा दुवाही महत्त्वाचा आहे, स्वतःच्या उणिवांचाही विचार करा, असा सल्ला देऊन ते थांबले.

नंतर उठले काका वडके पूर्वीचे तडफदार शिवसैनिक, आता जनता पक्षात. स्वतःची प्रकृति व एकत्र कुटुंब शिवाय सामाजिक कार्यकर्ता. या अनेकानेक नात्यांनी त्यांचा डॉक्टरांशी जवळचा संबंध आलेला. त्यांनी अभिनिवेशी भाषण न करता आपल्या व्यथा सांगायला सुरुवात केली

जुने डॉक्टर व पेशंट यांचे नाते आत्ताचे तरुण डॉक्टर—पेशंट नात्यापेक्षा वेगळे होते. आता कुंपण निर्माण झाले. पूर्वी ते नव्हते. स्पेशालिस्टांच्या रूम्स श्रीमंत वस्तीतच का असाव्यात? डॉक्टरांची स्वतंत्र केबिन, माशांचे ॲक्वेरियम, फोमच्या गाद्या व स्वतंत्र

टायपिस्ट यामुळे भिती निर्माण होतात. त्यामुळे हा शो नसला तरी चालेल, पण फिया परवडायला हव्यात नाक-कान-घसा, खाली करा खिसा हे थाबले पाहिजे. एखादा आबा नासका असेल, तर त्याची दखल घ्यायलाच हवी. नाही तर सारी आढीच बिघडेल. वैद्यकीय पेशाबद्दल आदर व्यक्त करून ते म्हणाले–वैज्ञानिक शोधाचा लाभ गरिबाना मिळणार आहे की नाही–हा खरा प्रश्न आहे. डॉक्टर एकच एक टॉनिक देतो. कंपन्यात त्याची भागीदारी असते. वर्षा-दोन वर्षात बगला-गाडी घेतो. त्यांनी हे नवे देशभक्तीचे आव्हान पेलले पाहिजे. जनसेवा म्हणजेच ईशसेवा असे मानायला हवे होते. आजीबाईच्या बटव्यातील जमालगोटा व जास्वदीचा रस याचा डोक्यावरील केस जाऊन पडलेल्या चट्टयासाठी झालेला फायदा त्यांनी सागितला व हे डॉक्टरांना सागितले तेव्हा त्यानी सशोधकाच्या वृत्तीने न बघता त्याच्या वागण्यात जो फरक पडला त्यावर टीका केली.

इडियन मेडिकल असोसिएशनचे एक सदस्य व व्याख्यात्याला प्रश्न विचारून भंडावून सोडणारे डॉ जोशी यानी अनेक प्रश्न काकाना लेखी विचारले. त्यांना उत्तर देताना काका एक ऐतिहासिक सत्य स्पष्टपणे बोलून गेले. स्टॅण्डिग कमिटीत काम करताना महानगरपालिका राजकारणातील सत्तास्पर्धा, हेवेदावे या दोषामुळे योग्य निर्णय मी घेऊ शकलो नाही असा जबाव त्यांनी दिला व यापुढे **म्युनिसिपालटीला** उभा रहाणार नाही असेही जाहीर केले.

नंतर कामगार विमायोजनेत काम करणाऱ्या डॉक्टराची बाजू डॉ. आळेकरानी माडली. समाजातच दोष आहेत, ते डॉक्टरांमध्ये उतरतात. डॉक्टर समाजाचाच एक घटक.

कामगारासाठी असलेल्या योजनामागे विम्याची कल्पना आहे, याची जाणीवच कामगारांना कुणी दिली नाही. वसुलीच्या भावनेतून कामगार औषधे साठवितात, त्यातून टंचाई निर्माण होते. कॅश बेनिफिटसुचा गैरफायदा घेतला जातो. खोट्या रजा घेऊन कामगार गैरहजर राहतात व त्यांचे पुढारी त्यांना प्रोत्साहन देतात. बिहारमध्ये खोटी रजा न दिल्याबद्दल डॉक्टरांचा खून झाला असल्याचीही माहिती त्यानी दिली व योजना यशस्वी करायची असेल तर कामगार-पुढारी, लेबर ऑफिसर्स व डॉक्टर्स या सर्वांनी सामूहिक जबाबदारी मानून काम केले पाहिजे हा महत्त्वाचा मुद्दा माडला सरकारकडे औषधाची उपलब्धता व डॉक्टराच्या फीमध्ये वाढ याबाबतीत लक्ष देण्याची मागणी त्यानी केली.

नंतर उठले प्रसूतिशास्त्रतज्ज्ञ डॉ. सगमनेरकर. न चिडता डॉक्टरानी रात्री-अपरात्री उठावे, पेशटला तपासावे व बिल मागू नये हे म्हणजे फारच झाले. कामाचे बिल मागणे काही गुन्हा नाही आणि चॅरिटी शेवटी डॉक्टरांनीच का करावी? त्यानाही काही खाजगी–सार्वजनिक आयुष्य असते. प्रत्येक पेशंटला स्वतःची केस अर्जंट वाटली म्हणून काय झाले? अशी आक्रमक सुरुवात त्यानी केली; पण अवचटाच्या लेखाचा उल्लेख करून सर्व वर्गाची बदनामी नको, थोडेच तसे असतात असा बचावात्मक पवित्रा घेतला. पैसे मिळवायला हवेत, पण लुटालूट नको असा मध्यम क्रम सुचविताना सध्याच्या दरात लूटमार बिलकुल होत नाही असा दावा केला. डॉक्टरांच्या फिया व नर्सिगहोममधील कॉटभाडे याची तुलना ब्ल्यू डायमडमधील दराशी करून त्यामानाने हॉस्पिटलचे दर कमीच आहेत असे त्यांनी सांगितले.

काही मडळी अनावश्यक ऑपरेशन्स करतात हे मान्य करताकरताच ते गव्हर्न्मेंट अॅप्रुव्हड् चॅरिटेबल् हॉस्पिटल्स व औषधी कंपन्या जी लूटमार करतात त्याकडे वळले व खाब-खांव–खांबोळ्याचा खेळ त्यानी सुरू केला. एखाद्या डॉक्टरने अशी प्रॅक्टिस करायची नाही असे ठरविले तरी दुसरे करतातच असे लंगडे समर्थनही दिले.

पेशंटलाच मायबाप मानून सामाजिक ऋण डॉक्टरांनी मानले पाहिजे हा मुद्दा मान्य करून त्यांनी काही किमान अपेक्षा व्यक्त केल्या. रोगप्रतिबधक उपचार व कुटुंबनियोजन यात डॉक्टरांनी मोफत काम का करू नये? उपकार म्हणून नव्हे तर कर्तव्य म्हणून? शिक्षक, पत्रकार, कामगार या थरातल्या काहीना मोफत ट्रीटमेंट का देऊ नये? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले व जे डॉक्टर गैरप्रकार करतात त्यांच्याविरुद्ध मोर्चे काढणे आवश्यक आहे व तसे मोर्चे काढले गेले तर मीही त्यात सहभागी होईन असे म्हणून सगमनेरकर थाबले.

परिसंवादात जाहीर केलेल्या वक्त्यांची भाषणे संपली होती. वेळही बराच झाला होता, परंतु डॉ. भिडे यानी आपले भाषण अनंतराव व काकांना उद्देशून सुरू केले. तिन्ही पिढ्यातील प्रातिनिधिक डॉक्टरांनी आपले म्हणणे माडलेले आहेच; पण मूळ मुद्दा आहे तो असा की आम्हाला नोबेल प्रोफेशनचे वाटले तर म्हणू नका– पण कामकरी मंडळींना द्याल ते तरी आम्हाला द्याल? खेड्यात बगला नको, पण पब्लिक हेल्थ सेंटरवर रहायला जागा व खेड्यात जायला रस्ता तरी द्याल की नाही? असे विचारून त्यांनी काही महिन्यांच्या अवधीत सर्व पॅथीज शिकवून जे नवीन लाखो 'डॉक्टर' तयार केले जाणार आहेत, त्या 'राजनारायण' योजनेवर खरपूस टीका केली. आम्हाला जनतासरकारने विश्वासात घेतले नाही. वास्तविक डॉक्टराच्या बेकारीचा मोठा प्रश्न आहे व डॉक्टराच्या सघटनेने डॉक्टराच्या राष्ट्रीयीकरणाचा ठराव १९७० सालीच पास केला– याकडे त्यानी लक्ष वेधले. खरे तर निषेधदिनच पाळायला हवा; पण जनतापक्षाला एक सधी द्यावी म्हणून आम्ही डेडिकेशन डे पाळीत आहोत १०% आमच्यातील वाईट माणसे सुधारण्याचा आम्ही प्रयत्न करू असे त्यांनी माडले.

डॉ बोध्यांना सगमनेरकराच्या मोर्च्याची आयडिया आवडली नाही. डॉक्टरांनीच डॉक्टराविरुद्ध असे मोर्चे काढणे गैर आहे असे त्याचे म्हणणे. सरकारकडे भीक मागू नये. आम्ही काही भिकारी नव्हे. सरकारी चुकीच्या धोरणामुळे काही विशिष्ट हॉस्पिटल्समध्ये मक्तेदारी निर्माण होते व ते लूटमार करू लागतात हे मोडून काढले पाहिजे. अशी मांडणी त्यानी केली आणि हा रंजक विषयावरचा रंगाळलेला परिसंवाद आटोपला.

## माझ्या मते–

आम्ही डॉक्टर्स नागवतो असा कबुलीजबाब देणारे आम्ही काही डॉक्टर्सही आहोत; पण मला असे वाटते, की आम्ही का

नागवतो, तेही समाजाने समजून घेतले पाहिजे.

आम्ही केलेला प्रचंड खर्च ( कॅपिटेशन फी वगैरे वगैरे, ) भरून काढण्यासाठी आम्ही नागवतो......जनता नादान आहे. जनतेच्या मूर्खपणाचा आम्ही फायदा घेतो आणि याच्याही पुढे जाऊन असा युक्तिवाद केला जातो, की जे डॉक्टर्स नागवितात ते त्यांची तितकी लायकी आहे म्हणूनच ते मिळवितात. या सर्व वागणुकीला, फसवणुकीला सामाजिक परिस्थितीच कारणीभूत आहे... तिचाच हा अपरिहार्य परिपाक आहे. ज्याच्याजवळ व्यावसायिक कौशल्य आहे, तेच स्वतंत्र प्रॅक्टिस चालवून जबर कमवून बसले आहेत. गरिबांसाठी वेगळे दवाखाने-सरकारी हॉस्पिटल्स आहेतच की! हेच डॉक्टर तिथेही असतात–ऑनररी ! ससून हॉस्पिटलला लोक 'डायसून' हॉस्पिटल म्हणू लागले आहेत. बाहेर ज्याचे दवाखाने आहेत असे हे डॉक्टर्स ... जसे शिक्षणक्षेत्रात क्लासवाल्याचे आहे तसेच येथेही आहे. त्यामुळेच तर त्यांची प्रॅक्टिस वाढत असते. प्रायव्हेट नर्सिंग होम्स किती तेजीत चालतात. कॉर्पोरेशनने जर पेठवार चागली नर्सिंग होम्स काढली, तर ही प्रायव्हेट नर्सिंग होम्स चालतील का ? पण हा सर्व विशिष्ट धोरणाचाच परिणाम आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून आपण किती मिळविलं नि किती गमविलं याचा विचार केला, तर लक्षात येईल की जे कमावलय ते सगळ ढेरपोट्याच्या पोटातच गेलंय, याला कारणीभूत आपले नेभळट सरकारी धोरण

तुम्ही बघा, सर्वत्र डॉक्टर हा संपन्न वर्ग आहे. हा डॉक्टरवर्ग सामान्य जनतेला नागवितो की नाही हा खरा प्रश्न आहे. एकटादुकटा डॉक्टर फसवीत असेल ते जाऊ द्या; पण आज कोणीही स्वत:ला डॉक्टर म्हणवून घेतात आणि सर्रास फसवणूक करीत असतात. इंडियन मेडिकल कौन्सिल आणि असोशिएशनच्या कक्षेत येणाऱ्याचा आपण विचार करू. जे जनरल प्रॅक्टिशनर्स आहेत, ते हळूहळू नागवितात, तर जे स्पेशॅलिस्ट आहेत, ते एकदम नागवितात. डॉक्टरकीचा व्यवसाय आता संपला असून तो एक धंदा झाला आहे. पैसा देणाऱ्या पेशंटचा अनुनय येथे केला जातो. पेशंटच्या मर्जीनुरूप ट्रीटमेंट बदलणारे डॉक्टर्स आज आहेत. बिलाची गोळाबेरीज ४-५ रुपयापर्यंत आणण्याकरिता इंजेक्शन दिले जाते. एक्झॅमिनेशन-फीच्या नावाखाली अव्यापारेषु व्यापार चाललेला असतो. स्टेथास्कोपचा उपयोग केला जातो, तो पेशटचा खिसा चाचपण्यासाठी. ऑक्युपेशन हिस्टरी विचारली जाते ती पेशटची साप‌त्तिक स्थिती अजमाविण्यासाठी.

स्पेशालिस्ट डॉक्टरांची तर अलीबाबा व चाळीस चोराची सोनेरी टोळीच असते. एकाने दुसऱ्याकडे, दुसऱ्याने तिसऱ्याकडे असे पेशंटला पाठवीत राहायचे आणि डायरेक्ट-इनडायरेक्ट कमिशन मिळवायचे. प्रसिद्ध हॉस्पिटलमध्ये अॅनास्थेटिस्टकडून २०% देणगी म्हणून कापून घेतले जातात. या कारणाकरिता पोस्ट नाकारणारे एक–दोन जण; पण इतराचे काय? अशी काही मंडळी या क्षेत्रात आहेत, की ती हे सर्व खुलेपणाने मान्य करतात, ते वेगळे; परतु काही ढोंगी लोकाना सामाजिक प्रतिष्ठाही हवी असते व पैसाही.

डॉक्टर जीव वाचवतो म्हणून त्याला देवदूत म्हटले जाते. ते त्याचे कर्तव्यच आहे; पण स्पष्टच बोलायच झालं, तर आज हा व्यवसाय वेश्याव्यवसायाच्या पातळीवर आलाय. डॉक्टराना बुडालेल्या पैशाची फिकीर नसते. कारण या व्यवसायात प्रॉफिटमार्जिन पुष्कळ असते. डॉक्टर उधारी ठेवतात, याचे कारण हेच. खिसेकापू गर्दीचा फायदा घेतात, तर हे पेशंटच्या अगतिकतेचा. पेशंटच्या केवळ खिशातूनच नव्हे, तर घशातही हात घालून ते पैसे काढतात. नागविण्याची ही वृत्ती त्याच्या रक्तात भिनलेली आहे. जनतेला नागवूनच ते केवळ थाबत नाहीत, तर समव्यवसायिकाना, आया, दाया, नर्सेस या सेवकानाही नागवितात. आजच्या या डॉक्टराचे स्वरूप 'इब्लिस डॉक्टरांची टोळी' असे आहे. तरुणानी, नव्याने या व्यवसायात येणाऱ्यानी या नागविणाऱ्या डॉक्टराविरुद्ध चळवळ करून त्यांना जगणे नकोसे केले पाहिजे. □


यंदाची महाराष्ट्र शासनाची पारितोषिके लाभलेली
दोन 'राजहंस' प्रकाशने

**टॉलस्टॉय एक माणूस**

सुमती देवस्थळे

**श्रीग्रामायन**

श्री. ग. माजगावकर

**या दोन्ही पुस्तकांच्या नवीन आवृत्त्या लवकरच प्रकाशित होत आहेत.**

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

# नक्षलवाद्यांच्या शोधात



लेखांक तीन

## चळवळीचे आजचे स्वरूप

शिरीष सहस्रबुद्धे । चंद्रशेखर पुरंदरे

संपूर्ण हिंसात्मक मार्गावर चळवळ १९७१-७२ पर्यंत चालली. जसजसा भ्रमनिरास होत गेला तसतशी उत्तरोत्तर त्यातील तीव्रता कमी होत गेली आणि आजचा CPI(ML) या चारु मुझुमदारच्याच पक्षातील नक्षलवादी १९७१ पर्यंत आम्ही भलत्याच दिशेने गेलो हे कबूल करतो.

आज प्रत्यक्ष असलेली चळवळ निराळ्या स्वरूपात आहे. जमीनदारांना १९७० पर्यंत एकदा नक्षलवाद्यांचे स्वरूप कळल्यावर जो दहशतीचा वरवंटा त्यांनी फिरविला, त्याचा महत्त्वाचा परिणाम म्हणून CPI(ML) च्या कार्यपत्रिकेवर संरक्षणव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाला. जर प्रतिकार केला नाही तर संपूर्ण चळवळच उद्ध्वस्त होण्याच्या बेतात होती. केवळ अस्तित्वासाठी तरी प्रतिकार तोही सशस्त्र हाच एकमेव पर्याय राहिलेला होता. शिवाय संपूर्ण चळवळीचेच नीतिधैर्यहनन होण्याची भीती होती. प्रतिकार जरी केला असता तरी तो अपुऱ्या व अयोग्य शस्त्रांमुळे प्रभावी ठरला असता किंवा नाही याबद्दल नेतृत्व साशंकच होते. शेवटी या द्विधा मनःस्थितीत सापडलेल्या नेतृत्वावर मुलुगु विभागातील लोकांनीच दडपण आणून शस्त्रपुरवठ्याची मागणी केली. या वेळेपर्यंत नेत्यांनाही शस्त्र केवळ हल्ला करण्यासाठी नव्हे तर संपूर्ण चळवळी शिल्लक राहण्यासाठी आवश्यक आहे हे कळून चुकले होते. म्हणून आज सशस्त्र चळवळ तर करायची; पण त्याआधी लोकजागृती करायची असा विचारप्रवाह बलवत्तर होताना दिसतो. किंबहुना १९७३ नंतर आणीबाणी जाहीर होऊन दहशत प्रचंड प्रमाणात वाढेपर्यंत हाच पंथ स्वीकारण्यात आलेला आहे. कायदेशीर आणि बेकायदेशीर मार्गांनी युती केल्याशिवाय म्हणजेच निवडणुका, संप, घेराव या कायदेशीर आणि सशस्त्र लढा या बेकायदेशीर घटकांचा योग्य तो संगम झाल्याखेरीज चळवळीची प्रगती होणे अशक्य आहे, असे आज नक्षलवाद्यांचे मत बनले आहे. १९७० ला ज्याच्यावर दरोडा घालायचा त्या जमीनदाराकडे आधी माणसे किती, पैसा रोख किती

मिळू शकेल, किती महागात संपूर्ण दरोडा जाईल अशा प्राथमिक गोष्टींचाही अंदाज न बांधता हल्ले करण्यात आले.

शेवटी १९७३ साली, जेव्हा पक्षाचे पहिले अधिवेशन भरले, तेव्हा खेड्यामधल्या लोकांच्या संघटना बांधून, स्थानिक प्रश्नांवर त्यांना चेतावणी देऊन आंदोलन उभे करण्याचे महत्त्व सगळ्यानाच पटलेले होते. प्रथम लोकांना राजकीयदृष्ट्या जागृत करणे, शोषक कोण, तो तुमचे शोषण का करतो, जेवढा वाटा उत्पन्नातला त्याला मिळतो, त्याला तो पात्र आहे का, तुमचा त्यात शारीरिक परिश्रमाचा प्रचंड सहभाग असताना तुम्ही हे सहन करावे का इत्यादी त्यांच्या जीवनाशी निगडित प्रश्नांवर लोकमत तयार करणे आणि त्याला सशस्त्र लढा एवढा एकमेव पर्याय आहे असे पटवून सशस्त्र लढ्यासाठी या सर्व लोकांना उद्युक्त करणे असा कार्यक्रमातील प्रमुख लक्षणीय भाग ठरविण्यात आला.

यानुसार जंगल-विभागात 'गिरिजनसंघ' या नावाने गावोगाव समित्या स्थापन करण्यात आल्या. ('गाव' या शब्दाचा जंगलाच्या संदर्भात अर्थ बराच संकुचित आहे. १०–१२ झोपड्यांचेच एक गाव असते.) या गावांमधल्या लोकांना फक्त दोनच पर्याय : एक नक्षलवादी किंवा पोलिस. त्यामुळे ते अर्थातच नक्षलवाद्यांच्या बाजूने गेले. मध्यवर्ती समितीने ६ कलमी कार्यक्रम ठरविला होता. त्याची अमलबजावणी करणे हे या गिरिजनसंघाचे उद्दिष्ट असे. या सहा कलमांपैकी चार महत्त्वाची कलमे म्हणजे (१) क्रांतिकारी तत्त्वज्ञानाचा प्रचार करणे, (२) क्रांतीसाठी मनोभूमिका तयार करणे, (३) लोकांना वर्गशत्रूची (जंगलामध्ये वर्गशत्रू एकच-पोलिस; पर्यायाने राज्यसरकार) कल्पना देणे आणि (४) स्वसंरक्षणाच्या पद्धती शिकविणे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकांना वर्गशत्रूची कल्पना देणे. या तिसऱ्या कलमात या वर्गशत्रूविरुद्ध योग्य ती कारवाई करणे याचाही समावेश होतो. ही 'योग्य' कारवाई म्हणजे काय? या प्रश्नाच्या उत्तरात संपूर्ण नक्षलवादी चळवळ सामावलेली आहे. आम्हाला भेटलेल्या दोन नक्षलवाद्यांच्या या 'योग्य' शब्दाच्या अर्थाबाबतच्या कल्पनांचा परामर्श घेणे अनुचित ठरणार नाही. एकाच्या मते सशस्त्र लढ्यालाच 'प्रवृत्त' करणे तर दुसऱ्याच्या मते लोकांनी त्यांना योग्य वाटेल ती कारवाई (मग तो सशस्त्र सूडच असेल असे नाही) करावी. लोकांना एकदा राजकीयदृष्ट्या जागृत केल्यावर त्यांना हवा तो पथ त्यांनी अवलंबावा. त्यांच्यावर सशस्त्र लढ्याचे तत्त्वज्ञान लादण्याची ऐतिहासिक चूक आपण करू नये असे दुसऱ्या पक्षाचे समर्थन. पहिल्याचे म्हणणे असे की, १९६५ सालापासून CPM लोकांना याच दृष्टीने 'जागृत' करीत आलेली आहे आणि आजतागायत लोकांनी स्वतः होऊन काहीही पावले उचलली नाहीत त्या अर्थी त्यांना निश्चित दिशा दाखविणे—तीही सशस्त्र उठावाची—हेच अस्सल नक्षलवादी कार्यकर्त्याचे काम आहे. त्याने अलिप्ततेने केवळ 'हा सूर्य नि हा जयद्रथ' असे न दाखविता 'जयद्रथाला मार!' असेही लोकांच्या मनावर बिंबविले पाहिजे; पण तरीसुद्धा 'शारीरिक हिंसा!' हा मात्र अगदी शेवटचा पर्याय मानण्यात आलेला आहे.

लोकांचा पाठिंबा गृहीत धरण्याची चूक सुधारण्यासाठी, म्हणजेच लोकांचा खराखुरा पाठिंबा मिळवण्यासाठी मात्र स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आले की ज्यामुळेच चळवळ १९७२ च्या जबर फटक्यातून सावरू शकली.

जंगलामध्ये—गोदावरीच्या खोऱ्याच्या—तेंदूच्या पानांच्या १०० बंडलांना जे पूर्वी २ पैसे मिळत असत, ते आता आंदोलन करून १६ पैसे मिळतात. हा लढा व्यावहारिक पातळीवर सुरू होऊन, तात्त्विक बैठक मिळवून संपला; पण खरी शोकांतिका निराळीच आहे. आम्हाला भेटलेल्या नक्षलवाद्याने 'ते लोक (आदिवासी) १५० पानांचा बंडलसुद्धा करीत नाहीत, ५०–६० पानांचाच करतात—आणि १६ पैसे त्यामागे घेतात. कंत्राटदार एवढे घाबरलेले आहेत की ते निमूटपणे तेवढ्याच पानांचे बंडल स्वीकारतात' असे मोठ्या फुशारकीने सांगितले. ही घटना पुरेशी बोलकी आहे. चळवळीच्या अत्यंत बाल्यावस्थेतच अप्रामाणिकपणा एवढ्या थराला गेला असेल, तर परत एकदा चळवळ मागे जाणार नाही का? १६ ऐवजी २० पैसे मंजूर करून घेऊन ठरलेल्या कोठ्याप्रमाणे पुरवठा करणे यांना शक्य आहे; पण ही ताकदीची कल्पना आल्यावर विवेक सुटतो ही घटना स्वतःला अत्यंत सच्चे म्हणविणाऱ्याच्याही बाबतीत घडावी ही दुर्दैवी गोष्ट आहे.

प्रत्येक खेड्याला शस्त्रास्त्रांच्या दृष्टीने स्वयंपूर्ण बनविण्यात आले आहे कारण पोलिस येतात ते आधुनिक शस्त्रांनिशी व किमान २० च्या संख्येने. अशा वेळी जर शस्त्रे नसली तर प्रतिकार दूरच पण चळवळीवर विश्वासही राहणे कठीण होईल. आसपासच्या—मैदानी प्रदेशातल्या—खेड्यातही असे गिरिजनसंघ स्थापन करण्यात आले आहेत. हे केवळ कोणत्या तरी बुरख्याखाली वावरायचे म्हणून आतून ते नक्षलवाद्यांना पूर्णपणे अनुकूल असतात. पोलिसांनी या गिरिजनसंघातल्या लोकांना आपल्या पूर्ण ताकदीनिशी नष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे, पण तरीही नक्षलवाद्यांचे कार्य डोळ्यांसमोर असताना आणि पोलिसी अत्याचार दररोज घडत असताना ते लोक नक्षलवाद्यांचा द्रोह करतील हे अशक्य आहे. शहरात ज्याप्रमाणे विद्यार्थीसंघटना, त्याप्रमाणे खेड्यामध्ये हे गिरिजनसंघ नक्षलवाद्यांचे आश्रयदाते आहेत, पण हे गिरिजनसंघ खेड्यामध्ये (जंगलाबाहेरच्या) मात्र नक्षलवादी चळवळ पसरवू शकलेले नाहीत याचे कारण त्या दृष्टीने लोकशिक्षण करायला सुरुवात करताच दडपशाही आणि दमनशाही सुरू होते. 'जनसंघटन करणे ही अशक्यप्राय गोष्ट आहे. कम्युनिस्ट तत्त्वज्ञान—नक्षलवादी, हिंसाचाराचे तर दूरच-शिकवणे हाही या लोकशाही राज्यात त्या खेड्यामध्ये गंभीर गुन्हा समजला जातो; परंतु जंगल हा नैसर्गिक आसरा आहे हे गिरिजनसंघ आदिवासी भागातील नक्षलवाद्यांना जेवढी शक्य तेवढी सर्व मदत करतात. चळवळ भूमिगत आहे याचा अर्थ लोकांना नक्षलवाद्यांचा ठावठिकाणा माहीत नाही असे नसून फक्त पोलिसांना तो माहीत नाही असा आहे.

या आदिवासी भागात ४–५ लोकांचे एक असे स्क्वाड स्थापन केले जाते. १९६९ पासून ती अस्तित्वात आहेत या स्क्वाडचा नेता कमांडर म्हणून ओळखला जातो. पूर्वी हा कमांडर शहरी असे व स्क्वाडमधील बाकी लोक स्थानिक असत. आता परिस्थिती बदलली आहे. आदिवासींची नवी पिढीच या जागा भरत आहे याचाच अर्थ चळवळ रुजत आहे. आज अशी २२ स्क्वॉड्स् अस्तित्वात आहेत.

त्यांना आधुनिक शस्त्रांचा तुटवडा नाही. पोलिसांकडून पळविलेली शस्त्रे त्यांच्या दिमतीस आहेत. प्रत्येक स्क्वाडला एक विशिष्ट विभाग आखून दिलेला असतो. त्याच्यातच त्याचे कार्य चालू असते. त्यामुळे तेवढ्या टापूतला प्रत्येक माणूस या स्क्वाडमधल्या प्रत्येकाला नीट ओळखतो. खेड्यातला प्रत्येक माणूस, त्याचा इतिहास, हाल चाली याची या स्क्वाडमधल्या प्रत्येकाला पूर्ण माहिती असते. मुख्यतः प्रत्येक खेड्यात जाणे, लोकाना एकत्र आणणे, शिकविणे, जेव्हा समस्या उत्पन्न होतील, तेव्हा विरोधाचा आवाज उठवणे, लोकांना कशा रीतीने हा लढा चालू ठेवावा याची दिशा देणे, मागण्यांना निश्चित स्वरूप देणे व पुढचे लोकावर सोपविणे असा सध्या यांचा कार्यक्रम आहे.

केवळ राजकीयच नव्हे, तर इतरही प्राथमिक स्वरूपाचे आणि रोजच्या व्यवहारातले शिक्षण या गिरिजनाना देण्यात येते. रोजच्या बातम्या सागण्यात येतात. प्रत्येक स्क्वाडकडे ट्राझिस्टर असतो त्याच्यावर मॉस्को, बी. बी. सी, व्हॉइस ऑफ अमेरिका वगैरे परदेशी आणि बाकी आपल्या देशातील स्टेशने लावण्यात येतात. प्रत्येक बातमीची सखोल चर्चा केली जाते. जागतिक घटना विशेष लक्षपूर्वक समजावल्या जातात. बहुधा कमांडरला हिंदी, इग्रजी येत असते. अर्थात् जेव्हा या दोन्हींपैकी कोणतीच भाषा येत नाही, तेव्हा फक्त स्थानिक स्टेशनेच ऐकण्यावर भर द्यावा लागतो तरीही लोकांना राजकीय दृष्टचा जागृत करण्यासाठी या माध्यमाचा पुरेपूर उपयोग करून घेतला जातो.

शस्त्रे कशी वापरायची याचेही शिक्षण या स्क्वाड्समध्ये दिले जाते प्रथम स्क्वाडमधले लोक ते शिकतात; मग बाकीच्यांना शिकवितात. आता बहुधा स्वयंचलित आधुनिक शस्त्रे असल्याने पूर्वीइतका शस्त्रे हाताळण्याच्या व त्याने लढा देण्याच्या शिक्षणावर भर द्यावा लागत नाही असे भेटलेल्या नक्षलवाद्याने सांगितले चळवळीच्या पहिल्या भरात जेव्हा आक्रमणाचीच भूमिका घ्यायचे ठरले होते, तेव्हा या शिक्षणाचा उपयोग प्रामुख्याने लष्करी डावपेच समजावून सांगण्यासाठी होता. आता भूमिका आक्रमणावरून संरक्षणावर आली आहे. त्यामुळे त्या प्रकारचे बचावाचे शिक्षण दिले जाते. स्क्वाडमधल्या लोकाचा गणवेष खाकी शर्ट व खाकी हापपँट असा असतो.

या लोकशिक्षणात सध्या येणाऱ्या प्रमुख अडचणी तीन आहेत एक म्हणजे राजकीय जागृतीची. शत्रू कोण, मित्र कोण हे कळणे, आधुनिक जगाच्या स्वरूपाची किमान तोडओळख होणे, नवीन साधने माहीत असणे या सर्वच बाबतीत पूर्ण अंधार आहे. त्यामुळे १९७१–७२ ला श्रीगणेशा झालेला आहे आणि आता कुठे नक्षलवाद्याच्या अविरत परिश्रमामुळे त्यांना थोडीफार परिस्थिती उमजू लागलेली आहे.

दुसरी अडचण म्हणजे झगडे वारंवार झाल्यास नवनवीन डावपेच लढविणे, सतत सतर्क राहणे, बदलाची भावना ज्वलंत राहणे या गोष्टी साधतात, पण पोलिसाशी चकमकी फार थोड्या झडतात. त्यामुळे लोक सतत पेटलेले राहात नाहीत. थोडेफार शैथिल्य येते.

याला उपाय म्हणज त्यांच्या देखत तरी एखादी चळवळ या धर्तीवर चालू असणे, पण जवळपासच्या म्हणजे जंगलाबाहेरच्या प्रदेशात पोलिसाशी उघडघावर मुकाबला केला तर दोन तासात चटणी उडेल अशी परिस्थिती असल्याने तेथे काहीही हालचाल नाही की ज्यापासून यांनी स्फूर्ती घ्यावी

त्यामुळे या पर्यायापासून गिरिजनाना अलिप्त करणे अगत्याचे झालेले आहे. किंबहुना परिस्थितीने नक्षलवाद्यासमोर नक्की पर्यायच ठेवलेला नाही. बाबूच्या काटक्या, इतर निरनिराळी पाने, पत्रावळीची पाने, सांबरशिंगे, 'इप्प' नावाचे झाड ज्याच्यापासून दारू तयार होते, मध, फळे इत्यादी जगलातून मिळणाऱ्या गोष्टी, ज्या हे आदिवासी गोळा करतात, त्या सरकारने नेमलेले 'गिरिजन कॉर्पोरेशन' आश्चर्य वाटेल एवढ्या कमी किंमतीला विकत घेते आणि बाहेर आश्चर्य वाटेल एवढ्या जास्त किंमतीला विकते जंगल अधिकारी हा इथला शोषक व भाडवलदारी वर्ग आहे. याचे कंत्राटदाराशी सगनमत आहे. गिरिजनांच्या व आजूबाजूच्या खेड्यांतल्या कोणाचीही पाळीव जनावरे जंगलात चरायला नेण्यास किंवा जगलातील झाडाचे एक पानही तोडण्यास–थोडक्यात जेणेकरून वनसंपत्तीची हानी होईल असे काहीही करण्यास कायद्याने बंदी आहे, पण आज सर्वांत जास्त जगलतोड कत्राटदारच करतात ही वस्तुस्थिती आहे आणि हे जगलअधिकाऱ्याच्या समतीखेरीज अशक्य आहे या व कायदेशीर जंगलतोडीला गिरिजनांना राबवून घेणे व काहीही मजुरी न देणे किंवा जास्त रक्मेवर सही घेऊन कमीच हातात टिकवणे हे प्रकार अप्रतिहत चालू होते, पण नक्षलवाद्याच्या जनजागृतीमुळे, आता जर पैसा रोख मिळाला नाही, तर आदिवासी तोडलेले लाकूड बाहेर न्यायलाच नकार देतात तीच गोष्ट विड्याच्या बडलांची. १०० बंडलांमागे एक बडल बोनस म्हणून फुकट मिळते. लाकूडतोडीचे दरही ३–४ रुपयापासून १०–१५ रुपयापर्यंत या आदोलनाने वाढलेले आहेत पालवचा या गावी वाढलेल्या दरानी मजुरी देण्यास नकार देताच २०,००० लोक अचानक संपावर गेले. त्यामुळे यांच्या खऱ्या ताकदीचा अंदाज दोनही बाजूना आला.

आदिवासी लोकाच्यात फार मोठ्या प्रमाणात आणि फार खोलवर रुजलेल्या प्रथा, अंधविश्वास याचाही हळूहळू अन्त होत आहे. पूर्वी पटवारी, दोरा या जमातीचे लोक पौरोहित्य करून लोकाना प्रायश्चित्तापोटी जबर दक्षिणा द्यायला लावायचे. ही जमा केलेली दक्षिणा अर्थातच त्याचे दिवस आनदात जावेत म्हणून असे. त्याच्या जन्मसिद्ध जातीच्या प्राबल्यावर तो स्वत चे स्थान एवढे बळकट करू शकत असे. आपल्याकडील ब्राह्मणाप्रमाणे. हे आता त्याचा ढोंगीपणा उघडकीला येऊन, मूळ अंधश्रद्धा हळूहळू वितळत असल्याने बद होण्याच्या मार्गावर आहे

दुसरा एक गरीब जीवनाचा शाप म्हणजे लग्न. चार–पाच दिवस सगळ्या गावाला दारूत बुडविले म्हणजे पितर स्वर्गाला गेले आणि रुबाब वाढला अशा कल्पनेने इतके दिवस जे आयुष्यात कधीही फेडता येणार नाही असे जबर कर्ज, जबर व्याजाने घेऊन लग्न

**आज बावीस स्क्वाडस् अस्तित्वात आहेत. त्यांना आधुनिक शस्त्रांचा तुटवडा नाही.**

चैनीत पार पडत असे. स्क्वाड्स् जिथ प्रभावी आहेत, तिथे आता लग्न अत्यंत साधेपणाने पार पडते.

नक्षलवाद्याच्या उपरिनिर्दिष्ट विधायक कार्यात महत्त्वाची भर घालणारे म्हणजे त्यांनी सुरू केलेले शास्त्रशुद्ध रीतीचे शिक्षण. जेवढी जमीन आपल्या ताब्यात आहे तीत जास्तीत जास्त पीक देण्यासाठी कशी वापरावी, शक्य त्या साधनांचा वापर, खतांचा वापर कसा करावा हे त्यानी सप्रयोग दाखविणे सुरू केले आहे. त्याचप्रमाणे नदीला वा ओढ्याला बांध घालणे, छोटेछोटे पाट काढणे इत्यादी. हे सगळे लोक इतक्या चटकन शिक्षित होणे व त्यामुळे जागृत होणे कोणालाच परवडण्यासारखे नाही. एकदा जागृत झाले नि आपला शत्रू कोण हे कळले की पोलिस, जमीनदार व सरकार यांची ते झोप उडवणार हे त्याना पक्के माहीत आहे. त्यामुळे एक वेळ राजकीय प्रचार सोडा; पण बाकी शिक्षण जे हे नक्षलवादी देतात त्यातही पोलिसी अत्याचाराला तोंड द्यायला लागले आहे. गोदावरी खोऱ्याचा पूर्व भाग, खम्मम, पन्दिम, गुर्जरमोटू, पांचवल हा सर्व प्रदेश सुमारे ५००० चौरस मैलांचा. त्यात चळवळीने अशा रीतीने मूळ धरले आहे. नरसमपेठ व पन्दिम या गावातला तर प्रत्येक जण नक्षलवादी आहे.

याच गावात एकदा मेलेली म्हैस हे लोक नदीच्या पाण्यातून काढीत असता पोलिसानी उगीच गोळीबार केला. त्यात एक छोटी मुलगी ठार झाली. लोक एवढे चिडले, की जे काही १०–११ पोलिस होते त्याना पकडून गावाच्या मध्यभागी खांब उभे करून पोलिसाना खांबाना बांधून ठेवले, त्याना दिवसभर बेदम मारले. एक कॉन्स्टेबल आधीच पळून गेला होता. त्याने वरंगळ या मोठ्या जवळच्या गावी वर्दी देऊन तो जास्त कुमक घेऊन आला आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे सगळ्या पोलिसाना सोडवून निमूटपणे, कोणताही अनुचित प्रकार न करता ते पोलिस निघून गेले. त्यानंतरही या खेड्याला दहशतीचा त्रास झाला नाही. लोकशिक्षणाचा मार्ग पत्करताच चळवळीच्या लोकप्रियतेत किती भर पडली आहे याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

आणखी एक प्रसंग असाच सपूर्ण बोलका आहे. एका गावाच्या जमीनदाराकडून लोकांनी काही हजार रुपये मागितले. त्याने ते तर दिले नाहीतच, शिवाय यांच्यातील एका प्रमुख नेत्याला अटक होण्याची व्यवस्था केली. यावर लोकानी नेहेमीचा जाळपोळीचा मार्ग हाताळला नाही, तर धोबी, भंगी, न्हावी यांच्यापासून सर्वांनी त्याच्यावर पूर्ण बहिष्कार टाकला. हा असहकाराचा ऐतिहासिक मार्ग इतका प्रभावी ठरला की त्याला गाव सोडून जाणे भाग पडले. गाव सोडणे तत्त्वतः व आर्थिक दृष्ट्या परवडण्यासारखे नसल्याने त्याने लेखी क्षमा मागितली. ज्याला अटक झाली त्याची सुटका स्वत चे वजन खर्ची घालून करविली आणि मग गावात दाखल झाला.

अशा रीतीने आजच्या काळात चळवळीचे सिंहावलोकन करता, थोडक्यात असे सांगता येईल की १९६७–६८ च्या सुमारास पेटलेली चळवळ पुरेशा लोकांच्या पाठिंब्याअभावी व सरकारच्या दडपशाहीच्या अकल्पित कठोरपणाने वैयक्तिक सूड घेण्याच्या मार्गाने १९७१ पर्यंत धुमसत राहिली. त्यामुळे ही एकाकी पडली. त्यात भर म्हणून निवडणुकावरच्या अविश्वासामुळे या एकलकोंडेपणात आणखी भर पडली. १९७१ ला तरी सुद्धा मोठ्या खेड्यात थोडाफार पाठिंबा मिळू शकला; पण वेळीच त्याचा उपयोग करून न घेतल्याने परत शून्यातून निर्मिती करण्यात–मार्ग बदलण्यात–१९७२ साल सरकले. १९७३–१९७४ मध्ये वर वर्णन केलेली सच्ची विधायक कार्ये व लोकांचे संघटन करण्यात आले, ज्यायोगे चळवळ १९७७ पर्यंत टिकू शकली १९७४ मध्ये प्रत्येक लहानमोठ्या गावात मिळून ५,००० सभा झाल्या. ही जागृती फारच आश्चर्यकारक होती आणि ज्या वेळी चळवळ योग्य दिशेने काही तरी करू पहात होती, तोच आणीबाणीचा नागर फिरायला सुरुवात झाली तोपर्यंत प्रादेशिक ताकदीची संघटना म्हणून उभी राहिलेली ही शक्ती लयाला जाते की काय अशी भीती निर्माण झाली; पण आणीबाणीचा चाळणीसारखा उपयोग होऊन खरे तेवढे शिल्लक राहिले. १९७६ चा मार्च हा प्रचंड दहशतीचा महिना होता. सरकारने पशूंनी सुद्धा लाजावे अशा भयानक गोष्टी केल्या. जगलातल्या चळवळीला तर न भूतो न भविष्यति एवढा फटका बसला. मार्च १९७६ मध्ये १००० लोकांचे अनन्वित हाल करून भूमिगत लोकांचा ठावठिकाणा सांगण्यासाठी त्याना भाग पाडण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सरकारने थंड डोक्याने केलेल्या हत्याकांडावर पुरेसा विदारक प्रकाश तारकुंडे अहवालाने पाडला आहे या अहवालातील महत्त्वाचा भाग पुढील लेखाकात वाचकाना वाचावयास मिळेलच. नक्षलवाद्याना पकडणे, जंगलात नेणे न् गोळ्या घालणे आणि चकमकीत ठार झाल्याचे जाहीर करणे हा पोलिसांचा आवडता छंद, पोलिस चीफ मिनिस्टर जे वेंगलरावानी प्रेमाने पुरवला या साऱ्या भयानक हकीकती आता एकापाठोपाठ एक उजेडात येत आहेत. 'ऑर्गनायझेशन फॉर द प्रोटेक्शन ऑफ डेमोक्रॅटिक राइट्स्' या समितीने २ एप्रिल १९७७ ला राष्ट्रपतीना सपूर्ण पुराव्यानिशी एक यादी–२७४ लोकांची–पाठवली जिच्यात ते कोणी, कोठे, कसे ठार मारले हे दिलेले होते २२ मे १९७७ ला त्याना स्मरण–पत्र पाठविण्यात आले गव्हर्नरलाही एक प्रत पाठवण्यात आली. या साऱ्यावर सरकारकडून अजून उत्तर येते आहे.

या गोष्टी तर चळवळीशी प्रत्यक्ष संबंधित असणाऱ्याच्या नशिबी आल्या; पण असा मध्यमवर्गीय बुद्धिजीवी वर्ग बराच होता की ज्याची चळवळीला पूर्ण सहानुभूती होती, जो शहरात राहून उजळ माथ्याने इतर व्यवसाय करीत होता आणि कायद्याच्या चौकटीत राहून लेखाच्या वा अन्य साहित्याच्या द्वारे सरकारच्या दडपशाहीविरुद्ध आवाज उठवीत होता.

• ३० वर्षांच्या सत्तेचा माज चढल्यावर कांग्रेसच्या सरकारला हे मतभिन्नतेचे उघडे प्रदर्शन आणि धोरणावरचे (जर काही असलीच तर) आसूड पहावणे अशक्यच होते. जसजसा लोकांच्या टीकेचा रोख पोलिसांकडे वळू लागला, तसतसे सरकार यांच्याशी सामना देण्याचा विचार करू लागले आणि १९६९ पासून त्या लेखकाना वैयक्तिक त्रास देणेही सुरू झाले. असुरक्षिततेची भावना एवढी विकृत बनली होती की, रमेशचद्र साहू या १२ वर्षांच्या मुलाला १९६९ साली तो क्रान्तीची भाषा बोलतो म्हणून गोळ्या घालण्यात आल्या. पाणिग्रही सुब्बाराव या 'लोकांच्या कवीच्या' नशिबीही गोळ्याच आल्या. १९७० मध्ये पी. कृष्ण राव याला तुरुगात वाईट

वागणूक देण्यात आली. 'मार्च' ह्या त्याच्या कवितासंग्रहाबद्दल ५००/-रु. दंडावर त्याची सुटका झाली. ऑगस्ट १९७१मध्ये ज्वालामुखी, निखिलेश्वर आणि चरबद राजू या क्रान्तिवादी कवींना 'कुजलेल्या शासनावर' टीका करण्याबद्दल आणि नागरी स्वातंत्र्याच्या संकोचाविरुद्ध आवाज उठविल्याबद्दल 'मिसा'खाली अटक करण्यात आली. या गोष्टीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष वेधले आणि राज्यभर त्याचे पडसाद उमटले. सगळ्या लेखकांनी व बुद्धिवंतांनी याचा कडक शब्दात निषेध केला. शेवटी लेखक हायकोर्टात गेले. हेबियस कॉर्पस दाखल केल्यावर न्यायालयाने त्याची निर्दोष मुक्तता केली. १९७१ मध्येच डॉ. एम्. व्ही. रमण रेड्डी यांना 'प्रभंजनम्' हे पाक्षिक काढल्याबद्दल मिसा दाखविण्यात आला. जेव्हा न्यायालयाने सुटकेचा आदेश दिला तेव्हा वारंवार अटक करून तुरुगात टाकण्यात आले आणि अखेर एका खुनाच्या खटल्यात गोवण्यात येऊन जन्मठेपेची सजा देऊन कायमचे गजाआड करण्यात आले. 'मार्च' 'झाजा', 'लेह', रक्तगणम्', 'इप्पुडु विस्तुन्न गली' या पुस्तकावर बंदी घालण्यात आली. यातील कल्पनांना किंवा मांडलेल्या तत्त्वज्ञानाला सरकार रेडिओ, टी. व्ही. किंवा साहित्य अकादमी या हातातल्या साधनांनिशी विरोध करू शकले नाही. १९७३ मध्ये रिव्होल्यूशनरी रायटर्स असोसिएशनच्या वाखर राव, चन्द्रबद राजू व एम्. टी. खान यांना परत मिसाखाली ३० दिवस अडकवून ठेवण्यात आले आणि न्यायालयाने परत सुटकेचा आदेश दिला.

जेव्हा न्याय्य मार्गांनी ह्यांना अडकविणे जिकिरीचे आहे हे पोलिसांना कळून चुकले, तेव्हा त्यांनी खोट्या कटाच्या कहाण्या रचून लेखकांना त्रास द्यायला सुरुवात केली. के. व्ही. रमण रेड्डी. वाखर रेड्डी, टी. मधुसूदन राव, चद्रबंध राजू, एम्. डी. खान, भूमन, कोटेश्वर राव, हे अनेकांपैकी काही लोक अशा खोट्या खटल्यात आज अडकलेले आहेत. या सर्वांना मिसाखाली आणीबाणीत डाबून ठेवण्यात आले होतेच.

'न्यूज अँड व्ह्यूज ऑन चायना' हे नियतकालिक प्रसिद्ध केल्याबद्दल शत्रुघ्न, सरकार आणि सी. एन्. चारी या कॉलेजातील लेक्चरर्संवर सध्या आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

वरगळचे डॉ. आतुरी रगाराव, लोचन, एन्. के. राव, खम्ममचे जीवन, कोटेश्वर राव, विशाखापट्टणचे राजकोंडा विश्वनाथ शास्त्री वगैरेना आणीबाणीत मिसाखाली ठेवण्यात आले होते. 'जननाट्य मंडळीचे' सभासद नरसिंहराव, भूपाल रेड्डी, गद्दर आणि सौ. सध्या याचा शारीरिक व मानसिक छळ करण्यात आला. सध्या ही त्या वेळेला गर्भवती होती. तिचा एवढा छळ करण्यात आला, की त्याची परिणती गर्भपातात झाली.

नागमणी, श्यामसुंदर राव आणि एम्. वेणू यांना नोकरीतून या RWA शी सबंध ठेवल्यावरून काढून टाकण्यात आले. ही यादी एवढी सविस्तर देण्याचे कारण एवढेच को चळवळीकडे किती जण आकृष्ट होत आहेत हे त्यावरून लक्षात यावे. या साऱ्याचा अमल असूनही आजही तशाच क्रान्तिवादी वाङ्मयाची निर्मिती होत आहे.

या साऱ्या १९ महिन्याच्या कालखंडातून सरकारी नोकरही सुटले नाहीत. नक्षलवादी वाङ्मय (आणि ज्याच्यावर बंदी होती असे वाङ्मय) जवळ बाळगल्याच्या आरोपावरून अनेकांना पकडण्यात आले. कोणत्या दिवशी पकडण्यात आले याची नोंद न ठेवण्याची दक्षता पोलिसांनी घेतली. अमानुष मारहाण आणि मानसिक तोल बिघडेल असा मानसिक त्रास त्यांना अनेक आठवडे देण्यात आला.

बी. ज. ख्रिस्तोफर ह्या एक्स्पोर्ट प्रमोशन ऑफिसमधील कर्मचारी. ११-८-१९७६ ला दुपारी साडेतीन वाजता त्याला कस्टडीतच एकदम नेण्यात आले. त्याच्या वरिष्ठांना देखील हे सांगण्याची त्याला परवानगी देण्यात आली नाही. मदनपेठमध्ये त्याला त्याच्या घरी नेण्यात आले. घराची झडती घेण्यात आली. अटकेच्या वेळी ख्रिस्तोफर अॅनेमियाने आजारी होता. घर अस्वच्छ अवस्थेत असल्याचे पाहून त्याच्यावर भूमिगत क्रान्तिकारकांना आश्रय देण्याचा आरोप ठेवण्यात आला. त्याला कानशिलावर सतत मारण्यात आले त्याच दिवशी स्पेशल ब्रँच ऑफिसमध्ये आणून २६-८-१९७६ पर्यंत तेथे ठेवण्यात आले. ११-८-७६ ते २६-८-७६ पर्यंत त्याला आंघोळीची परवानगी देण्यात आली नाही. ख्रिस्तोफरच्या पायावर खुर्चीचे पाय ठेवून त्यावर एक सबइन्स्पेक्टर बसे आणि याच्या खांद्यावर लाठीने प्रहार करी. त्यामुळे त्याचे खांदे सुजले. संपूर्ण शरीरावर आंघोळ न केल्याने फोड आले त्याच्या पालथ्या हातावर बूट दाबून बोटे निकामी करण्यात आली. नंतर पोलिसांनी त्याला त्याच्या बहिणीला चौकीत आणून त्याच्यादेखत तिच्यावर बलात्कार करण्याची धमकी दिली. २५-८-१९७६ ला त्याला घरी आणले. त्याच्या घरात काही नवे अतिरेकी वाङ्मय ठेवले. त्याचे फोटो घेतले. माहीत नसलेल्या मजकुरावर त्याच्या सह्या करून घेतल्या. २६-८-७६ ला त्याला मुशीराबाद जेलमध्ये स्थानबद्ध म्हणून ठेवण्यात आले २९ मार्च १९७७ ला सोडण्यात येऊन मेट्रोपोलिटन मॅजिस्ट्रेट क्रमांक पाच याच्यापुढे हजर करण्यात येऊन लगेच परत अटकेत टाकून १५ एप्रिलला जामिनावर सोडण्यात आले. १० वर्षे नोकरी झालेला हा माणूस घटनेच्या ३११(क) कलमान्वये कारण न दाखवता सरकारी नोकरीतून आज कमी केला गेला आहे.

हे व असेच अनेक प्रकार अराजपत्रित अधिकाऱ्यावर (NGO-नॉन गॅझेटेड ऑफिसर्स) करण्यात आले आहेत.

संशयाचे भूतच मानेवर बसल्यामुळे सापसाप करून झटकण्याचा खेळ सरकारने चालविला आहे. चळवळ आज ज्या स्वरूपात अस्तित्वात आहे, त्या स्वरूपातच सरकारला जास्तीत जास्त धोकादायक आहे. याचे सरळ कारण म्हणजे ती स्थानिक प्रश्नांचा विचार करून पुढे सरकते आहे. जेव्हा लोकशिक्षणाचा अत्यंत जिकिरीचा व महत्त्वाचा प्रश्न नक्षलवादी हाती घेतात, (हा प्रश्न हातात घेतल्याखेरीज तरणोपाय नाही, हे समजल्यावर) तेव्हा सरकारचे आसन जे आजवर केवळ झुंडशाहीवर भक्कम झाले आहे ते डळमळित होऊ लागते.

भेटलेल्या नक्षलवाद्याच्या म्हणण्याप्रमाणे आज जेव्हा काँग्रेसपेक्षा कमकुवत सरकार केन्द्रस्थानी आले आहे, ते जेव्हा नागरी स्वातंत्र्याचा प्रश्नच केवळ पुढे करून सत्तेवर आले आहे आणि मूळ स्वरूपात ते आधीच्या काँग्रेसपेक्षा निराळे नाहीच, तेव्हा लवकरात लवकर सर्व 'कॉम्रेड्स्'ची सुटका करून घेतली पाहिजे.

'एका हातात बंदूक घेऊनच चळवळ चालू राहील. मात्र जर सरकारने सुरुवात केली तरच आम्ही हिंसावादी मार्ग स्वीकारू. हिंसेवर आमचा विश्वास नाही. हिंसा हा अखेरचा पर्याय आहे. जेव्हा जगणेच अशक्य होईल, तेव्हा जरूर हिंसेचा आश्रय घेऊ.' आणीबाणीत विस्कळित झालेली सेना परत शिस्तवार लावण्यासाठी अवधी हवा असल्याने तोपर्यंत सरकारला बोलण्यात गुंतविणे भाग आहे.

एक गोष्ट उघड आहे. योग्य त्या सच्च्या १९७३-७४ च्या विधायक कार्यांच्या बळावर आज चळवळ उभी आहे. हिंसात्मक प्रतलावरून ती लोकशिक्षण व लोकजागृतीच्या प्रतलावर आल्याने ती अधिक प्रभावी, अधिक सुप्तशक्ती बनलेली आहे. समाजाच्या सर्व भागात सर्व थरात – ती पसरली आहे हे नवनव्या आघाड्यावर तोंड देण्याची सरकारची धावपळ पाहूनच स्पष्ट होत आहे.

केवळ गुंड, केवळ पिसाट म्हणून शिक्का मारणे हा मूर्खपणा आहे. एका विशिष्ट ध्येयाने – दिशेने चळवळ पसरत आहे, सरकारची जबर डोकेदुखी झालेली आहे. याच मार्गाने ती पुढे सरकल्यास कोणतीही पाशवी शक्ती तिला थोपवू शकणार नाही. दहा वर्षे सतत दडपशाहीनंतरही चळवळ टिकून राहते ही एकच गोष्ट पुरेशी बोलकी नाही काय?

[ क्रमशः

# आमचे ग्रंथालय

## Doris Day (Her Own Story)

By A. E Hotchner
[ Bantam Books
Pages 362, 1-95 ].

डॉरिस डे ही २८ वर्षांपासून अमेरिकन 'शो बिझिनेस' मध्ये टिकून आहे सामान्य माणसाच्या तिच्याबद्दलच्या कल्पना साफ चुकीच्या आहेत असे ती म्हणते. ते चुकीचे 'इमेज' तुटावे म्हणून ती तिच्याबद्दल पुस्तक लिहिले जावे यासाठी उत्सुक होती. ती दहा वर्षांची असताना तिच्या वडिलाचे तिच्या मैत्रिणीच्या आईशी प्रेमसबध जडले ती १३ वर्षांची असताना ती ज्या मोटारीत बसली होती त्या मोटारीला ट्रेनने धडक दिली. या अपघातामुळे ती कायमची अधू होणार होती, पण ती सुदैवाने वाचली डॉरिस १७ वर्षांची झाली तेव्हा तिचे लग्न एका विकृत माणसाशी झाले. तिच्या तिसऱ्या नवऱ्याशी तिने १७ वर्षे संसार केला. त्यानंतर तिचा तिसरा नवरा दिवगत झाला तेव्हा तिला आढळून आले की आपल्या नवऱ्याने सर्व सपत्ती तर उधळली आहेच, पण त्याखेरीज ५ लक्ष डॉलर्सचे कर्जही केले आहे. हे पुस्तक एका अनुभवी व सवेदना शील लेखकाने लिहिले आहे म्हणून ते इतके चागले रगले आहे. याच लेखकाचे 'Papa Hemingway' हे पुस्तकही फार लोकप्रिय झाले आहे. किंबहुना हेमिंग्वेचे पुस्तक इतके लोकप्रिय झाले, म्हणूनच डॉरिसने हॉचनरला तिच्याविषयीचे पुस्तक लिहायला सागितले.

जेव्हा हॉचनरला डॉरिस पहिल्या वेळेला भेटली तेव्हा ती ५० वर्षांची होती; पण त्या वयातसुद्धा हॉचनरला ती सेक्सी वाटली! ती १९ वर्षांची असताना हॉलिवुडमध्ये आली. तिचे पहिलेवहिले पिक्चर म्हणजे Romance On High Seas आणि या पिक्चरपासून ती सुपरस्टार आहे. जिच्या वाट्याला एवढे घवघवीत यश आले तिला यातना भोगाव्या लागल्या असतील हे खरे वाटत नाही असे हॉचनेर तिला सागतो.

पुस्तक लिहिण्याच्या आधी हॉचनेर तिला बरेच प्रश्न विचारतो व तिला अशी अट घालतो की, रोज ४ तास हॉचनरने तिला भेटावे व त्या वेळेला कुणीही त्याना अडथळा आणू नये. त्या खोलीमध्ये फोनसुद्धा नसावा अशी त्याने अट घातली. हॉचनरने तिला असेही सागितले की डॉरिसबद्दल ते इतर अनेक लोकाच्या मुलाखती घेतील व त्या लोकाचे डॉरिसविषयीचे मत या पुस्तकात दिले जाईल. म्हणजे डॉरिस डे च्या पुस्तकाचे तीन विभाग होतील. एक म्हणजे डॉरिस डे ने स्वत. सागितलेला आत्मचरित्रात्मक मजकूर दुसरा विभाग म्हणजे इतर लोकानी पाहिलेली डॉरिस डे आणि. तिसरा विभाग म्हणजे हॉचनरनी पाहिलेली डॉरिस डे. 'परतु ८०% त्यात तू सागितलेलाच मजकूर रहाणार' असे डॉरिसला हॉचनर म्हणाला. या अटीला सुद्धा डॉरिसने मान्यता दिली.

डॉरिस डे चे 'Que Sera, Sera' हे गाणे एके काळी बेफाम लोकप्रिय झाले होते.

When I was just a little girl,
I asked my mother, 'What will I be?
Will I be Pretty?
Will I be rich?'
Here's what she said to me:
'Que Sera, Sera,
Whatever will be, will be,
The future's not ours to see.
Que Sera, Sera
What will be, will be.'

अल मक्तूब, मक्तूब! जे लिहिले आहे, ते लिहिले आहे!

या गाण्याप्रमाणेच डॉरिसचा दैवावर पूर्ण विश्वास आहे. आपल्या जन्मापासून आपले भवितव्य आपल्या ललाटी लिहिलेले असते अशी तिची ठाम समजूत आहे. डॉरिसच्या आईवडिलाचे वैवाहिक जीवन अगदीच incompatible होते. डॉरिस लहान असताना तिला वाटे की, आपल्या आईवडिलांनी एकमेकाविषयी आदर आणि प्रेम दाखविले तर आपले आयुष्य इंद्रधनुच्या रंगांनी उधळून जाईल! खरं तर डॉरिसची एकच महत्त्वाकांक्षा होती की आपले व आपल्या आईवडिलाचे वैवाहिक जीवन सुखी व्हावे. तिला सुपरस्टार होण्याची मुळी महत्त्वाकांक्षाच नव्हती; पण तिची अपेक्षा फोल ठरली. तिचे आईवडील सोडचिठ्ठी घेईपर्यंत भाडतच राहिले. विसगत, अननुरूप (incompatible) वैवाहिक जीवन म्हणजे त्या कुटुंबासाठी एक मोठी शोकांतिकाच होऊन बसते आणि ती शोकांतिका म्हणजे पाण्याचा प्रपात जसा जोरात ओंडके वाहात नेत असतो–तसे त्या कुटुंबाला विनाशकाळाकडे नेत असते. डॉरिस मात्र याला अपवाद ठरली. तिच्या बालमनाला ज्या काही जखमा झाल्या त्या तिच्या घवघवीत यशाच्या आड आल्या नाहीत. खरच 'Que Sera, Sera. What will be, will be'

ऐन तारुण्यात डॉरिस डे ही जणू आत्ताच सॅलोफॅन रॅपरमधून अनपॅक केली आहे इतकी टवटवीत व ताजी वाटायची. तिचे हे बालिश, निरागस सौंदर्य तिच्या निखालस स्वभावामुळे टिकून राहिले असेल. खुद्द तिच्या वडिलाना तिने आपल्या मैत्रिणीच्या आईबरोबर प्रेम करताना 'ऐकले' तरीसुद्धा तिच्या वडिलाबद्दल तिला अजिबात तिरस्कार वाटला नाही द्वेष व तिरस्कार तिच्या स्वभावातच नाही असे ती म्हणते.

जेव्हा डॉरिसचे वडील त्यांना सर्वांना सोडून दुसऱ्या बाईबरोबर राहायला गेले त्या वेळी डॉरिसचा भाऊ जणू आपले वडील धंद्यासाठी बाहेरगावीच जायला निघाले आहेत एवढ्या निर्विकारपणे आपल्या बाबाचे पॅकिंग करीत होता. जी माणसे भावनाच्या आहारी जात नाहीत ती सुखी होतात. एकदा माणूस भावनाच्या आहारी गेला की, पुढे त्याचे काय होईल ते सागता येत नाही. विशेषत: पाश्चात्य देशात वैवाहिक जीवन incompatible दिसले रे दिसले की घे सोडचिठ्ठी, हा प्रकार काही गैर नाही. वर्षानुवर्षे भांडण करून जवळ राहण्यापेक्षा फारकत घेतलेलीच फार चागले. नाही तर उभयतांना incompatibility ची झळ पुष्कळ प्रमाणात लागते व नवरा–बायको अक्षरश. पिचून जातात; पण आपल्या भारतात पुष्कळ लोकांना याबाबतीत वास्त-

तेच्या सामोरे जाण्याचा धीरच होत नाही. किंबहुना ती त्याच्या कुवतीच्या बाहेरची गोष्ट होऊन बसली आहे.

डॉरिस डे जेव्हा जॉर्जच्या प्रेमात पडते तेव्हा 'लव्ह' आणि 'सेक्स'बद्दलचे तिचे म्हणणे थोडेसे चमत्कारिक वाटते अमेरिकेमध्ये 'फ्री सेक्स'मुळे कदाचित तिकडे हा प्रकार तेवढा चमत्कारिक वाटत नसेल. डॉरिस डे बऱ्याच पुरुषाबरोबर झोपली होती आणि त्या पुरुषात काही पुरुष तिला न आवडणारे होते ! प्रेमाशिवाय कुणाबरोबर झोपणे हा एक शारीरिक पातळीवरचा अनुभव होऊ शकेल, परतु न आवडणाऱ्या माणसाबरोबर झोपणे एक प्रकारचा spiritual torture होऊ शकेल डॉरिसला तसे काही झाले नाही एवढी का ती अलिप्त आहे ? 'सेक्स' आणि 'लव्ह' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. काही व्यक्ती या दोन बाजू वेगळ्या कशा करतात ते त्यानाच ठाऊक !

बॉब हॉप हा डॉरिस डे ला नेहमी 'Jutt Butt' असे म्हणत असे. (Jutting buttocks ?) व तो एकदा तिला म्हणाला होता, 'You know, J B, we would play a nice game of bridge on your ass !'

डॉरिस डे एकदा पार्टीमध्ये गेली होती. तिला पार्टीज् आवडत नाहीत ती जर पार्टीमध्ये गेलीच तर कुणी पाहात नाही अशा वेळी ती एका कोपऱ्यात जाऊन बसत असे; पण एका पार्टीत तिला आल्फ्रेड हिचकॉकने गाठले व तिच्या ॲक्टिंगबद्दल तो तारीफ करू लागला. तो डॉरिसला म्हणाला, 'मी केलेल्या पिक्चरमध्ये तू काम करशील अशी मला आशा वाटते !' आणि पुढे ६ वर्षांपर्यंत डॉरिसला हिचकॉककडून काहीच निरोप आला नाही ! सहा वर्षांनतर डॉरिसने हिचकॉकच्या 'द मॅन हू न्यू टू मच् !' या चित्रपटात काम केले डॉरिसचे प्रख्यात गाणे Que Sera, Sera याच चित्रपटात आहे

जॅक कार्सन हा नट खूप पीत असे. तो थोडासा एककल्ली होता Communicate करायला त्याला फारसे जमत नसे. डॉरिस डे ही थोडी वावदूक आहे त्या कारणामुळे आपले या नटाशी लग्न लावून भले व्हायचे नाही असे डॉरिसला वाटले तिचे आधीचे वैवाहिक जीवन फार वाईट गेल्यामुळे आता लग्न करायचे तर सर्व गोष्टीचा विचार करून करायचे असे तिने ठरविले होते. ३ एप्रिल १९५१ रोजी तिने तिचा एजन्ट मार्टी मेल्चर याच्याशी लग्न (हे तिचे तिसरे लग्न) केले

हॉलिवुडच्या नटाच्याबद्दलची खरी मोजपट्टी म्हणजे अमेरिकेतले थिएटरमालक ज्या पहिल्या दहा यशस्वी नटाना मते देतील ती होय. डॉरिसने फक्त नऊ पिक्चर्समध्ये काम केले होते त्या वेळेला ती या पहिल्या दहाच्या क्रमाकात निवडून आली होती

पुस्तकाच्या शेवटी शेवटी जेव्हा डॉरिसचा मुलगा टेरी याला मोटारअपघात होतो त्या वेळचे वर्णन चागले आहे ही अगदी निरागस, बालिश दिसणारी नटी दैवावर आरूढ होऊन किती फटके खात असते ते वाचून तिच्याबद्दल कौतुक वाटते. टेरीच्या अपघाताचा फटका तर ती तत्त्वज्ञानाचा आसरा घेऊन सहन करते.

फार दिवसानतर एका हॉलिवुड सुपरस्टारचे चागले आत्मचरित्र वाचायला मिळाले, परतु ते एरॉल फ्लीनच्या 'My Wicked, Wicked ways' इतके लोकप्रिय होणार नाही

— जे. एन. पोंडा

फिनिक्स लायब्ररी

---


**नवीन दाखल झालेली काही पुस्तके**

१. स्वरगंगेच्या तीरी : (आत्मचरित्र)—जी. एन. जोशी — रु २०/–
२ गोवा माझा सुखाचा (कादबरी)—प्र श्री नेरुरकर — रु. ८/–
३. हसवंती : (विनोदी कथासग्रह)—अरविंद गजेंद्रगडकर — रु. ७'५०
४. अशी ही मदनरती भेटली ! : (कथासंग्रह)—सौ शैलजा राजे — रु. १५/–
५. घरची दशमी : (विनोदी कथासग्रह)—बा भ. पाटील — रु. १४/–
६. ब्राह्मणकन्या . (सर्वोत्कृष्ट कादबरी)—श्री. व्यं. केतकर — रु १५/–

ENGLISH

1. **Democracy Redeemed** : (Editor of Indian Express tells inside story of the emergency)—V. K. Narsimhan — Rs. 30/–
2. **Black Wednesday** : (Inside story of emergency) —Promilla Kalhan — Rs. 25–/
3. **Supersession of Judges** : (The dramatic story of Supreme Court Judges)—Kuldip Nayar — Rs. 5/–
4. **The Relaxation Response** : (Learn to relax and be sucessful)—Herbert Benson — Rs 11·20
5. **World Without End, Amen** : (Bestseller Novel) —Jimmy Breslin — Rs. 17/–

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

# वेडा वृंदावन

'वेडा वृंदावन' या राष्ट्रीय मिल मजदूर रंगभूमीवर आणलेल्या नाटकाचे लेखक आहेत अॅड. शरद घाग. म्हणजे 'फुलाला सुगंध मातीचा' नावाच्या, रंगभूमीवरून धडाडत जाणाऱ्या आगगाडीच्या पार्श्वभूमीवर रचलेल्या नाटकाचे लेखक. 'वेडा वृंदावन' हे रामन राघवच्या गाजलेल्या प्रकरणावर आधारलेले नाटक आहे असे कळल्यामुळे याही नाटकात, रामन राघवची कर्मभूमी असलेल्या लोकल्सचा सुळसुळाट पाहायला लागतो की काय अशी धास्ती वाटत होती. सुदैवाने, 'हे नाटक 'फुलाला सुगंध' इतके वास्तववादी न करता नुसतेच सायदार, मुलायम, काव्यात्म करावे,' असं लेखकानी ठरविल्यामुळेच (बहुधा) लोकल्सऐवजी सुभाषिताचा आणि अलंकाराचा सुळसुळाट पाहायला मिळतो.

मुंबईत गाजलेल्या या खून-प्रकरणावर आधारलेले नाटक अशी वेडा वृंदावनची कथाकल्पना स्पष्ट केल्यानंतर त्याची सविस्तर कथा सांगण्याचे काहीच प्रयोजन नाही. 'आपली पत्नी विश्वासघातकी निघाल्याने तिच्यावर सूड उगविण्यासाठी तावडीत सापडेल त्या स्त्रीची, तिलाच पत्नी समजून, हत्या करणाऱ्या एका मनोरुग्णाची ही कथा आहे' एवढे सूत्र सांगितले म्हणजे पुरे सर्वच मनोरुग्णाना आपण सरसकट 'वेडा' हे लेबल चिकटवीत असल्याने नाटकाला 'वेडा वृंदावन' असे सुटसुटीत व प्रासात्मक नाव देण्यात आले आहे. मानसशास्त्राच्या प्रांगणात भ्रमण्यापूर्वी एखाद्या तज्ज्ञ लेखकाने विचारविनिमय केला आहे काय हे जाणून घ्यायला मला निश्चितच आवडले असते. निदानपक्षी हे नाटक पाहिलेल्या एखाद्या मानसशास्त्रज्ञाने यावर आपले मत लिहून पाठविले तर ते स्वागतार्ह ठरेल असे वाटते. वृंदावनला नक्की कोणत्या मनोविकृतीने पछाडले आहे? शिझोफ्रेनिया? तो दिवसा नॉर्मल असतो आणि रात्री खून पाडतो असे सर्वसाधारपणे दिसते. त्यावरून डॉ जेकिल अॅन्ड मि. हाइड छापाची ही केस असावी असे वाटते; पण अशा विकृतीने पछाडलेल्या माणसाला आपल्या ऋण व्यक्तिमत्त्वाची इतकी प्रखर जाणीव असते काय? वृंदावनला आपण रात्री काय करतो, कसे वागतो, कसे बदलतो याची सुस्पष्ट कल्पना असते असे नाटकातून दिसते. एवढेच नव्हे, तर आपण असे का वागतो, का असे झालो याचीही जाणीव असते. ती प्रकट करणाऱ्या थेट आत्मवृत्तात्मक स्वगताचा (direct autobiographical soliloquies) प्रदीर्घ मारा वृंदावनने नाटकात केलेला आहे. मनोविकृतीच्या इतक्या acute stage ला पोचलेल्या माणसाला एवढे सुसगत, तपशीलवार व अचूक निदानात्मक स्वत्वज्ञान (self-diagosis, self-realization) असू शकते काय? मनोविकृतीचे विश्लेषण करणाऱ्या, तशा केसेस मांडणाऱ्या, नव्या जाणिवांनी युक्त अशा कलाकृती येऊ पहात आहेत ही गोष्ट स्वागतार्ह आहे; तथापि त्या मानसशास्त्राबद्दल आधीच असलेल्या गोंधळात व सवंग गैरसमजात भर घालणार नाहीत याची दक्षता घेणेही आवश्यक आहे, वर उल्लेखिलेल्या शिझोफ्रेनियाचीच एक केस हिस्टरी मांडणाऱ्या 'महापूर' या थिएटर अॅकॅडमीच्या नाटकाशी वेडा वृंदावनची तुलना केली तर माझा मुद्दा अधिक स्पष्ट होऊ शकेल.

असो लेखनात फसलेले हे नाटक कलाकारानी थोडेफार सावरले आहे, त्यामुळे निदान प्रयोग बोअर तरी होत नाही वृंदावनची मध्यवर्ती भूमिका करणाऱ्या यशवंत दत्त या कलाकाराचा उल्लेख त्या दृष्टीने प्रामुख्याने करायला हवा आपले अस्तित्व असल्याचे भान राखून व समरसतेने ही भूमिका त्याने वठविली आहे अर्थात त्यातील खुनी वृंदावनचे उग्र व्यक्तित्व त्याने वृंदावन या पित्याच्या वत्सल व्यक्तिमत्त्वापेक्षा अधिक प्रभावीपणे साकार केले आहे असे मला वाटते त्याची भूमिकाच नव्हे तर एकदर नाटकच वाजवीपेक्षा जास्त loud, भडक आहे हा दोष फारसा त्याला देता येणार नाही. इतर कलाकारांपैकी अनंतराव वर्तक, कृष्णकांत दळवी, नयनतारा व हवालदाराच्या भूमिकेतील कलाकार याचाही उल्लेख करणे जरूर आहे. भटजीचे पात्र गुणाजी गावडे याना वाव देण्यासाठी किंवा विनोदाचा कोटा पुरा व्हावा यासाठी घातल्यासारखे वाटते. तो प्रवेश एकंदरीत फारसा सुखकारक नाही. नाटकाच्या निर्मितीची व दिग्दर्शनाची बाजू ठीक आहे, आटोपशीर व बंदिस्त आहे एवढेच.

लेखनाच्या मर्यादा, दिग्दर्शक-कलाकार दोघांनाही बांधून टाकणाऱ्या आहेत. लेखनात पसरलेले नाटक असा उल्लेख मी वर केला तो याच अर्थाने. काव्य, सुभाषिते व तत्त्वज्ञान याच्या बेसुमार भडिमाराखाली नाटक केविलवाणेपणाने गुदमरले आहे. वृंदावनच्या लहान मुलाचे पात्र एरवी चांगले रंगविण्यात आले आहे व (मास्टर अलंकारने?) अभिनयही अकृत्रिम केला आहे; पण त्याची पाळी येताच हा बालबृहस्पतीसुद्धा असे काही प्रौढ तत्त्वज्ञान प्रेक्षकाना फेकून मारतो की पुरेवाट होते. अळवावरच्या पाण्यासंबंधीचं बापलेकांचं बोलणं या दृष्टीने तपासून पहाव खुद्द वृंदावनाचार्य तर काव्य-तत्त्वज्ञानाचे (दिवसा तरी) गड्डेच आहेत पाप, जीवन याच्या व्याख्या, स्पष्टीकरणे वगैरे सुभाषिताचे तुषार आणि ही बाईची जात / हिचे सापाचे दात अशा लाबलचक महाकाव्याचे पाणलोट त्याच्या तोंडातून अखंड स्रवत असतात वृंदावन समाजाच्या कोणत्या थरातून आला असावा यासंबंधी कुठलाच विचार लेखकाने ते पात्र लिहिताना केलेला दिसत नाही. किंबहुना बऱ्याच पात्राबाबत तो न केल्याने इन्स्पेक्टर (कृष्णकांत दळवी) व इतर व्यक्तिरेखाही, त्याच्या कृत्यासह, Convincing झालेल्या नाहीत उगीच चार (शे) चमकदार वाक्ये म्हणजे नाटक नव्हे हे आता कुणी कुणाला सांगायचे? ※

## पुण्याच्या नाटयक्षेत्रात नवं

# 'जागर!'

सोमवार दि. २० जून रोजी एका नवीन नाटयसंस्थेची पुण्यात स्थापना झाली. या नाटयसंस्थेच नाव आहे 'जागर'

श्री. माधव वझे, श्री श्याम जोशी, श्री. वासुदेवराव पाळदे, श्री. अरुण जोशी

आणि त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनी मिळून, एकत्र येऊन ही नवी संस्था स्थापन केलेली आहे. यासंबधात बोलताना श्री माधव वझे यानी सांगितलं की, अशा तऱ्हेच्या नाटय-संस्थांची संख्या कमी नसूनही ही आणखी एक नवी संस्था स्थापन करण्याचा हेतू, या क्षेत्रात धडपडणाऱ्या तरुण मंडळींना अधिक वाव देऊन त्याच्या साहाय्याने नव-नवे प्रयोग करून नाटयक्षेत्रात नव 'जागर' घडवून आणणं हा आहे.

या निमित्ताने 'सुकडवाडी स्पीकिंग' ही श्री. मनोहर शहाणे यानी लिहिलेली एकांकिका संस्थेच्या कलाकारांनी सादर केली. तसेच या प्रसंगी थिएटर अॅकॅडमीचे नाटककार श्री सतीश आळेकर यांचा, त्यांच्या 'महानिर्वाण' या नाटकाला राज्यपुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कारही करण्यात आला. अर्थात या सत्कारामागील एक उद्देश पुण्यातील नाटयसंस्थांमध्ये खेळीमेळीचं आणि परस्पर सहकार्याचं वातावरण अधिक वाढीस लागाव हाही असल्याच श्री. माधव वझे यांनी सांगितल. ❊

हिंदी चित्रपट

# रहस्य आणि वास्तवाचा अजोड मिलाफ : शक

'नेहमीपेक्षा वेगळी खून-रहस्यकथा' अशी 'शक'ची जाहिरात केली जाते. शक पाहिल्यानंतर ही जाहिरात खरी असल्याचं जाणवतं आणि एक सुखद धक्का मिळतो. शक (म्हणजे संशय) खरोखरच अनेक अर्थांनी अनेक प्रकारे सर्वसामान्य हिंदी चित्रपटापेक्षा वेगळा आहे आणि त्याच्यातली इतर गुण-वैशिष्टचे जरा बाजूला ठेवूनही प्रामुख्यानं लिहावसं वाटत ते या रहस्यकथेला वास्तवाचं जे अभिन्न आणि सहज सुखद अस्तर दिग्दर्शकानी लावल आहे त्याबद्दल. मुळात हिंदी सिनेमाचा आणि वास्तवतेचा बादरायणसंबंध जोडणंसुद्धा कित्येकदा कठीण जातं. अशा परिस्थितीत रहस्यपटासारखा, एरवी इतरांना स्वैर कल्पनाविलासाचं लायसेन्स देणारा प्रकार हाताळतानासुद्धा शकच्या नवोदित दिग्दर्शकद्वयीन वास्तवतेच जे अखंडित भान राखलं आहे त्याबद्दल ते अभिनंदनाला पात्र आहेत.

'शक'ची कथा-कल्पना कुणाची आहे याचा स्पष्ट खुलासा चित्रपटात वा बाहेरही झालेला नाही. तथापि पटकथा-दिग्दर्शन अरुणाविकास याच्या नावावर आहे आणि शकची कथा ही सत्य कथा आहे, थोडफार फरकानं अशीच प्रत्यक्षात घडलेली आहे, असं चित्रपटाच्या निर्मितीशी संबंध असणाऱ्याकडून कळल्यान कथाकल्पनेचं श्रेयही द्यायचंच तर याच जोडीला द्यायला हरकत नाही. 'आपला नवरा खुनी आहे, आपली आजची श्रीमंती त्यान दहा वर्षांपूर्वी केलेल्या आणि पचविलेल्या एका खुनातून आलेली आहे.' अशा संशयानं पछाडलेल्या एका पत्नीची-मीनाची-ही कहाणी आहे. अर्थातच हकनाक आरोपी ठरलेल्या तिच्या नवऱ्याची-विनोदचीही- आहे. मानसिंग नावाच्या एका इसमाकडून आलेल्या त्या पत्रामुळं मीनाच्या मनात संशयाची ठिणगी पडते आणि तत्कालीन परिस्थितिजन्य पुराव्याचं इंधन मिळाल्यानंतर भडकलेल्या आगीत त्या दोघाच्या संसाराची आहुती पडायची वेळ येते. विनोद दुर्दैवान आपल्या निरपराधित्वाचा पुरावा वेळेवर सादर करू शकत नाही आणि तोच खुनी असू शकेल असं दर्शविणारे पुरावे मात्र पावसाळी ढगांसारखे दाटून गोळा व्हायला लागतात. 'आपल्या नवऱ्याकडे एकाएकी, एका रात्रीत, एवढे पैसे आले कुठून?' या प्रश्नाचं समाधानकारक उत्तर तिला लवकर मिळू शकत नाही आणि मिळतं तेव्हा ती आत्महत्येचा प्रयत्न करायला समुद्रावर गेलेली असते. एकीकडे मानसिंग तिला ब्लॅकमेल करायच्या खटपटीत असतो. दुसरीकडे सत्य शोधून काढण्याच्या तिच्या खटाटोपामुळे विनोद अपमानित होत असतो.

शक हा शेवटी रहस्यपट आहे, तेव्हा त्याची कथा सविस्तर सागणं अन्यायाचच ठरेल. एवढं नक्की की रहस्याच्या नावाखाली दोन-चार इग्रजी सिनेमाचा रस पिळून आणि बेसळून प्रेक्षकाना फसविण्याचा उद्योग शकनं केलेला नाही. बी. आर चोप्राजीच्या जुन्या मर्डर मिस्टरीजची याद यावी अशी पकड घेणारी जबरदस्त कथा शकला लाभली आहे. कथेला दुय्यम स्थानसुद्धा न देणाऱ्या चालू पिक्चराच्या पार्श्वभूमीवर शकच हे वैशिष्टय जास्तच जाणवत रहस्यकथा असूनही यात एखादा बॉस आणि त्याची गँग नाही. मर्डर मिस्टरी असूनही नाटकी मारामाऱ्या नाहीत. लंबेचवडे आक्रस्ताळे कॉर्टसीन्स नाहीत. स्मगलराचे अड्डे दारुविण्याच्या मिषाने श्रीमंतीचे अवास्तव प्रदर्शन नाही. थोडक्यात जे आहे ते खरंखुर आहे, तुमच्या-आमच्याही आयुष्यात अपघातान सहज घडू शकेल असं आहे. ताकदवान कथेनंतर शकचा दुसरा प्लस पॉइंट म्हणजे लेखाच्या प्रारंभीच उल्लेखिलेला हा वास्तववाद. प्रत्यक्षात अत्यावश्यक असलेली ही चीज आज नाटक-सिनेमात, विशेषत. हिंदी चित्रपटसृष्टीत इतकी दुर्मिळ झाली आहे की शकसारख्या तुरळक चित्रपटात ती जाणवल्यानंतर थेट ओॲसिस भेटल्यासारखा आनद व्हावा. या चित्रपटाच्या निमित्तान त्याचे दिग्दर्शक अरुणाविकास-म्हणजे श्री. विकास व सौ. अरुणा देसाई-यांची गाठ पडली, तेव्हा हा वास्तववाद त्याच्या तद्विषयक ठाम विचार-सरणीतून आलेला आहे, अपघातान नव्हे याची खात्री पटली आणि आनंद झाला. या चित्रपटातली घर सुद्धा खरीखुरी, माणसाना राहायला बाधलेली घरं वाटली. इंटिरियर डेकोरेटर्सच्या आणि फॅन्सी फर्निचर मेकर्सच्या जाहिराती वाटल्या नाहीत. उदाहरणादाखल मानसिंगच घर आठवाव. फार काय, शकमधला कॅब्रेसुद्धा अस्सल आहे. मुंबईच्या एका प्रसिद्ध हॉटेलात जसा चालतो तसाच तो चित्रित केला गेलेला आहे. वास्तवतेचा हा धागा तुटू नये म्हणून चित्रपटातली बहुसंख्य गाणी पात्रानी न म्हणता पार्श्व-भूमीत घेतलेली आहेत; पण या सर्वांपेक्षा मुख्य म्हणजे यातली माणसं खरी आहेत. त्यांचे स्वभाव सामान्य माणसासारखे आहेत. ती घरात घरगुती पेहरावातच वावरतात. कुठल्याही सामान्य माणसाप्रमाणे ती एकच कपडा धुऊन दोनदा घालू शकतात. ती चद्रतारेनक्षत्राची भाषा बोलत नाहीत आणि या सगळ्यामुळेच त्याची सुखदु:ख, रागलोभ, भावना-वासना, किंबहुना त्यांचं अस्तित्व हे कुठ तरी

आपल्यालाही येऊन भिडण्याइतकं खरं आहे असं आपल्याला वाटत राहतं. संपूर्णपणे Convinciug अशा व्यक्तिरेखांच्या इतका सुंदर संच मी हिंदी पडद्यावर यापूर्वी क्वचितच पाहिला असेल. मानसिंग ही खलसदृश व्यक्तिरेखा तर Fascinating वाटावी इतक्या जिवंतपणानं आणि समर्थपणानं उभी केली आहे. हा 'दुर्दैवी' खलनायक इतर हिंदी सिनेमातल्या अललडुर्र छापाच्या फुलटाइम, धंदेवाईक आणि जन्मजात खलनायकांपेक्षा किती तरी वेगळा आणि खरा वाटतो. मनोविश्लेषणाचा कोणताही आव न आणता मानसिक रुग्णतेची एक उत्तम 'केस' मानसिंगच्या रूपानं अरुणाविकास यांनी आपणासमोर मांडली आहे. अभिनयाचा कस पाहणारी ही भूमिका उत्पल दत्त या श्रेष्ठ बंगाली अभिनेत्यानं दीर्घकाळ स्मरणात राहील अशा विलक्षण सामर्थ्यानं जिवंत केली आहे. इतकी की त्याच्याशिवाय इतर कुणी ही भूमिका पेलू शकलं असतं असं वाटतच नाही. अर्थात हा माणूस लहानशाही भूमिकेवर आपलं नाव सहज कोरून जाण्याबद्दल आणि त्यायोगे सिनेमावरच आपला खोल ठसा उमटविण्याबद्दल प्रसिद्ध आहेच. शकमधल्या मीना व मानसिंगना दोन्ही भेटी उत्पलदांनी आपल्या विलक्षण जिवंत प्रत्ययकारी अभिनयानं संस्मरणीय करून ठेवल्या आहेत. सिनेमाच्या शेवटच्या भागाबद्दलही तेच म्हणता येईल. तुम्हारे डॅडी शेर जरूर मार सकते हैं। शेर क्या कुछ भी मार सकते हैं।' यासारखी वाक्ये आणि विनोद–मानसिंगची भेट होते तो मानसिंगच्या घरातला संपूर्ण प्रसंग, उत्पलदांचा कमालीच्या realistic आणि ताकदवान संवादफेकीचे उत्कृष्ट नमुने, म्हणूनच माझ्या लक्षात राहिले आहेत. अर्थात एखाद्या सिनेमातला व्हिलन वेगळा म्हणून, सहानुभूतीसह लक्षात राहतो तेव्हा त्याचं श्रेय उत्पल दत्तप्रमाणेच अरुणाविकासनाही मिळालं पाहिजे हे मला मान्य आहे.

मानसिंगच्या खालोखाल विनोदच्या भूमिकेत विनोद खन्नानं समरसतापूर्ण अभिनयाचं मनोवेधक दर्शन घडविलेलं आहे. तो नुसताच फायटर नसून चांगला अभिनेताही असल्याची चुणूक त्यानं अचानक आणि इम्तहानमध्ये दाखविली होतीच; तथापि शकमधली त्याची भूमिका ही (माझ्या पाहण्यातली तरी) त्याच्या आजवरच्या कारकीर्दीतली सर्वोत्कृष्ट भूमिका ठरावी. त्याच्या या घरेलू भूमिकेत तो एक पती, एक पिता, विनोद जोशी नावाचा एक ऑफिसर आणि पत्नीचा विश्वास गमावल्यानं संकटाच्या वावटळीत सापडलेला एक माणूस वाटतो, अमर अकबर अँथनी मधला एकतृतियांश हीरो किंवा चोर-सिपाहीमधला एकद्वितियांश हीरो विनोद खन्ना वाटत नाही यातच पुष्कळ काही आलं. शबाना आजमीसारख्या अभिनयनिपुण समजल्या गेलेल्या अभिनेत्रीसमोर उभं राहून त्यानं आपल्या भूमिकेत प्राण ओतला आहे आणि तिच्यापेक्षा निश्चितच सरस काम केलं आहे, असं मला वाटतं. शबानानंही (तिचं तान्ह्या पोरासारखं हास्यास्पद रडणं वगळता) चालू तिच्या सिनेमांपेक्षा पुष्कळच सुसह्य भूमिका वठविलेली आहे, तिच्याकडून यापेक्षा अधिक अपेक्षा करायला हरकत नव्हती. बिंदू, जे. के. बानर्जी, मास्टर अतुल, सुहास भालेकर आणि मुख्य म्हणजे फ़रिदा जलाल यांच्या दुय्यम भूमिकाही लक्षात राहण्याजोग्या उत्तम वठल्या आहेत. अरविंद देशपांडे व व. पु. काळे यांचेही ओझरते दर्शन घडते.

शकच्या यशाचा फार मोठा वाटा त्याचे सहनिर्माते, कथापटकथाकार, संकलक आणि दिग्दर्शक अरुणविकास यांना देणे, त्यांच्या contribution चा विचार करता न्यायाचे होईल. फिल्म इन्स्टिटयूटचे विद्यार्थी असलेल्या या पतिपत्नींनी चित्रपटावर भरपूर बौद्धिक परिश्रम घेतल्याचे जाणवते. त्यांच्या हाताळणीमुळेच murder mystery with a difference ही चित्रपटाची जाहिरात सार्थ ठरते. कै. वसंत देसाई यांचे संगीत लाभलेल्या (अनेक शेवटच्या चित्रपटांतला) 'शक' हा शेवटचा चित्रपट 'अभी ना परदा गिराओ' व 'दो नैनों के पंख लगाकर' ही दोन गाणी (गीतकार: गुलजार) त्यांनी लक्षात राहण्यासारखी दिली आहेत. 'मेहा बरसने लगा है' हे गाणं शब्ददृष्ट्या ठीक असलं तरी चालीत नाविन्य नाही.

खूनकथा–रहस्यपटांना यशस्वी होण्यासाठी जो मालमसाला लागतो तो शकमध्ये नाही आणि तरीही पुण्यामुंबईत आज शक तुफान गर्दीत चालतो आहे; तेव्हा तो व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी ठरल्याचे विधान करणे धाडसाचे होणार नाही. साफसुथरे (neat & clean) व्यावसायिक चित्रपट प्रेक्षक आनंदानं स्वीकारतात एवढा धडा यातून हिंदी सिनेमावाले घेतील तर भले होईल. त्यांचे आणि आपलेही. □



## अवती-भवती : पृष्ठ ४ वरून

उघड होते. त्यामुळे चर्चा कोठेही आणि कितीही झाल्या तरी अखेरीस गोष्टी निश्चित होणार होत्या त्या चरणसिंग यांच्या मर्जीनुसारच हे स्पष्ट असल्याने एक सी बी. गुप्ता यांचा अपवाद वगळता बाकी सर्व मडळी चौधरीशी सपर्क साधून होतीच. चौधरी चरणसिंग याच्या बाबतीत मधू लिमये असेही म्हणाल्याचे समजते की, मते खेचून आणण्याचे सामर्थ्य असलेल्या नेत्याला डावलून पुढे जाता येणार नाही आणि उत्तरप्रदेशामध्ये तर जाठ, आहिर, लोढा, कच्छी, मुसलमान सगळ्याची मते खेचून आणण्याची किमया चौधरी चरणसिंग यानी केली. त्यामुळेच जनतापक्षातर्गत रस्सीखेच सुरू झाल्यावर लिमये–देशमुख–राजनारायण यानी चौधरीच्या इच्छेप्रमाणे सूत्रे हलविली, तर बहुगुणा-गुप्ता–चद्रशेखर यानी वेगळी वाट पकडून रामधन याचे नाव पुढे रेटले. जून वीसला दोन्ही गटाची बैठक झाली. त्याच वेळी यादव याचे पारडे जड होणार हे स्पष्ट दिसून आले. यादवगटाच्या बैठकीला २६२ आमदार उपस्थित होते, तर रामधन केवळ साठ आमदाराना आकर्षित करू शकले पार्टीच्या अतर्गत राजकारणाला विलक्षण धार आली. भालोद आणि जनसघ यानी कोणत्याही परिस्थितीमध्ये यादव याना निवडून आणण्याचा चग बाधला. जनसघाच्या आमदारानी डोळे झाकून यादव यानाच मत दिले पाहिजे असा आदेश नानाजीनी दिला. विर्सजित विधानसभेमधील विरोधी पक्षनेते एस. पी. मालवीय याना राजनारायण यानी असे सागितल्याचे समजते की, यादव याना पाठिंबा दिला नाही तर मत्रिपद भूषविण्याची सधीही घालवून बसाल ! बड्या मडळीनी यादव याच्यासाठी असा जोरदार पाठपुरावा केल्यावर निवडणूक होण्यापूर्वीच यादव येणार हे निश्चित झाले. प्रश्न फक्त मताचा होता रामधन याना ११० पेक्षा जास्त आमदाराचा पाठिंबा मिळणार नाही हे स्पष्ट होऊन चुकले होते, पण आता माघार घेणे कुणालाच शक्य नव्हते. कॉंग्रेसमध्ये लोकशाही शाबूत असताना इदिरा–मोरारजी अशी जी लढत झाली त्या वेळीही मोरारजी येणार नाहीत ही दिसती गोष्ट होती; परतु म्हणून काही निवडणूक व्हायची टळली नाही. ठरल्याप्रमाणे निवडणूक झाली आणि मोरारजी पराभूत झाले. त्या निवडणुकीची आठवण यावी इतके एक पारडे या वेळीही जड होते. अपेक्षेप्रमाणे यादव निवडून आले. त्याना २७६ मते पडली तर रामधन याना १०३ मते पडली. पक्षातर्गत लाथाळ्या निवडणुकीनंतरही चालू राहिल्या तर यादव याच्यामागे कितीही बक्कळ बहुमत असले तरी त्याना कारभार करणे सोपे जाणार नाही हे स्पष्टच आहे. भरपूर साठमारीनतर यादव सुभेदार झाले आहेत. आता सुभेदारी कशी करतात ते पाहायचे. • ◻

## ◻ पंजाब–प्रकाशसिंग बादल

केंद्रीय मंत्रिमंडळामधील कॅबिनेटदर्जाचे मत्रिपद सोडून पंजाबची धुरा साभाळण्यासाठी पुढे आलेले प्रकाशसिंग बादल यानी राजकारणाची चव चाखली ती कॉंग्रेसच्या सोनेरी चमच्याने. १९५७ साली त्यानी कॉंग्रेसपक्षाचा उमेदवार म्हणून निवडणूक लढविली आणि आमदारकीची झूल अंगावर चढविली. कॉंग्रेसमध्ये असले तरी ते शिखाचे राजकारणही खेळतच होते शिरोमणी प्रबंधक कमिटीचे ते निवडून आलेले सदस्य होते धर्मकारण आणि राजकारण याचे सूत जमविता–जमविताच ते अकाली राजकारणामध्ये ओढले गेले. १९६९ सालची मध्यविध निवडणूकही त्यानी यशस्वीपणे जिकली. पदवीधर असलेल्या या पंजाबच्या नवीन मुख्य मत्र्याची उमर आहे पन्नास वर्षाची. अत्यंत सपन्न अशा जमीनदार कुटुबामध्ये त्यांचा जन्म झाला आहे बादल हेच त्यांचे गाव. अकाली राजकारणच जर पजाबमध्ये मूळ धरणार असेल तर त्यातल्यात्यात मवाळ मनुष्य बरा अशी पजाबी हिंदूची धारणा आहे आणि पजाबी हिंदूच्या हिशेबी आपण मवाळ गटामध्ये जाऊन बसू अशी दक्षता बादल यानी घेतली आहे. स्वाभाविकपणे पजाबी हिंदूना प्रकाशसिंग बादल हे जवळचे वाटतात आज मुख्य मत्रिपदाची वस्त्रे त्याच्या अगावर चढत आहेत याचे एक प्रमुख कारण म्हणूनही या गोष्टीचा उल्लेख करता येईल. १९७०–७१ साली त्यानी अल्पकालासाठी मुख्य मत्रिपदाची ऊब अनुभविली आहे; परंतु आपल्याच पक्षामधील सत्तालोभी मडळीच्या अतस्थ राजकारणाने त्याचा बळी घेतला आहे. सत्ताभ्रष्ट झाल्यावर चौकशीमंडळे मागे लावून देण्याची प्रथा आपल्याकडे आहेच. बादल यांच्याविरुद्ध असलेल्या आरोपाची चौकशी करण्यासाठी असेच मडळ नेमले गेले करुणानिधीच्या सदर्भामध्ये कमिशन नेमणुकीचा ज्याप्रमाणे हत्यारासारखा उपयोग केला गेला त्याचप्रमाणे कॉंग्रेसने कमिशनच्या चौकशीचा पुरेपूर फायदा उठवून प्रकाशजीना बदनाम करण्याची सधी पुरेपूर साधून घेतली.

आणीबाणीपर्वामध्ये प्रकाशसिंग बादल ताठ मानेने उभे राहिले इतकेच नव्हे तर अकाली मडळीनी आणीबाणीच्या विरोधामध्ये जो ३० हजाराचा प्रचड मोर्चा आयोजित केला होता त्याचे सयोजन आणि नेतृत्व बादलजीनी केले. आणीबाणीच्या कालखडामध्ये त्यानी जी तडफ दाखविली त्यापुढे कमिशनचा बागुलबुवा कुठच्या कुठे वाहून गेला. आणीबाणीपूर्वीचे त्याचे नेतृत्व आणि आणीबाणीनंतरचे त्याचे नेतृत्व यामध्ये जाणवण्यासारखा एक फरकही आहे. सत फत्तेसिंग व सत चरणसिंग याचा शिष्योत्तम म्हणून त्यानी पूर्वी राज्य केले. बादलजी मुख्य मत्री असले तरी सत्तासूत्रे त्या दोघानी साभाळली, परतु या वेळी मात्र बादल याना स्वत चे तेज प्राप्त झाले असून आपल्या मनाप्रमाणे कारभार करण्याचे स्वातत्र्य त्यांना निश्चितपणे मिळाले आहे. पजाबमध्ये आपण परत गेलो तर अधिक सामर्थ्यशाली होऊ असा विश्वास आल्यावरच त्यानी दिल्ली ते चंडीगढ असा उलटा प्रवास केला. बादलजीची राहणी सीधीसाधी आहे. स्वत बद्दल ते जरा जास्तच निष्काळजी आहेत असे त्याना जवळून ओळखणारे लोक बोलतात. टेरिकॉट पॅंट, बुशशर्ट आणि शिख फेटा असा त्याचा सीधासाधा पेहराव आहे. माणूस चांगला आहे–सीधा आहे, पण एवढ्या गोष्टी पुरेशा नाहीत. राज्यकारभार ते कसा करतात याच गोष्टीला जास्त महत्त्व आहे.

## □ दिल्लीची हवा

पंतप्रधान मोरारजी देसाई आपले मंत्रिमंडळ अद्याप पूर्ण करू शकले नाहीत ही गोष्ट अनेकांना खटकते. दिल्लीहून प्रसिद्ध होणारे 'द लिंक' हे काही जनतापक्षाबद्दल सहानुभूती बाळगणारे साप्ताहिक नव्हे आणि तरीही राजधानीचे वृत्त देताना या साप्ताहिकाच्या प्रतिनिधीनें काहीशा नरमाईने लेखणी चालवली आहे. मंत्रिमंडळाचा विस्तार ही आवश्यक आणि अपरिहार्य गोष्ट लांबतच चालली आहे. आणि त्याचा ताण विद्यमान मंत्र्यांना चांगलाच जाणवतो आहे. दीर्घकाळ चाललेले अंदाजपत्रकी अधिवेशन अनेक मंत्र्यांना त्रासदायक ठरत आहे. त्यांना त्यांची स्वतःची खाती तर संभाळावी लागतातच पण त्याखेरीज सरकारी अथवा राजकीय दौऱ्यावर असलेल्या आपल्या सहकाऱ्यांचे कामही करावे लागते. म्हणजे खात्याच्या कामात ते ढवळाढवळ करतात असे नव्हे; परंतु लोकसभेमध्ये त्यांना आपल्या सहकाऱ्यांसाठी उभे रहावे लागते. पंतप्रधान आपले मंत्रिमंडळ पूर्ण करण्यास उत्सुक आहेतच, परतु प्रत्येक वेळी अन्य महत्त्वाच्या कारणासाठी हे अप्रिय काम त्यांना पुढे ढकलावे लागले आहे. प्रथम विधानसभांच्या निवडणुका आल्या, त्यानंतर राज्यांच्या मुख्य मंत्र्यांच्या निवडीचा प्रश्न आणि विविध राज्यांमधील जनतापक्षाची मंत्रिमंडळे स्थापन करण्याबाबत निर्माण झालेले प्रश्न यांनी डोके वर काढले. आता उगाच थोडयासाठी आधी कडवटपणा नको म्हणून मंत्रिमंडळ विस्तार–प्रकरण राष्ट्रपतिपदाची निवडणूक होईपर्यंत लांबवण्यात आले आहे. असे सांगतात की सुमारे १५० खासदार मंत्रिपदासाठी इच्छुक उमेदवार म्हणून आपला दावा रेटत आहेत. त्यात पुन्हा जनतापक्षामधील घटकपक्षाचे राजकारण, जातिजमातीचे प्रतिनिधित्व, राज्यवार वाटणी अशा विविध गोष्टी विचारात घेऊन जनतासरकारचे मंत्रिमंडळ पूर्ण होणार असल्याने नवीन सदस्याची निवड ही एक अवघड डोकेदुखीच होऊन बसली आहे. म्हणूनच अन्य सर्व तातडीचे राजकीय प्रश्न निकाली निघाल्यानंतरच या प्रश्नामध्ये डोके घालण्याचे ठरविण्यात आले असावे.

मंत्रिमंडळाच्या विस्ताराबरोबरच अन्य काही गोष्टीही मार्गी लावण्यास पंतप्रधान उत्सुक असून खात्याची पुनर्रचना हा त्यापैकी एक महत्त्वाचा भाग आहे. पंतप्रधान स्वतः या पुनर्रचनेमध्ये लक्ष घालत आहेत. विविध खात्यामधील सचिवांची संख्या कमी करण्याचा शासनाचा विचार असून– त्यासाठीही काही निश्चित योजना तयार करण्यात येत आहेत. एनर्जी आणि पेट्रोलियम ही अलग खाती एक करण्यात येणार असून वीज व कोळसा याचा समावेशही याच मंत्रालयामध्ये करण्यात येणार आहे. केमिकल्स आणि फर्टिलायझर्स हा पूर्वी केवळ एक विभाग होता. श्री. पी. सी. सेठी याना सामावून घेण्यासाठी पेट्रोलियममंत्रालयाच्या या विभागाला स्वतंत्र मंत्रालयाचा दर्जा देण्यात आला. आता हे खाते स्वतंत्र ठेवण्यात येऊन एखाद्या राज्यमंत्र्याला स्वतंत्रपणे काम करण्याचा दर्जा देण्यात येईल अथवा इंडस्ट्री, पेट्रोलिअम् आणि केमिकल्स' ही तिन्ही एकत्र करून त्याचे स्वतंत्र खाते केले जाईल.

माहिती आणि नभोवाणी मंत्रालयाच्या पुनर्रचनेबाबत जोरदार हालचाल चालू असून आकाशवाणी आणि दूरदर्शन याना स्वायत्त महामंडळाचा दर्जा देण्याचा विचार मूळ धरत आहे. डी. ए. व्ही. पी. (डायरेक्टर ऑफ ऑडो–व्हिज्युअल पब्लिसिटी) हे एका विशिष्ट गटाचे कुरण झाले असून याच्या पुनर्रचनेचा किंवा हा विभागच पूर्णपणे बंद करण्याबाबतचा विचार जोरात चालू आहे. मंत्रालयाच्या पुनर्रचना होत असताना– त्याचा तडाखा अनेक खात्याना बसणार आहे. शेती आणि पाटबंधारे, कंपनी अफेअर्स, कायदा, जहाज व वाहतूक अशा किती तरी मंत्रालयामध्ये लहानमोठे बदल होतील असे दिसत आहे.

मंत्रिमंडळाचा विस्तार होत असतानाच सध्या मंत्रिपदी असलेल्या काही मंडळीना डच्चू दिला जाण्याची शक्यता आहे. राजनारायण यांचे नाव या संदर्भात घेतले जात असले तरी– त्यांना मंत्रिमंडळातून वगळल्यास त्याचे गंभीर परिणाम होतील याची जाणीव असल्याने प्रथम केवळ त्याचे नाव पुढे करून काय प्रतिक्रिया उमटतात हेही पाहिले जात असावे. ज्याच्या आग्रहामुळे राजनारायण मंत्रिमंडळामध्ये आले त्या चरणसिंग यांना दुखवणे– आज कुणालाही परवडण्यासारखे नाही आणि तरीही राजनारायण यांचे नाव घेतले जात आहे. त्याखेरीज रवींद्र वर्मा आणि सिकंदर बख्त या दोघाच्या नावाचा समावेश आहे. रवींद्र वर्मा याचे मूळ खाते काढून घेऊन त्याना एक तडाखा दिला आहेच. कदाचित ते वगळले जाण्याची दाट शक्यता आहे. सिकंदर बख्त याचाही म्हणावा तसा प्रभाव पडू शकलेला नाही असे अनेकाना वाटते. कोणत्याही परिस्थितीमध्ये एकदा घेतलेल्या मंत्र्याला तसेच काही कारण असल्याशिवाय काढू नये असाही एक सूर आहे. या सगळ्या अडचणीतून वाटचाल करीत पंतप्रधानांना आपले काम पूर्ण करायचे आहे. राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीनतर अर्थातच सगळयाचेच लक्ष मंत्रिमंडळाची वृद्धी, खात्याची पुनर्रचना या गोष्टीकडे जाणार आहे. नवीन मंत्र्याचा शपथविधी होऊन कारभार सुरू झाला म्हणजे मगच जनतासरकार स्थापन झाल्याची प्रक्रिया पूर्ण होऊन कामाला प्रारंभ होईल अशी लक्षणे दिसत आहेत.

□

# साप्ताहिक भविष्य

- कृष्ण माईणकर

**२३।७।७७ ते २९।७।७७**

### भारत सरकारच्या कडक धोरणाची चाहूल

मकरराशीच्या समोर शनि–रवीचा सहयोग झाला आहे व पंचमस्थानी मंगळ आरूढ झाला आहे. त्याचे परिणाम भारताच्या कारभारविषयक धोरणांवर कडक उपायाची चाहूल हेच होत. विशेषत: मंगळामुळे पाऊसपाणी चांगली साथ देणार आहे. उत्पादन करण्यात यश येणार आहे. कारभारयंत्रणेवर काही शिस्तीची बंधने घालावीत काय असा विचार सुरू होईल. औद्योगिक धोरण कामगारांच्या बाजूकडे झुकेल. स्वस्ताई करण्यास व भाववाढ रोखण्यास कडक उपायांची कारवाई होण्याची शक्यता आहे. व्यापारीवर्गाने तसेच बड्या उद्योगानी स्वार्थी धोरण बदलावे म्हणून त्यांच्याविरुद्ध लोकमत उग्र बनेल. मात्र जीवनावश्यक वस्तूची अगर इतर कोणत्याच वस्तूची टंचाई भासणार नाही. राजकीय क्षेत्रात कॉंग्रेसला बराच प्रतिकूल काळ आहे. अमेरिका भारताला आर्थिक मदतीचा हात पुढे करून मैत्री वाढवील. चीनच्या धोरणात अनुकूल बदल होईल. परराष्ट्रमंत्री श्री. अटलबिहारी वाजपेयींची लोकप्रियता वाढती राहील.

**मेष : आव्हाने स्वीकारा.**

बारावा केतू तुम्हाला अडचणी निर्माण करण्याचा सतत प्रयत्न करणार आहे; पण त्याला यश येणार नाही. कारण दुसरा मंगळ, तिसरा गुरु आणि चौथे रवि–शनि एकजुटीने तुम्हाला मदत करताना तुमच्या पाठीमागे उभे आहेत. त्याचा फायदा तुम्हाला मिळणार आहे. या वेळी नव्या आशाआकांक्षांची नवी क्षितिजे दृष्टिपथात येतील. प्रोत्साहक घटना घडतील. तुमच्यासमोर जी आव्हाने उभी राहतील ती अनुकूलच असतील म्हणून तुम्ही ती अवश्य स्वीकारा. व्यापारीवर्गाने मोठे वायदे करताना जरा जपून करावेत. पण एकूण आर्थिक बाजू चांगली राहील. नोकरीव्यवसाय प्रगतीकडे झेप घेईल. बेकाराना शुभदायक आहे. शुभ दि. २५–२७

**महिलांना :** मन:स्थिती चिंतायुक्त राहील पण सारे चांगले घडेल.

**विद्यार्थ्यांना :** स्मरणशक्तीने इतरानो चकित कराल.

**वृषभ : समृद्धीची चाहूल.**

माणूस अधिक हाव धरतो तेव्हा तो अधिक नाराज होतो. जेव्हा तो समाधानाने राहतो तेव्हा तो अधिक आनंदी होतो, हे सूत्र तुम्ही ध्यानी घेतले तर मित्रहो, आज सर्व राशीत तुमच्याइतका भाग्यवान दुसरा कुणी नाही याची तुम्हाला खात्री पटेल. दुसऱ्या गुरूने तुमची प्रतिभा जागी होणार आहे व लेखनकला या क्षेत्रात तुमचे नाव गाजणार आहे. तिसरा रवि शनि तुमच्या कर्तृत्वाला झिलई देणार आहेत. नव्या नव्या योजना आखण्यास फार अनुकूलता निर्माण करणार आहेत. पैसा कमी ही तुमची तक्रार यापुढे इतिहासजमा होईल. समृद्धीची चाहूल लागणार आहे रेस–लॉटरीत लाभ होईल. व्यवसाय भरभराटीला आणण्यात यश येईल. शुभ–दि. २३–२४.

**महिलांना :** कलाक्षेत्रात नाव व पैसा मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** शिष्यवृत्ती मिळण्याची शक्यता आहे.

**मिथुन : अनपेक्षित खर्च.**

मंगळ हा सामर्थ्यवान ग्रह असतो. तो अनुकूल असला तर तुम्हाला भरपूर देतो पण प्रतिकूल झाला तर त्रास देतो. सध्या तुम्हाला मंगळ बारावा झाला आहे. तो तुमच्याभोवती मानसिक ताप निर्माण करणार आहे. मनाविरुद्ध घटना घडून वैताग निर्माण होईल. पण गुरू तुमचे रक्षण करणार आहे. तो जास्त देणार नाही. सर्व प्रतिकूल परिस्थितीतून तुमची सुटका करून प्रगतीचा वेग कायम ठेवील. नोकरीत कामाचा ताण वाढला तरी कुरकुर करू नका. गरजेपुरते पैसे मिळतील. लेखनव्यवसायात मन रमणार नाही. तरीपण ते हातून होईल. नवीन धंद्याला या वेळी हात घालू नका. अकस्मात उद्भवलेल्या खर्चाला तोंड द्यावे लागेल. शुभ दि. २५–२७.

**महिलांना :** गुरूची अनुकूलता असल्यामुळे मन निराश होणार नाही.

**विद्यार्थ्यांना :** परिश्रमाचे योग्य फळ मिळेल.

**कर्क : आत्मविश्वास वाढेल**

एक गुरूची प्रतिकूलता सोडून दिली तर या वेळी सारे ग्रह तुम्हाला अनुकूल आहेत. तुम्हाला सर्व प्रकारे साथ द्यायला ते राजी आहेत. लेखनवाचन व मनन यात थोडीफार अडचण निर्माण होणार असली तरी एकूण परिस्थिती असामान्यपणे तुम्हाला अनुकूल आहे. रवी-शनीचा सहयोग तुमचा आत्मविश्वास वाढवणार आहे व तुमच्या हातून खूप मोठी कामगिरी घडवणार आहे. स्वतंत्र धंद्यात तुमचे कर्तृत्व चमकेल व बुद्धीचे कौतुक होईल. तंत्रज्ञान व पैसा याची मदत मिळेल. अनेकाचे सहकार्य मिळेल. नोकरीत प्रभाव वाढेल. तुमचे म्हणणे वरिष्ठाच्या मनात आदर निर्माण करील अपेक्षासफलतेचा आनंद मिळेल. प्रवास घडेल. दैवाची अनुकूलता तुमचे यश वृद्धिंगत करील. बेकारांची चिंता दूर होईल. शुभ २६, २७.

**महिलांना :** बचतीचा प्रयत्न सफल होईल.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासात काळजी घेणे आवश्यक आहे

**सिंह : विरोधातून जावे लागेल**

चढउतार हे माणसाच्या पाचवीला पुजलेले असतात प्रत्येकाला या चढउतारावरून जावेच लागते या वेळी तुम्हाला गुरूमंगळ यासारखे ग्रह भरपूर अनुकूलता निर्माण करणार आहेत तर रवी-शनी विरोधी वागणार आहेत. प्रामुख्याने रवी राजकीय विरोधक निर्माण करील. मित्राचे शत्रू होतील; पण हे वादळ तात्पुरतेच ठरेल. कारण गुरूव मंगळ विरोधकाचे डावपेच व मनसुबे उधळून लावणार आहेत. या वेळी काही हितकारकदेखील घडेल. नोकरीत वर्चस्व वाढेल. वरिष्ठांच्या मर्जीचा अनुभव येईल. ज्यांच्या नोकऱ्या कायम झाल्या नसतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील स्वतंत्र धंद्याच्या परिस्थितीत सुधारणा होईल. शुभ २४, २६.

**महिलांना :** नोकरीत अधिकार वाढतील.

**विद्यार्थ्यांना :** अडचणीतून यश मिळेल.

**कन्या : यशाची चढती कमान**

अंतरिक्षातील आघाडीवर असलेल्या राशीतसुद्धा तुमची गणना होत आहे. भाग्यस्थानी मंगळ, दशमात गुरु, लाभस्थानी रवी-शनी सारेच ग्रह कसे हवे तसे अनुकूल आहेत. राशीतच राहू स्वगृही आहे. याचा

अर्थ भाग्यरेखा विलक्षण उजळणार आहे. जे घडणार नाही असे वाटत होते ते सारे अनुकूल घडणार आहे. अपेक्षापूर्तीचा आनंद मिळणार आहे आशा-आकांक्षा सफल होणार आहेत नोकरीधंद्याची स्थिती सुधारणार आहे. आर्थिक बाजू भक्कम होईल चार पैसे मनासारखे खर्च करू शकाल. ठरलेली कामे व्यवस्थित पार पडतील. लोकांत मान मिळेल. तुमची स्तुती होईल. गुणांचे कौतुक होईल. अनेक दिवस उराशी बाळगलेल्या आशा-आकांक्षा सफल होतील. आरोग्याच्या तक्रारी दूर होतील. या वेळी सर्वच बाबतीत यशाची चढती कमान राहील. शुभ २३, २४

**महिलांना** : कौतुक आणि आनंद वाट्याला येईल.

**विद्यार्थ्यांना** : शिक्षकाकडून शाबासकी मिळेल.

**तूळ : प्रतिष्ठा उंचावेल**

हा आठवडा प्रगतीच्या नव्या वाटा दाखवीत प्रवेश करीत आहे. त्यामुळे बाराव्या राहूमुळे विनाकारण भयग्रस्त बनलेले तुमचे मन प्रसन्न व्हायला मदतच होईल. या वेळी असामान्य अशा प्रसंगी अनुकूलता आहे. त्यामुळे अनेक महत्त्वपूर्ण घटना घडणार आहेत. आगामी काळाची सुवर्णस्वप्ने साकार होण्यासारख्या नव्या संधी उपलब्ध होतील. रवी-शनी प्रतिकूलतेचे सारे ढग उधळून लावणार आहेत. या वेळी जे पेराल ते यश घेऊन उगवणार आहे. नोकरीत तुमच्या कार्यक्षमतेला बहर येईल. इतरांना न झेपणारी जबाबदारी तुम्ही सहज पार पाडू शकाल. या वेळी प्रमोशन, बढती असे सुद्धा घडू शकेल. दुय्यम धंद्यातील मंदी दूर होऊन मनात ठरविलेल्या योजना प्रत्यक्षात आणू शकाल. शुभ २६, २७.

**महिलांना** : संसारी जीवन बरेच सुखकारक होईल.

**विद्यार्थ्यांना** : अनेकांची मदत मिळेल.

**वृश्चिक : प्रगतीची चिन्हे**

राशिस्वामी मंगळ सातवा झाला आहे तर गुरु आठवा झाला आहे. हे दोन्ही ग्रह तसे प्रतिकूल नसले तरी अनुकूलदेखील नाहीत. कारण मंगळ कौटुंबिक सुखात अडचणी आणू शकेल. तर गुरु खर्चात टाकू शकेल; पण रवि-शनि हे तुमच्या पाठीशी उभे आहेत. ते तुमचे प्रयत्न सफल करणार आहेत. उद्योगात धडाडी निर्माण करणार आहेत. नव्या योजनांची स्फूर्ती देणार आहेत. आर्थिक बाजू समर्थपणे सांभाळणार आहेत. नोकरीतील अडचणींवर मात करून वरिष्ठांची मर्जी संपादन करण्यात तुम्हाला मोठे यश देणार आहेत बेकारांना अर्थलाभ, उद्योगात सहभाग. शुभ दिनांक–२४–२७.

**महिलांना** : नोकरीत अधिकार मिळणार आहेत.

**विद्यार्थ्यांना** : बौद्धिक कौशल्याची स्तुती होईल

**धनु : आर्थिक उन्नती**

गुरु सप्तमात आल्यापासून तुमचे सारेच तंत्र बदलेले आहे. कोंदटलेली हवा प्रसन्न–मोकळी झाली आहे. मनाची उद्विग्नता तर कोठच्या कोठे निघून गेली आहे! सारे वातावरण कसे मोकळे, आनंद देणारे निर्माण झाले आहे घरात पत्नी–मुले खूष तर बाहेर लोक खूष. जे जे कराल ते स्तुतीस पात्र! उद्योगात आता अडचणी येणार नाहीत. आध्यात्मिक आनंद मिळू शकेल. 'साधुसंत येती घरा तोचि दिवाळी–दसरा' असे अनुभवाला येणार आहे. नोकरीत अपेक्षापूर्ति, मानाचा योग व कार्यक्षमतेची पावती असे घडणार आहे. शुभ दिनांक–२३–२७.

**महिलांना** : संसारात आनंद व प्रसन्नता येईल.

**विद्यार्थ्यांना** : गुणांना प्रोत्साहन मिळून हुषारी दिसेल.

**मकर : डावपेच नकोत**

गुरु सहावा आला आहे तो शत्रू निर्माण करायला हातभार लावणार आहे. तुम्ही काहीही बोला ते गैरसमज वाढवण्यास उपकारक ठरेल. या वेळी सरळ वागणे व सहकार्याची वृत्ति ठेवणे अधिक हितकारक ठरेल. नोकरीत तसे वाईट नाही; पण तुमचे मानाचे स्थान ढळत असल्याचा प्रत्यय येऊ लागेल. वरिष्ठांची मर्जी जरी एकदम कमी होणार नसली तरी तुमचा सल्ला टाळण्याकडे कल राहील. तुम्ही या वेळी गप्प बसून जे जे घडेल ते ते पाहाणे उपकारक ठरेल. धंद्याची स्थिती समाधानकारक राहील. नवा उद्योग सुरू करायला रवि-शनि उपकारक आहेत मंगळाचे सहकार्यदेखील आहे. शुभ दिनांक–२४–२६.

**महिलांना** : आरोग्याची काळजी करीत बसू नका.

**विद्यार्थ्यांना** : चांगल्या मित्रांच्या संगतीत राहावे.

**कुंभ : प्रतिष्ठा वाढणार आहे.**

पाचवा गुरु व सहावा रवि–शनि असताना तुम्ही काळजी कशाची करता आहात? देवाचे फेरे कधी कडू तर कधी गोड असतातच. मध्यंतरी तुम्ही उपेक्षेच्या गर्तेत गेला होतात, पण तो काल आता इतिहासजमा होईल. नवी संधी व नवे आव्हान समोर उभे राहील. त्याला सामोरे जावे. यश पदरात पडणार आहे. राजकारण असो की समाजकारण असो अनेक समर्थ ग्रह तुमच्या यशाची ग्वाही देत आहेत. तेव्हा मन प्रसन्न ठेवा व कामाला लागा. धंदा बरा चालेल. वकिली बहरून येईल राजकारणात मान मिळेल. नोकरीत अधिकार वाढतील. अपेक्षापूर्तीचे स्वप्न साकार होईल, आरोग्य सुधारेल. शुभ दिनांक–२५–२७.

**महिलांना** : संसारात आनंद–अपेक्षा सफल होईल.

**विद्यार्थ्यांना** : फार अनुकूल असा हा सप्ताह आहे.

**मीन : मान–सन्मान वाढेल.**

राशिस्वामी गुरु चौथा आहे. तो घराचा प्रश्न सोडवणार आहे. काही तरी आनंद वाटावा असे संसारात घडणार आहे पती-पत्नी, प्रेयसी असा कोणताही परिवार असो तुमच्या मनाला सुखद आनंद निर्माण होणार आहे. स्थावराचा प्रश्न जर कोर्ट-कचेरीत रेंगाळत पडला असेल तर तो अनुकूल निर्णयाप्रत येईल. नोकरीत बरेच अनुकूल वातावरण राहणार आहे. वरिष्ठांची मर्जी राहील. तुमच्या कल्पनांना प्रतिसाद मिळेल. तुम्ही लेखक असाल तर प्रसिद्धी व पैसा मिळणार आहे. अनेकांकडून स्तुती होईल. गोड पत्रे येतील. स्थलांतर व स्थित्यंतर घडण्याची शक्यता आहे. लोकमानसात तुमच्याबद्दल अपेक्षा वाढतील. शुभ दिनांक–२३–२६.

**महिलांना** : नोकरीत अपेक्षा–पूर्ती होणार आहे.

**विद्यार्थ्यांना** अभ्यासात खूप प्रगती होईल. □